CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

सोलापूर, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

https://dainiktarunbharat.com / https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर सोमवार, २९ एप्रिल २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ३८ वे अंक १७९ । पाने १२। किंमत रु. ६/-

# काँग्रेसची विचारसरणी अत्याचारी मुघलांसारखी

## अतिरेकी संघटनांना देतात पाठिंबा

## पंतप्रधान मोदींचा प्रचारसभेतून हल्लाबोल

**वृत्तसंस्था,**
**बेळगाव, २८ एप्रिल**

अतिरेक्यांना आम्ही त्यांच्या घरात घुसून मारतो, तर काँग्रेस अतिरेकी संघटनांना पाठिंबा देते. त्यांची विचारधारा मुघलांसारखी असून, त्यांना औरंगजेबाने केलेले अत्याचार आठवत नाही. देशात अतिरेकी कारवायां ध्ये सहभाग असलेल्या पीफएआयवर आम्ही बंदी घातली. मात्र, मतांसाठी याच संघटनेचा वापर काँग्रेसकडून केला जात असल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केला. कर्नाटकच्या बेळगाव येथील प्रचारसभेला संबोधित करताना मोदी म्हणाले, वायनाडम ध्ये मते मिळविण्यासाठी काँग्रेसने पीएफआय या अतिरेकी संघटनेची बाजू घेतली. निवडणूक जिंकण्यासाठी ते कुठल्याही थराला जाऊ शकतात हे दिसून आले. काँग्रेसच्या राजपुत्राला आमच्या राजांनी, सम्राटांनी देशासाठी दिलेले योगदान आठवत नाही. ते नवाब, सुलतानांची स्तुती करतात. राजपुत्र म्हणतो भारताचे राजे, महाराज गरिबांची जम ीन बळकवायचे, पण आमची शेकडो मंदिरे पाडणाऱ्या औरंजेबाचे अत्याचार काँग्रेसला आठवत नाहीत. कर्नाटकमधील मुली किती असुरक्षित आहे हे नेहा हिरेठ हत्या प्रकरणात दिसून आले. बंगळुरूतील कॅफेमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाचे प्रकरण सरकारने गांभीर्याने घेतले नाही. सामान्यांच्या सुरक्षेशी त्यांना देणेघेणे नाही.



### इंग्रजांच्या गुलामीची मानसिकता

काँग्रेसने लोकशाही नष्ट करण्याचे काम केले आहे. ईव्हीएमवरून त्यांनी देशाला जागतिक स्तरावर बदनाम करण्याचे षडयंत्र रचले. देशाला स्वातंत्र्य होऊन ७५ वर्षे पूर्ण झाली, तरीही काँग्रेस मानसिकदृष्ट्या आजही इंग्रजांच्या गुलामीत जगत आहे. काँग्रेस देशहितापासून दूर गेली असून, केवळ घराण्याच्या हिताच्या विळख्यात अडकली असल्याचा घणाघात यावेळी मोदी यांनी केला.




## ▶▶ महत्त्वाचे...

### देशाला मिळणार नवीन बँका?

**नवी दिल्ली :** देशाला लवकरच नवीन बँका मिळू शकतात. भारतीय रिझर्व्ह बँकेने अनेक लघु वित्त बँकांकडून यासंदर्भात अर्ज मागवले आहेत. जर कोणतीही समस्या आढळली नाही तर त्यांना आरबीआयद्वारे नियमित किंवा सार्वजनिक बँकांचा दर्जा दिला जाऊ शकतो. सध्या देशात सुरे डझनभर लघु वित्त बँका आहेत. त्यात एयू स्मॉल फायनान्स बँक, इक्विटीज स्मॉट फायनान्स बँक आणि उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक आदींचा समावेश आहे.

### अमरिंदरसिंग लवली यांचा राजीनामा

**नवी दिल्ली :** दिल्ली काँग्रेसचे अध्यक्ष अमरिंदरसिंग लवली यांनी रविवारी पदाचा राजीनामा दिल्याने काँग्रेसला म ोठा धक्का बसला असून, याम ुळे अंतर्गत वाद समोर आले आहेत. लवली यांच्यासोबत चर्चा करून या मुद्यावर तोडगा काढावा, असा निर्देश काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांना दिला आहे.

### अभिनेता साहिल खानला अटक

**मुंबई :** महादेव बेटिंग ॲप प्रकरणात मुंबई सायबर सेलच्या विशेष चौकशी पथकाने (एसआयटी) अभिनेता साहिल खानला रविवारी छत्तीसगडम ध्ये अटक करण्यात आली, अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. नंतर त्याला मुंबईला आणण्यात आले. तेथे न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला दोन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. साहिल खानने अटकपूर्व जामिनासाठी दाखल केलेली याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतर त्याला छत्तीसगडमधील जगदलपूर येथून शनिवारी अटक करण्यात आली.

# मोदी, गडकरींमुळे पंढरीच्या पालखी मार्गाचा कायापालट

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : सांगोल्यात खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ महायुतीची सभा




### सांगोल्याला पाच हजार कोटींचा निधी

सांगोला तालुक्याला पाणी शिवसेना आणि भाजपने दिले. उजनी, टेंभू, म्हैसाळ योजनेचे पाणी सांगोला तालुक्याला फडणवीस यांनी दिले. मी गुवाहाटीला गेल्यामुळे सांगोला तालुक्याला पाच हजार कोटींचा निधी मिळाला. आता कळाले का तुम्हाला मी कशासाठी गुवाहाटीला गेलो, असे आ. शहाजीबापू पाटील म्हणाले.

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २८ एप्रिल**

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या आणि वारकऱ्यांसाठी कष्टप्रद ठरलेला खडतर पालखी मार्ग नष्ट करुन त्याला सुखकर करण्याबरोबरच पंढरीची वारी सुखकर वाटेने देवाच्या दारी पोहचविण्याचे काम पहिल्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

माढा लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ आयोजित सांगोला येथील सभेत ते बोलत होते. यावेळी खा. रणजितसिंह निंबाळकर, आ. शहाजीबापू पाटील, आ. जयकुमार गोरे, आ. गोपीचंद पडळकर, माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील, माजी आ. प्रशांत परिचारक, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, दौलत शितोळे, कल्याणराव काळे, माजी नगराध्यक्ष रफीकभाई नदाफ, सागर पाटील, श्रीकांत देशमुख, अतुल पवार, दुर्योधन हिप्परकर, दादासाहेब लवटे, खंडू सातपुते, शंभू माने, भारत चव्हाण, संभाजी आलदर, शिवाजी घेरडे, माजी नगराध्यक्ष राणी माने, राजश्री नागणे, मानस कमलापूरकर उपस्थित होते.

### हक्काचे पाणी मिळावे

सांगोला तालुक्याच्या विकासकामासाठी मी आणि आ. शहाजीबापू पाटील यांनी मिळून जेवढी कामे सांगितली ती मुंबईवरून येताना आ. शहाजीबापू पाटील मोकळ्या हाताने कधीच आले नाहीत. फक्त आमचे हक्काचे पाणी आम्हाला मिळावे अशी मागणी माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी केली.

उपमुख्यमंत्री फडवणवीस पुढे म्हणाले, आपल्या गाडीचे इंजिन मोदी आहेत आणि बोगीत सगळ्या समाजासाठी जागा आहे. मात्र राहुल गांधी फक्त इंजिन आहेत. पण बोगीच नाही. मोदीजी बारा बलुतेदारांच्या पाठीशी उभे राहिले. शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले. मोदीजींनी कोविडमध्ये शास्त्रज्ञांना एकत्र केले आणि त्यांना लस तयार करायला सांगितले. १४० कोटी लोकांना दोनवेळा लस दिली. विकासकामांबरोबर लस देऊन आरोग्याची काळजी घेतली. आ. शहाजीबापू पाटील यांनी जे मागितले ते आम्ही दिले. निधीचा ओघ कमी होऊ दिला नाही. खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी गेल्या पाच वर्षात मूलभूत गोष्टीकडे लक्ष दिले. नरेंद्र मोदींनी पाण्यासाठी व सिंचनासाठी ५० हजार कोटी रुपये दिले आणि आम्ही ठरविले हा निधी वापरून दुष्काळी भाग मोडीत काढायचा. त्यातूनच माण, खटावच्या चार पिढ्यांनी जे पाणी बघितले नव्हते, ते पाणी आम्ही त्या भागात आणले. भाजपासाठी नाहीतर भारतासाठी मोदींना मत द्या, असे आवाहन फडणवीस यांनी केले.

उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर म्हणाले, भाजपाने दिलेल्या पाण्यामुळे उन्हाळ्यात जिथे टँकर चालायचे, तिथे आज नदी वाहत आहे. फडणवीसांमुळे कोयनेतून पाणी माण नदीला आले. खा. शरद पवार यांनी या भागाचे नेतृत्व केले असून, त्यांच्या काळात बंधारेही बांधले गेले नाहीत. उलट या भागाचे नीरा-देवधरचे हक्काचे पाणी बारामतीला नेले, अशी टीका खा. नाईक-निंबाळकर यांनी केली.

## चीनशी चर्चा सुरळीत सुरू, भारत कधीही झुकणार नाही

**अहमदाबाद, २८ एप्रिल**

भारत आणि चीन यांच्यातील चर्चा सुरळीत आणि चांगल्या वातावरणात सुरू असून, भारत कधीही झुकणार नाही, असे स्पष्ट प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी रविवारी केले. लोकसभा निवडणूक रिंगणात असलेल्या भाजपा उमेदवाराच्या प्रचारासाठी अहमदाबादमध्ये आलेले राजनाथसिंह म्हणाले की, भारत लष्करी दृष्टिकोनातून एक शक्तिशाली देश बनला आहे आणि आपल्या शेजाऱ्यांशी चांगले संबंध ठेवू इच्छितो. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी चीनच्या आक्रमकतेबाबत नरेंद्र मोदींवर केलेल्या आरोपाबाबत विचारले असता ते म्हणाले, भारत आता कमकुवत राहिलेला नाही. लष्करी दृष्टिकोनातूनही तो एक शक्तिसंपन्न देश बनला आहे. आम्हाला आमच्या शेजारी देशांशी चांगले संबंध ठेवायचे आहेत.



भारत आणि चीन यांच्यात जे काही मुद्दे आहेत त्यावर सुरळीत आणि चांगल्या वातावरणात चर्चा सुरू आहे, याचा राजनाथसिंह यांनी पुनरुच्चार केला. मला वाटते की आपण चर्चेच्या निकालाची वाट पाहिली पाहिजे. पण, मी देशवासीयांना आश्वस्त करू इच्छितो की, भारत कुठेही झुकलेला नाही आणि कधीही झुकणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

### माजी पोलिस महासंचालक संजय पांडेही इच्छुक

**मुंबई :** राज्याचे माजी पोलिस महासंचालक आणि माजी पोलिस आयुक्त संजय पांडे उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. ते अपक्ष उमेदवार म्हणून रिंगणात उतरणार आहेत. स्थानिक नागरिकांनी काही दिवसांपूर्वी म ाझी भेट घेऊन मी लोकसभेसाठी निवडणूक लढवावी, अशी इच्छा व्यक्त केली होती. त्याला मी सकारात्मक प्रतिसाद दिला, असे ते म्हणाले.

# घटनादत्त आरक्षणाला संघाचे समर्थन

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

**वृत्तसंस्था,**
**हैदराबाद, २८ एप्रिल**

लोकसभा निवडणुकीच्या रणसंग्रामात पुन्हा एकदा आरक्षणाच्या मुद्यावरून वाक्‌युद्ध सुरू असतानाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी, घटनादत्त आरक्षणाला संघाचे पूर्ण समर्थन असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या वक्तव्याने विरोधकांना चपराक दिली असून, रा. स्व. संघ आणि भाजपा आरक्षणविरोधी असल्याच्या अपप्रचारावरही चित्र स्पष्ट झाले आहे.

हैदराबाद येथे एका कार्यक्रमात बोलताना सरसंघचालक म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून एक व्हिडीओ फिरताना दिसतो आहे. त्यात असे म्हटले आहे की, संघ आरक्षणाच्या विरोधात असून, उघडपणे तसे कबूल करीत नाही. प्रत्यक्षात, हा व्हिडीओ धादांत खोटा आहे तसेच त्यातील मुद्दे पूर्णतः असत्य आहेत. काही लोक खोटे पसरवून संघाला बदनाम करण्याचा प्रयत्न करीत आहेत. रा. स्व. संघाने कायमच घटनेने सं त केलेल्या आरक्षणाला समर्थन दिले आहे. आमचे म्हणणे आहे की, जोवर समाजातील भेदभाव कायम असेल आणि त्या त्या समुदायाला गरज असेल, तोवर आरक्षण दिले गेले पाहिजे. आरक्षणाची गरज आहे तोपर्यंत ते सुरूच राहावे, असे संघाचे मत आहे. आरक्षणाबाबत भाजपा आणि काँग्रेसम ध्ये सुरू असलेल्या वक्तव्यानंतर सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी हे वक्तव्य केले आहे.



या संदर्भातील काँग्रेस नेते प्रमोद कृष्णम यांचा एक जुना व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यापाठोपाठ राहुल गांधी यांनीही 'एक्स'वर पोस्ट करीत भाजपा आणि त्यांचे निकटवर्तीय आरक्षणविरोधी आहेत, असे म्हटले होते. त्यावर गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले होते की, जोवर भाजपा आहे तोवर काँग्रेस कोणत्याही आरक्षणाला हात लावू शकत नाही. राहुल गांधी खोटे बोलून लोकांची दिशाभूल करीत आहेत. भाजपा गेल्या दहा वर्षांपासून देशात सत्तेवर आहे. भाजपाला आरक्षण संपवायचे असते, तर हे काम कधीचेच झाले असते. याउलट, पंतप्रधान मोदी यांनी संपूर्ण देशातील दलित आणि मागासवर्गीय, आदिवसी यांना आरक्षणाबाबत आश्वस्त राहण्याची गॅरंटी दिली आहे, असेही अमित शाह म्हणाले होते, हे येथे उल्लेखनीय.

# सोलापुरात आज मोदींचा झंझावात

## शरद पवार, उद्धव ठाकरे, मनोज जरांगेही सोलापुरात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल**

सोमवारचा दिवस हा सोलापूरकरांसाठी जाहीर सभांचा हॉटस्पॉट ठरणार आहे. पंतप्रधान नरेंद्र म ोदीसह, शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा सोमवारी सोलापुरात होत असून यात मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची भर पडली आहे.

सोलापूर लोकसभा राखीव मतदार संघातील महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान मोदी यांची सभा होम मैदानावर दुपारी १२.३० वाजता होईल. दुपारी ४ वाजता महाविकास आघाडीच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा राष्ट्रीय नेते शरद पवार यांची संयुक्त सभा होणार आहे. मराठ्यांचे नेते मनोज जरांगे पाटील सोलापुरात येणार असल्याची माहिती सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आली आहे. सोमवारी सायंकाळी ५ वाजता मरीआई चौक येथे मनोज जरांगे पाटील यांचे आगमन होणार असून मराठा समाजाच्या वतीने त्यांचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. स्वागत स्वीकारल्यानंतर मंगळवेढा सांगोला सांगली मार्गे बेळगाव येथे जाहीर सभेसाठी रवाना होणार असल्याची माहिती समन्वयक सकल मराठा समाज माऊली पवार यांनी दिली आहे. सोलापुरात मनोज जरांगे पाटलांच्या येण्यामुळे शहर परिसरातील वातावरण ढवळले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नुकतेच जरांगे पाटील यांनी ज्यांना पाडायचे आहे त्यांना पाडा..! असा संदेश मराठा सम ाजाला दिलेला होता. सद्यस्थितीत अनेक ठिकाणी गाव भेट आणि संवाद दौरा होत असल्याने मराठा आरक्षण आंदोलन चळवळ जिवंत ठेवण्याचे काम जरांगे पाटील यांच्या दौऱ्यामुळे होत आहे अशी प्रतिक्रिया मराठा समाजाकडून व्यक्त केली जात आहे.



CMYK
www.tarunbharat.net
तरुण भारत
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.







## निवडणुकायन

### उमेदवाराचा मृत्यू झाल्यास काय?

सध्या देशभरातील विविध भागांतून लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवार उमेदवारी अर्ज दाखल करीत आहेत. परंतु, तुम्हाला कधी हा प्रश्न पडला आहे का की, एखाद्या व्यक्तीने उमेदवारीचा अर्ज दाखल केला, मात्र दुर्दैवाने त्याचा मृत्यू झाला, तर अशावेळी निवडणूक आयोग काय निर्णय घेत असेल? तसेच मतदान झाल्यानंतर एखाद्या उमेदवाराचा मृत्यू झाला, तर तेव्हा कोणती भूमिका घेतली जात असेल? खरे तर, अशा घटना खूप कमी प्रमाणात घडतात.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान उमेदवाराचा मृत्यू झाल्याच्या घटना अनेकदा घडल्या आहेत. उत्तरप्रदेशमधील मोरादाबादचे भाजपाचे उमेदवार कुंवर सुर्वेशसिंह यांचा मतदान पार पडल्यानंतर एका दिवसाने मृत्यू झाला होता. त्यामुळे आता पुढे काय होणार? निवडणूक आयोग कोणती प्रक्रिया राबवणार असा, प्रश्न लोकांना पडणे साहजिकच आहे.



निवडणूक आयोगाच्या नियमानुसार, मतदान प्रक्रिया पार पडली असेल आणि त्यानंतर उमेदवाराचा मृत्यू झाला असेल, तर निकाल लागेपर्यंत वाट पाहिली जाते. मतमोजणीनंतर दुसरा उमेदवार विजय झाला, तर पुन्हा निवडणुका घेण्याची गरज पडत नाही. पण, मृत उमेदवारच विजयी झाल्यास निवडणूक रद्द केली जाते आणि त्या जागेसाठी पुन्हा घेतली जाते.

नियमानुसार त्यानंतर फेरमतदान किंवा पोटनिवडणूक घेतली जाते. कारण, अशा परिस्थितीत निवडून दिलेला उमेदवार लोकांचे प्रतिनिधित्व करीत नाही. लोकांचे प्रतिनिधित्व कायदा १९५१ च्या अनुच्छेद १५१अ नुसार अशा जागेवर निवडणूक आयोगाला ६ महिन्यांच्या आत निवडणुका घ्याव्या लागतात.

**मतदानाआधीच उमेदवाराचा मृत्यू झाल्यास काय?**

अर्ज दाखल झाल्यानंतर उमेदवाराचा मृत्यू झाला असेल तसेच उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख उलटून गेली असेल, तर अशावेळी त्या जागेची निवडणूक रद्द केली जाते. उदाहरणार्थ, राजस्थानमधील २०२३ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसचे करणपूरचे उमेदवार गुरमीतसिंग कुन्नर यांचा मृत्यू झाला होता. त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. अशा ठिकाणी एका नवीन तारखेला निवडणुका घेतल्या जातात. जेणेकरून पक्षाकडून अन्य उमेदवाराला तिकीट देण्याची संधी मिळते. ■

# संविधान बदलण्यासाठी व्हायचेय् तिसऱ्यांदा पंतप्रधान

### शरद पवारांची पंतप्रधान मोदींवर टीका

◆ **पुणे, २८ एप्रिल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुण्यात येणार आहेत. पुणेकरांना माझा नमस्कार, अशी भाषणाला सुरुवात करतील आणि तिसऱ्यांना पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या उमेदवाराला निवडून देण्याची साद घालतील. मात्र, त्यांना देशाच्या विकासासाठी नव्हे, तर संविधान बदलण्यासाठी तिसऱ्यांना पंतप्रधान व्हायचे आहे. त्यासाठीच लोकसभेत चारशे जागा हव्या असल्याची टीका शरद पवार यांनी सुप्रिया सुळे यांच्या प्रचारासाठी घेतलेल्या सभेतून केली.

बारामती मतदारसंघातील सासवड येथील पालखी मैदानावर रविवारी आयोजित जनसभेत बोलताना ते म्हणाले, मोदी यांनी पंतप्रधान पदाची प्रतिष्ठा धुळीस मिळवली आहे. आठ महिन्यांपूर्वी माझ्याबद्दल त्यांचे वेगळे मत होते. मात्र, आमाच्यातील काही लोक त्यांच्यासोबत गेल्यानंतर त्यांनी भूमिका बदलली. मोदी आणि त्यांचे सहकारी ज्या पद्धतीने देश चालवतात, त्याबाबत चिंता आहे. महापालिका, पंचायत, जिल्हा परिषद, नगर परिषद निवडणूक झाल्या नाही. मात्र लोकसभा आणि विधानसभा निवडणुका घेतली जाते. हा प्रकार लोकशाहीसाठी घातक आहे. जनतेने त्यांच्या मनातील समजून घ्यायला हवे. संविधान बदलण्यासाठी कुठलाही अडथळा येऊ नये यासाठी चारशे पारचे लक्ष्य भाजपाने ठेवले आहे. (वृत्तसंस्था)



### हुकूमशाही प्रवृत्तीला बाजूला सारा

सध्याचे सरकार हुकूमशाहीच्या मार्गावर निघाले आहे. ते देशातील लोकशाहीला संपविण्याचा प्रयत्न करीत आहे. हुकूमशाही प्रवृत्तीला बाजूला सारण्याचे आवाहन पवार यांनी सभेतून केले. बांगलादेशसारखा देश जीडीपीत आपल्यापेक्षा पुढे असताना हे मात्र जनतेपुढे वेगळेच चित्र दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे. अशोक चव्हाण यांच्यावर आरोप केले ते भाजपासोबत गेले. आमच्या पक्षातील एकावर सिंचन घोटाळ्याचा आरोप केला. ते भाजपासोबत गेले. मात्र, आता त्यांच्यावरील आरोपांचे काय झाले ? याचे उत्तर भाजपाच्या नेत्यांनी द्यावे, असे आव्हान यावेळी त्यांनी केले. ■

### अपहरण प्रकरणी शिक्षा कायम, खासदारकीचे स्वप्न भंगले

◆ **प्रयागराज, २८ एप्रिल**

नमामी गंगे प्रकल्प व्यवस्थापकाच्या अपहरण प्रकरणात जौनपूरच्या विशेष न्यायालयाने पूर्वांचलचा बाहुबली माजी खासदार धनंजयसिंहला ७ वर्षांची शिक्षा सुनावली होती. ही शिक्षा अलाहाबाद उच्च न्यायालयाने कायम ठेवल्याने त्याला आता लोकसभा निवडणूक लढवता येणार नाही. एकल खंडपीठाचे न्या. संजय कुमारसिंह यांनी शनिवारी हा आदेश दिला.

धनंजय हा सध्या जामिनावर बाहेर आहे. गेल्या महिन्यात जौनपूरच्या विशेष न्यायालयाने दिलेल्या शिक्षेविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्याच्या वकिलाने लोकसभा निवडणूक लढवण्याची परवानगी न्यायालयाकडे मागितली होती. खटल्यादरम्यान सिंह जामिनावर होते, त्यांनी जामिनाचा गैरवापर केला नाही आणि त्यांना लोकसभा निवडणूक लढवायची होती, त्यामुळे शिक्षेला स्थगिती देण्याची विनंती करण्यात आली होती. (वृत्तसंस्था)

# मतदान करा अन् पेट्रोल मोफत मिळवा

### पुणे पेट्रोल डिलर्स असोसिएशनची घोषणा

◆ **पुणे, २८ एप्रिल**

लोकसभा मतदानाचे दोन टप्पे पूर्ण झाले मात्र या दोन्ही टप्प्यात विदर्भातील मतदारांनी निरुत्साह दाखवला. अशातच मतदारांना आकर्षित करण्यासाठी पुणे पेट्रोल डिलर्स असोसिएशनने मोफत पेट्रोल देण्याची घोषणा केली आहे. मतदान केल्याचा पुरावा दाखवा आणि ५० रुपयांचे पेट्रोल मोफत मिळवा अशा घोषवाक्याचे होर्डिंग्स पेट्रोल पंपावर लावले आहे.

मतदानानंतर बोटावर लावण्यात येणारी शाई दाखविल्यास ५० रुपयाचे पेट्रोल मोफत देण्यात येणार असल्याचे पुणे पेट्रोल डिलर्स असोसिएशन म्हटले आहे. यासाठी एक लिटर पेट्रोलची अट ठेवण्यात आली आहे. एक लिटर पेट्रोल खरेदी केल्यास त्यावर ५० रुपयांचे पेट्रोल मोफत दिले जाणार आहे. यासाठी 'व्होट कर पुणेकर' ही मोहीम राबविण्यात आली आहे. पुणे लोकसभेसाठी १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर २० मेपर्यंत ही मोहीम सुरू राहणार आहे, अशी माहिती पेट्रोल डिलर्स असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रुपारेल यांनी दिली. मतदानासाठी घरोघरी जाऊन जनजागृती करणार असून, ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रापर्यंत नेण्यासाठीही मदत करणार असल्याचे त्यांनी पत्रपरिषदेत सांगितले. (वृत्तसंस्था)



# ठाकरेंनी रचला होता शिंदेंना मारण्याचा कट

### शिवसेनेचे प्रवक्ते राजू वाघमारे यांचा प्रचारसभेतून गौप्यस्फोट

◆ **कोल्हापूर, २८ एप्रिल**

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत शिवसेना तसेच उद्धव ठाकरे गटाच्या प्रचार सभांचा धडाका सुरू असून, यातून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. अशातच शिवसेना शिंदे गटाचे प्रवक्ते राजू वाघमारे यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधत त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मारण्याचा कट रचल्याचा खळबळजनक आरोप केला आहे.

जनसभेला संबोधित करताना वाघमारे म्हणाले, महाविकास आघाडीची सत्ता असताना मुंबईच्या हॉटेल हयातमध्ये संजय राऊत यांनी दोन बैठका घेतल्या होत्या. उद्धव ठाकरे यांना बाजूला करून आपण सत्ता स्थापन करू, असा त्यांचा डाव होता तसेच गडचिरोली दौऱ्यावर पाठवून एकनाथ शिंदे यांना गोळ्या घालून ठार मारण्याचा कट ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदावर असताना रचला होता. त्यामुळे नक्षलवाद्यांच्या धमक्या येऊनही त्यांना उद्धव ठाकरेंकडून सुरक्षा देण्यात आली नव्हती.



शिंदेंना बाजूला करून आदित्यला मुख्यमंत्री करायचे होते, असा आरोप करताना, मी एक दिवसाआड एक गोष्ट बाहेर काढणार असल्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला. (वृत्तसंस्था)

### समाजवादी पार्टीवर दहा ठिकाणी उमेदवार बदलण्याची नामुष्की

**लखनौ :** समाजवादी पक्ष (सपा) उत्तरप्रदेशमधील ६२ जागांवर निवडणूक लढविणार आहे. सपाने या ६२ मतदारसंघांपैकी १० मतदारसंघांतील उमेदवार आतापर्यंत बदलले आहेत. सपाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी स्वतः त्यांचा पुतण्या तेज प्रताप यादव यांना पक्षाच्या बालेकिल्ला असलेल्या कन्नौजमधून उमेदवारी दिली होती. मात्र, तीन दिवसांनंतर त्यांची उमेदवारी रद्द करण्यात आली. शुक्रवारी उमेदवारी अर्जांच्या छाननी प्रक्रियेदरम्यान पक्षाचे शाहजहांपूर येथील उमेदवार राजेश कश्यप यांना कळले की, सपाने त्यांचे नाव रद्द केले आहे. त्यांनी २२ एप्रिल रोजी कागदपत्रे दाखल केली होती. उमेदवारांच्या सतत बदलण्याबद्दल विचारले असता, सपाच्या एका नेत्याने सांगितले, ■

# मतदारांनी ठरवून काँग्रेसला सत्तेबाहेर काढले

### पृथ्वीराज चव्हाण यांनी पक्षाच्या उणिवांवर ठेवले बोट

◆ **कराड, २८ एप्रिल**

२०१४ आणि २०१९ मधील लोकसभा निवडणुकीत आम्ही प्रत्येक मतदारसंघात जिवाचे रान करून प्रचार केला. पक्षाची भूमिका मतदारांपर्यंत पोहोचवली. मात्र, जनतेने ठरवून काँग्रेसला सत्तेबाहेर काढले. सांगितलेल्या उणिवा दूर केल्या असत्या, तर २०१९ मध्ये देशात काँग्रेसचे सरकार स्थापन झाले असते, अशा शब्दांत कराड येथील सभेत माजी मुख्यमंत्री व काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी निवडणुकीदरम्यान पक्षाला घरचा आहेर दिला.

प्रचारसभेला संबोधित करताना चव्हाण म्हणाले, मागील दोन लोकसभा निवडणुकीत आम्ही जनतेला समजण्यात अपयशी ठरलो. त्यामुळे पराभवाला सामोरे जावे लागले. पक्षातील कार्यकारिणीत बदल करण्याची भूमिका आम्ही लावून धरल्याने लोकशाही पद्धतीने पक्षाचा कारभार सध्या सुरू आहे. त्यामुळे जनतेचा पक्षावरील विश्वास वाढला असून, कर्नाटक, तेलंगणामध्ये आमचे सरकार आले. देशातही यावेळी परिस्थती बदलेल. भाजपाने कितीही धावपळ केली, तरी त्यांचे उमेदवार निवडून येणार नाहीत. काँग्रेस ६० वर्षांचा हिशेब द्यायला तयार आहे, त्याआधी मोदी यांनी मागील दहा वर्षांतील कामाचा तपशील जनतेसमोर आणावा.

**'इंडिया' आघाडी झाली कमकुवत**

सुरुवातील 'इंडिया' आघाडीत सर्वच विरोधी पक्ष सहभागी होते. मात्र, काही जण दबावामुळे बाहेर पडले. त्यांनी आघाडीला कमकुवत करण्याचा प्रयत्न केला. देशातील सर्वच विरोधक एकत्र लोकसभा निवडणूक लढले असते, तर परिस्थिती वेगळी दिसली असती, असेही चव्हाण म्हणाले. (वृत्तसंस्था)

#### उदयनराजेंचा पराभव होणार

राष्ट्रवादी काँग्रेसचे श्रीनिवास पाटील यांनी भाजपाचे उमेदवार उदयनराजे भोसले यांचा पराभव केला होता. आता उदयनराजे दीड लाखांच्या फरकाने निश्चित पराभूत होतील, असा दावा चव्हाण यांनी यावेळी केला. लोकसभेच्या निवडणुकीत उदयनराजे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार असल्याने आम्ही त्यांचा उत्तमप्रकारे प्रचार केला आणि ते चांगल्या मतांनी निवडूनही आले. पण, उदयनराजे लगेचच भाजपात जाऊन त्यांनी पोटनिवडणूक लावली. ■

# रायबरेलीत गांधी विरुद्ध गांधी लढतीची शक्यता

◆ **नवी दिल्ली, २८ एप्रिल**

गांधी घराण्याला विजयाची हमखास हमी देणाऱ्या उत्तरप्रदेशातील रायबरेली लोकसभा मतदार संघात यंदा सख्ख्या चुलत बहीण-भावांमध्ये चुरशीची लढत रंगण्याची शक्यता आहे. तेथून प्रियांका गांधी-वढेरा यांच्याविरोधात भाजपाने त्यांचे चुलत बंधू वरुण गांधी यांना मैदानात उतरवण्याची पूर्ण तयारी केली आहे.

अमेठीमध्ये राहुल गांधी यांचा पराभव भाजपाच्या स्मृती इराणी यांच्याकडून झाला होता. त्यामुळे यावेळी काँग्रेसविरुद्ध रायबरेलीची जागा जिंकण्यासाठी भाजपाने रणनीती आखली आहे. त्याचाच एक भाग म्हणून रायबरेलीत गांधी विरुद्ध गांधी अशी लढत साकारण्याची तयारी केली आहे. रायबरेलीत पाचव्या टप्प्यात २० मे रोजी मतदान होणार आहे. सोनिया गांधी यांनी लोकसभा निवडणूक लढणार नसल्याचे जाहीर केले आहे.





त्यामुळे रायबरेलीतून प्रियांका वढेरा यांची 'इंडिया' आघाडीकडून उमेदवारी निश्चित मानली जात आहे. त्यांच्याविरोधात वरुण गांधी यांना मैदानात उतरविण्याचा निर्णय भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने घेतला आहे. प्रियांका यांना वरुण हे टक्कर देऊन विजयी होऊ शकतात, असा अहवाल भाजपाने केलेल्या एका गोपनीय सर्वेक्षणातून पुढे आला आहे. त्यानुसार वरुण यांना रायबरेलीतून लढण्यासाठी सज्ज राहण्यास सांगण्यात आले आहे. मात्र, वरुण यांनी त्यासाठी अजून होकार कळविलेला नाही.

भाजपाने पिलीभीतमधून वरुण यांना तिकीट नाकारले होते. तेथून त्यांनी २००९ आणि २०१९ मध्ये विजय मिळविला होता. यांच्या मातोश्री व माजी केंद्रीय मंत्री मनेका गांधी यांना भाजपाने सुलतानपूर मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे.

वरुण यांना रायबरेलीतून लढवायची तयारी सुरू असल्यानेच त्यांना पिलीभीतमधून उमेदवारी नाकारण्यात आल्याचे बोलले जाते. प्रियांका यांच्या विरोधात निवडणूक लढण्यास वरुण यांनी होकार दिल्यास रायबरेलीत 'हाय प्रोफाईल' लढत रंगण्याची शक्यता आहे. दोन्ही पक्षांसाठी ही संभाव्य लढत अत्यंत प्रतिष्ठेची ठरणार आहे. प्रियांका यांच्या विरोधात भाजपाकडून वरुण यांना उमेदवारी दिली जाते की अन्य कोणाला, याची उत्सुकता सर्वांना लागली आहे. (वृत्तसंस्था)



नवी दिल्लीतील भाजपाच्या उमेदवार बांसुरी स्वराज यांच्या प्रचारासाठी रविवारी रोड शो आयोजित करण्यात आला. दिल्लीकरांनी या रोड शोला भरभरून प्रतिसाद दिला

# रत्नागिरीत आज 'हाय व्होल्टेज ड्रामा'!

### मनसे-उबाठाची एकाच दिवशी एकाचवेळी सभा

◆ **रत्नागिरी, २८ एप्रिल**

लोकसभा निवडणुकीचे दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडले असून, आता तिसऱ्या टप्प्यात होणाऱ्या मतदानाकडे सर्वांचे लक्ष आहे. वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे नेते या तिसऱ्या टप्प्यात मतदान होणाऱ्या मतदारसंघांत तळ ठोकून आहेत. येत्या ७ मे रोजी मतदानाचा हा तिसरा टप्पा पार पडणार असून, रत्नागिरी-सिंधुदुर्गच्या भावी खासदाराचेही भवितव्य ठरणार आहे. दरम्यान, याच रत्नागिरीत आता प्रचार शिगेला पोहोचला आहे. २९ एप्रिल रोजी रत्नागिरी शहरात मनसे आणि ठाकरे गट यांची एकाच वेळी सभा होणार आहे.

ठाकरे गटाचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे २९ एप्रिल रोजी रत्नागिरीच्या दौऱ्यावर आहेत. आपल्या या दौऱ्यात ते रत्नागिरी शहरात आयोजित करण्यात आलेल्या एका सभेला संबोधित करणार आहेत. दुसरीकडे, याच वेळी मनसेनेही आपली सभा आयोजित केली आहे. सभेच्या रूपात आता शिवसेना आणि मनसे आमनेसामने आले आहेत. रत्नागिरीत सायंकाळी सहा वाजता मनसे आणि ठाकरे गटाच्या दोन प्रचार सभा होणार आहेत. (वृत्तसंस्था)

#### मनसेकडून राणेंचा प्रचार

मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या या सभांची वेळ एकच असल्याने आता राजकीय चर्चेला उधाण आले आहे. काही दिवसांपूर्वीच मनेसेचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांनी आम्ही भाजपाला बिनशर्त पाठिंबा देत आहोत, असे जाहीर केले होते. त्यानंतर आता प्रत्येक जिल्ह्यात मनसेकडून भाजपाच्या उमेदवारांचा प्रचार केला जातो आहे. ■

# ज्योतिरादित्य शिंदे सहाव्यांदा रिंगणात

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २८ एप्रिल**

राज्यसभेचे सदस्य असलेले नागरी उड्डयन मंत्री ज्योतिरादित्य शिंदे गुणा मतदारसंघातून लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात आहे. त्यांचा मुकाबला काँग्रेसचे राव यादवेंद्रसिंह यादव यांच्याशी आहे.

यादवेंद्रसिंह भाजपाचे माजी आमदार देशराजसिंह यादव यांचे पुत्र आहेत. देशराजसिंह यांनी १९९९ मध्ये गुणा मतदारसंघातून माधवराव शिंदे यांच्याविरोधात निवडणूक लढवली होती. विशेष म्हणजे, २००२ मधील पोटनिवडणुकीत देशराजसिंह ज्योतिरादित्य शिंदे यांच्याविरोधातही रिंगणात उतरले होते. ज्योतिरादित्य शिंदे यांनी आधी पित्याचा म्हणजे देशराजसिंह यांचा पराभव केला, आता मुलाचा म्हणजे यादवेंद्रसिंह यांचा पराभव करण्याची संधी त्यांच्यासमोर आहे.

राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या आधी यादवेंद्रसिंह यांनी भाजपातून काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. विधानसभा मतदारसंघात त्यांचा भाजपा उमेदवाराने पराभव केला. यावेळी पुन्हा काँग्रेसने त्यांच्यावर विश्वास दाखवला.

ग्वाल्हेर आणि गुणा हे शिंदे घराण्याचे गड समजले जातात. १९५२ पासून मतदारसंघात झालेल्या १९ लोकसभा निवडणुकांपैकी १४ निवडणुका शिंदे घराण्याने जिंकल्या. या मतदारसंघातून सलग चार लोकसभा निवडणुका जिंकणाऱ्या ज्योतिरादित्य शिंदे यांचा २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत धक्कादायक पराभव झाला. त्यावेळी शिंदे हे काँग्रेसचे उमेदवार होते. कधीकाळी शिंदे यांचे सहकारी असलेल्या पण नंतर भाजपात आलेल्या कृष्णपाल यादव यांनी सव्वा लाख मतांनी शिंदे यांचा पराभव केला होता.

माधवराव शिंदे यांच्या अपघाती निधनानंतर २००२ मध्ये गुणा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत ज्योतिरादित्य शिंदे पहिल्यांदा विजयी झाले. त्यानंतर २००४, २००९ आणि २०१४ अशा चार निवडणुका शिंदे यांनी काँग्रेसचे उमेदवार म्हणून जिंकल्या. माधवराव शिंदे यांनीही गुणा लोकसभा मतदारसंघातून तीनदा विजय मिळवला होता. पण, या तिन्ही निवडणुका त्यांनी वेगवेगळ्या पक्षातर्फे लढवल्या आणि जिंकल्या. माधवराव शिंदे यांनी १९७१ मध्ये पहिली निवडणूक जनसंघाचे उमेदवार म्हणून लढवली आणि जिंकली. १९७७ मध्ये ते अपक्ष उमेदवार म्हणून लढले आणि १९८० ची निवडणूक मात्र शिंदे यांनी काँग्रेसतर्फे लढवली आणि जिंकली. १९८४ ची लोकसभा निवडणूक माधवराव शिंदे यांनी राजीव गांधींच्या आग्रहावरुन गुणातून लढवली आणि भाजपाचे अटलबिहारी वाजपेयी यांचा धक्कादायक पराभव केला. १९८४ नंतर माधवराव शिंदे यांनी सर्व निवडणुका ग्वाल्हेर मतदारसंघातून लढवल्या आणि जिंकल्या. १९९९ ची निवडणूक त्यांनी गुणा मतदारसंघातून लढवत जिंकली. शिंदे यांची ही शेवटची निवडणूक होती. ■

# 'गुणा'चा प्रवास राजमातांपासून ज्योतिरादित्य शिंदेंपर्यंत

◆ **नवी दिल्ली, २८ एप्रिल**

ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्याची राजकीय वाटचाल काँग्रेस, जनसंघ, भाजपा अशी राहिली. राजमाता विजयाराजे शिंदे भाजपात होत्या, तर त्यांचे पुत्र माधवराव शिंदे काँग्रेसचे नेते होते. या माय-लेकामधील राजकीय मतभेद चर्चेचा विषय होते. गुणा मतदारसंघाचा राजकीय प्रवास आजी राजमाता विजयाराजे शिंदेपासून नातू ज्योतिरादित्य शिंदेपर्यंत राहिला आहे.



राजमाता विजयाराजे शिंदे यांनी आपला राजकीय प्रवास काँग्रेसमधून सुरू केला आणि जनसंघमार्गे भाजपात संपवला. त्यांचे पुत्र माधवराव शिंदे यांनी आपली राजकीय कारकीर्द जनसंघातून सुरू केली आणि काँग्रेसमध्ये संपवली. ज्योतिरादित्य शिंदे राजकीय कारकीर्द आपल्या आजीसारखी म्हणजे विजयाराजे शिंदे यांच्यासारखी आहे. ज्योतिरादित्य शिंदे यांनी आपली कराजकीय कारकीर्द काँग्रेसपासून सुरू केली, आता ते भाजपात प्रस्थापित झाले आहेत.

शिंदे यांच्या आजी आणि माधवराव शिंदे यांच्या मातोश्री राजमाता विजयाराजे शिंदे यांनीही गुणा मतदारसंघाचे लोकसभेत प्रतिनिधित्व केले. १९५७ ची पहिली निवडणूक विजयाराजे शिंदे यांनी काँग्रेसच्या उमेदवार म्हणून गुणा मतदारसंघातून लढवली आणि जिंकली. १९६७ ची दुसरी निवडणूक राजमाता शिंदे स्वतंत्र पक्षातर्फे लढवत जिंकली. १९८९, १९९१, १९९६ आणि १९९८ अशा चार निवडणुका राजमाता शिंदे यांनी गुणातून भाजपा उमेदवार म्हणून लढवल्या आणि जिंकल्या.

गृहमंत्री अमित शाह यांनी ज्योतिरादित्य शिंदे यांच्या प्रचारासाठी नुकतीच गुण्यात सभा घेतली. यावेळी त्यांनी यांचा उल्लेख महाराजा आणि राजासाहाब असा केला. ज्योतिरादित्य शिंदे यांच्यावर पंतप्रधान मोदी यांचा वरदहस्त असल्याचे सांगायलाही ते विसरले नाही.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत विजयी उमेदवार के. पी. यादव यांना भाजपाने उमेदवारी नाकारली, तर पराभूत झालेल्या ज्योतिरादित्य शिंदे यांना उमेदवारी दिली. यादव यांचे राजकीय पुनर्वसन भाजपा करणार आहे, तुम्ही त्याची काळजी करू नका, तुम्हाला गुणात शिंदे आणि यादव असे दोन नेते मिळणार आहे, असे शाह यांनी स्पष्ट केले.

गुणा लोकसभा मतदारसंघात ८ विधानसभा मतदारसंघ आहेत, यापैकी सहा विधानसभा मतदारसंघ भाजपाकडे तर दोन काँग्रेसकडे आहेत.

गुणा मतदारसंघातील आपल्या पहिल्या लोकसभा निवडणुकीचा अपवाद सोडला तर ज्योतिरादित्य शिंदे उर्वरित तीन निवडणुका किमान ८६ हजार ते कमाल अडीच लाखापर्यंतच्या मताधिक्याने जिंकले. २००२ ची पोटनिवडणूक त्यांनी सर्वाधिक म्हणजे ४ लाखावर मतांनी जिंकली होती. (तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# पंतप्रधानांच्या झंझावती सभांनी महाराष्ट्र ढवळणार

## २९, ३० एप्रिलला ६ सभांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२८ एप्रिल:**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात महायुतीच्या उमेदवारांसाठी राज्यात येत्या दोन दिवसांत २९ व ३० एप्रिलला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहा सभा होणार आहेत, अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवारी दिली. मोदी यांच्या सोमवारी आणि मंगळवारी प्रत्येकी तीन सभा होणार आहेत. महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी सोमवारी सोलापूर,कराड आणि पुणे येथे तर मंगळवारी माळशिरस, धाराशिव आणि लातूर येथे प्रचारसभा होणार आहेत.

बावनकुळे यांनी प्रसिद्धी पत्रकात पंतप्रधान मोदी यांच्या राज्यातील दोन दिवसांतील सभांच्या कार्यक्रमाची माहिती दिली आहे. सोलापूर लोकसभा मतदारसंघातील भाजपा- महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारासाठी दुपारी दीड वाजता होम मैदान येथे, कराड येथे उदयनराजे भोसले यांच्या प्रचारार्थ होणारी सभा दुपारी ३:४५ वाजता, पुणे येथील सभा संध्याकाळी ५:४५ वाजता हडपसर येथे रेसकोर्स मैदानावर होणार आहे. ही सभा पुण्याचे महायुती उमेदवार मुरलीधर मोहोळ, मावळ चे श्रीरंग बारणे, बारामतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार आणि शिरुरचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ होणार आहे. ३० एप्रिल मंगळवारी दुपारी ११:४५ ला माढा मधील महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक -निंबाळकर यांच्या प्रचारासाठी माळशिरस येथे, दुपारी दीड वाजता धाराशिव येथे महायुतीच्या उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या अर्चना पाटील यांच्यासाठी, तर दुपारी ३ वाजता लातूर येथे भाजपाचे सुधाकर शृंगारे यांच्यासाठी सभा होणार आहे.मोदी यांच्या सभांची जय्यत तयारी चालू आहे. या सभांच्या आयोजनाची जबाबदारी पुढील नेत्यांवर सोपविण्यात आली आहे. सोलापूर- आ.सचिन कल्याणशेट्टी, नरेंद्र काळे, कराड- धैर्यशील कदम, विक्रम पावसकर, पुणे- राजेश पांडे, जयंत येरवडेकर, धीरज घाटे, माळशिरस - आ.जयकुमार गोरे, प्रशांत परिचारक, धाराशिव - आ. राणाजगजितसिंह पाटील, आ.अभिमन्यू पवार, लातूर- आ.संभाजी पाटील-निलंगेकर, आ.रमेश कराड, अरविंद निलंगेकर, अशी माहितीही बावनकुळे यांनी दिली आहे.






# उज्वल निकम यांच्या रूपातून मुंबईचा योध्दा रिंगणात : ॲड. शेलार

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२८ एप्रिल-**

उत्तर मध्य लोकसभा मतदार संघात महायुतीचे उमेदवार ज्येष्ठ विधितज्ञ अँड उज्वल निकम यांचा शनिवारी भारतीय जनता पक्षात पक्ष प्रवेश करुन त्यांचे जोरदार स्वागत मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी केले. ॲड.निकम म्हणजे एक सच्चा मुंबईकर आणि योध्दा निवडणूकीच्या रिंगणात उतरले आहेत, अशी प्रतिक्रिया शेलार यांनी दिली.

शनिवारी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर ॲड. उज्वल निकम यांचे उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघातील भाजपाचे विलेपार्ले येथील कार्यालयात ढोलताशांच्या गजरात जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी अँड पराग अळवणी, शिवसेना नेते डॉ. दीपक सावंत, विवेक पवार, माजी आमदार तृप्ती सावंत यांच्यासह युतीचे सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुंबईतील रेल्वेत बॉम्ब ब्लास्ट करुन मुंबईकरांचा जीव घेणाऱ्या याकूब मेमनला फाशी व्हावी, म्हणून न्यायालयात युक्तिवाद करणारे, मुंबईवर हल्ला करणाऱ्या कसाबला फाशी व्हावी म्हणून आवश्यक पुरावे व या कटातील पाकिस्तानचा सहभाग उघड करुन जगासमोर पाकिस्तानला उघडे पाडणारे अँड निकम यांना उमेदवारी म्हणजे मुंबईकरांसाठी लढणाऱ्या सच्चा मुंबईकरांचा हा सन्मान आहे. तर निकम यांनी आपल्या भाषणात संधी देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राष्ट्रीय, प्रदेश अध्यक्ष आणि भाजपा मुंबई अध्यक्षांचे आभार मानले. पंतप्रधान मोदी या देशाच्या विकासासाठी काम करीत आहेत, भावना निकम यांनी व्यक्त केली.

## काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष मधुकर तावडेंचा भाजपात प्रवेश

**धाराशिव, दि. २८ -**

काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष मधुकर तावडे यांच्यासह माजी नगरसेवक तथा युवक काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष ॲड. दर्शन कोळगे यांनी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत रविवारी भाजपात प्रवेश केला. उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री फडणवीस यांची बार्शी येथे प्रचारसभा पार पडली. या कार्यक्रमात श्री. तावडे, कुलस्वामिनी शुगरचे चेअरमन आकाश तावडे, माजी नगरसेवक ॲड. दर्शन कोळगे, पळसपचे विभागप्रमुख राजेंद्र तुपे यांनी रविवारी भाजपात जाहीर प्रवेश केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून पक्षात स्वागत करण्यात आले.

# ठाणे मतदार संघासाठी भाजपाचा आग्रह कायम!

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२८ एप्रिल:**

महायुतीत ठाणे मतदार संघाच्याजागा वाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही शिवसेनेच्या शिंदे गटाबरोबरच भाजपासुद्धा या जागेसाठी आग्रह कायम ठेवला आहे .रविवारी या मतदारसंघात भाजपाच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष विनय सहस्त्रबुद्धे यांच्या प्रमुख उपस्थितीत मतदारसंघातील सुकाणू समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध राहावे, असा ठराव एकमताने करण्यात आला. भाजपाकडून माजी खासदार संदीप नाईक या ठिकाणाहून तिकीट मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहेत.



ऐरोली आणि बेलापूर विधानसभा आणि नवी मुंबई, ठाणे लोकसभा मतदारसंघातील लोकसभा/विधानसभा विस्तार अधिकाऱ्यांच्या बैठक घेऊन चर्चा करण्यात आली यावेळी

माजी मा. मंत्री गणेश नाईक संजीव नाईक संजय केळकर, . आमदार मंदा म्हात्रे, संघटन मंत्री हेमंत म्हात्रे , प्रदेश उपाध्यक्ष जय प्रकाश ठाकूर, मुंबई भाजपा उपाध्यक्ष अमरजीत मिश्रा , विधानसभा प्रभारी सागर नाईक विधानसभा प्रभारी निलेश म्हात्रे आदी उपस्थित होते.

# दीर-भावजयीमध्ये रंगली निकराची झुंज

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**धाराशिव, दि.२८ एप्रिल-**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी शिंगेला पोहोचले असताना अनेक ठिकाणी भाऊबंदकीचा संग्राम पहावयास मिळत आहे राज्यात बारामती पाठोपाठच मराठवाड्यातील संवेदनशील जिल्हा असलेल्या धाराशिव(उस्मानाबाद) लोकसभा मतदारसंघाकडे राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे. दिर -भावजयींच्या लढती महाविकास आघाडीचे उमेदवार व विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर चुलत भाऊ जगजीतसिंह राणा यांच्याप्रमाणे त्यांच्या पत्नी अर्चना पाटील यांचाही पराभव करतात? की अर्चना या आपल्या पतीच्या पराभवाचा बदला घेतात?, याबाबत उत्सुकता लागून राहिलेली आहे.

राष्ट्रवादी व शिवसेनेचा पगडा असलेल्या या मतदारसंघावर कधीकाळी काँग्रेसचे वर्चस्व होते मात्र काळाच्या ओघात मतदार संघातील संदर्भ बदलत गेले आणि त्याअनुषंगाने विजयाची समीकरणेही बदलली . महायुतीमध्ये जागा वाटपात लांबलेला संघर्ष मिटल्यानंतर अखेरच्या क्षणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर रिंगणात उतरलेल्या भाजपा आमदार राणा जयजित सिंह यांच्या पत्नी अर्चना पाटील यांच्यासाठी महायुतीचे राज्यातील नेते प्रयत्नाची पराकष्टा करत असतानाच त्यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही बुधवारी प्रचार सभा होत आहे. यावरून हा मतदारसंघ जिंकण्यासाठी सत्ताधारी महायुती प्रयत्न लक्षात येत आहेत.







**रणसंग्राम लोकसभेचा ; लक्षवेधी लढत**

**धाराशिव(उस्मानाबाद) मतदारसंघ**

या निवडणुकीत एकूण ३१ उमेदवार रिंगणात असलेतरी दिर भावजय मध्ये दुरंगीच सामना होणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे भाऊसाहेब आंधळकर किती मतदान घेतील?, केवळ इतक्यापुरतीच त्यांचे अस्तित्व असल्याची चर्चा आहे

धाराशिव लोकसभेतर्गत औसा आणि तुळजापूर विधानसभा भाजपकडे, उमरगा आणि परांडा हे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे आणि उस्मानाबादचे आमदार कैलास पाटील उद्धव ठाकरे गटाचे आहेत. तर बार्शीमधून अपक्ष आमदार राजेंद्र राऊत हे भाजपासमवेत आहेत. एकुण ६ पैकी ५ आमदार महायुतीकडे आहेत .त्याशिवाय या ठिकाणचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे निकटवर्तीय व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बसवराज पाटील यांनीही चव्हाण यांच्या पाठोपाठ भाजपात प्रवेश केल्याने काँग्रेसमध्ये खिंडार पडले आहे

धाराशिवमध्ये लोकसभेतील भाऊबंदकीचा दुसरा अध्याय या लढतीच्या निमित्ताने लिहिला जाणार आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वी शिवसेनेत फूट पडल्यानंतरही उद्धव ठाकरे गटाशी एकनिष्ठ राहिलेल्या खासदार ओमराजे निंबाळकर यांनाच महाविकास आघाडी कडून उमेदवारी मिळेल हे निश्चित होते मात्र विरोधी सत्ताधारी महायुतीत ही जागा कोणाच्या वाटेला जाते ?याबाबत चुरस लागून होती.

राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचे पुतणे धनंजय सावंत हे ही निवडणूक लढविण्यासाठी पासून तयारी केलेली होती त्यामुळे शिंदे गटाकडून त्यासाठी खूप प्रयत्न करण्यात आले मात्र अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने हा आपला परंपरागत मतदारसंघ असल्याचे पटवून देत ही जागा आपल्या हिस्सात घेतली. मात्र त्यांच्याकडे तुल्यबळ उमेदवार नसल्यामुळे शेवटच्या क्षणी भाजपाने ती गरज पूर्ण केली. पवार यांचे नातेवाईक असलेल्या भाजपाचे आमदार राणा जगजितसिंह यांनी पक्षात प्रवेश करून निवडणूक लढवावी असा पवार गटाकडून प्रस्ताव होता मात्र राणांनी तो मान्य न केल्याने त्यांची पत्नी अर्चना पाटील यांचा राष्ट्रवादीत प्रवेशाचा कार्यक्रम करण्यात आला. त्यांच्या हाती घड्याळ देऊन त्यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यांचे चुलत दीर ओमराजे यांचा दांडगा जनसंपर्क, आक्रमकता आणि लोकांची अचूक नस पकडणे हा प्लस पॉइंट आहे शिवाय शरद पवार आणि उद्धव ठाकरेंप्रतीची सहानुभूती त्यांना पोषक ठरणारी आहे. दुसरीकडे राणा जगजीत सिंह हे सुद्धा आक्रमक नेते आहेत. फडणवीसांसोबत अजित पवार आणि शिंदेंची ताकद एकत्रितपणे मिळाल्याने ही लढत तुल्यबळ बनली आहे.

दोन वेळा विधानसभा निवडणुकीत आमनेसामने झाल्यानंतर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतही ओम राजेनिंबाळकर विरुद्ध राणाजगजितसिंह पाटील यांच्यात सामना झाला होता. राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवताना त्यांना ओमराजे निंबाळकरकडून सव्वा लाख मतांनी पराभव स्वीकारावा लागला होता. त्यामुळे लोकसभेनंतर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करून तुळजापूर मतदारसंघातून विधानसभेला निवडून आले.गेल्या पराभवाचा वचपा काढण्याची संधी त्यांना आले असून ते कितपत यशस्वी ठरतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरले आहे.

**खा. ओमराजे निंबाळकर यांच्या सकारात्मक बाजू**

- मतदारसंघातील दांडगा जनसंपर्क व भावनिक करणारी वक्तृत्वशैली
- निष्ठावंत शिवसैनिक व शरद पवार गटांच्या कार्यकर्त्यांची साथ

**नकारात्मक बाजू**

- मतदारसंघातील प्रलंबित समस्या
- शिवसेनेतील फुटीमुळे मतविभागणीची शक्यता

**अर्चना पाटील यांच्या सकारात्मक बाजू**

- महायुतीची प्रचारासाठीची तगडी फौज
- स्थानिक स्वराज्य संस्थांतील कामाचा अनुभव

**नकारात्मक बाजू**

- महायुतीअंतर्गत गटबाजी व नाराजी
- आयात करून उमेदवारी दिल्याने राष्ट्रवादीत नाराजी

# रविवार ठरला प्रचारवार



## मॉर्निंग वॉक, पदयात्रा, संवाद बैठकाचा सपाटा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२८ एप्रिल-**

मुंबईकरांच्या 'संडे मुडच' उपयोग करीत राजकीय पक्षांनी प्रचाराचा धुरळा उडाला उडविला. सत्तारूढ महायुती व महाविकास आघाडीच्या नेत्यांनी विभाग वार पदयात्रा, रॅली, कोपरा सभा, बैठका घेत जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न केले.

मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी आज उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार ॲड उज्ज्वल निकम यांच्यासाठी सकाळी कार्टर रोड, जुहू उद्यानात, प्रोमोनाड येथे मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांशी संवाद साधला.

तर त्यानंतर वांद्रे पश्चिम येथील - सी साईड सोसायटी - वाय एम सी अे - शुभशांती सोसायटी - न्यु हनुमान नगर - गुलाब नगर - अमन गुल पठाण चाळ - च्युईम व्हिलेज रोड - प्यारी नगर - गोविंद पाटील मार्ग - इवनटाईड सोसायटी - गुलाब नगर - च्युईम व्हिलेज रोड - मामा हॉटेल - महेलसिंग कंपाऊंड.. या भागात पदयात्रा केली. दुपारी काही रविवार निमित्ताने विविध समाजाचे जे कार्यक्रम आयोजित करण्यात आले त्यामध्ये सहभागी झाले. तर विलेपार्ले येथे जिल्हा अध्यक्ष, मंडल अध्यक्ष, वॉर्ड अध्यक्षांची बैठक घेण्यात आली. संध्याकाळी उत्तर मुंबईचे महायुतीचे उमेदवार पियुष गोयल यांच्या बोरिवली येथे आयोजित प्रचार यात्रेत आमदार अँड आशिष शेलार सहभागी झाले होते. तर त्यानंतर वांद्रे पश्चिम येथील काही भागात त्यांनी संवाद बैठका घेतल्या. तर सांताक्रूझ आणि कुर्ला विधानसभा पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : House of People (Loksabha Election) -2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending criminal cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 42-Solapur (SC) Parliamentary Constituency | Ram Vitthal Satpute | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) & of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | 1) Joint Civil Judge & J.M.F.C. Pune, SCC 24046/2017<br>2) 18 J.M.F.C. Pune, RCC 3496/2018<br>3) 18 J.M.F.C. Pune, SCC 420188/2013<br>4) 6-9 Jt. C.J.J.D & J.M.F.C. Solapur, SCC 6277/2023 | 1) IPC 147, 143, 323, 353, 504, 34, BPA 37(3) R W 135<br>2) IPC 143, 147, 149, 323, 336, 341, BPA 135<br>3) IPC 143, 147, 149, 323, 504<br>4) IPC 336, 188, 269, 270, MPA 135 DMA 51(B) | NIL | NIL | NIL |

Name of constituency : **42 - Solapur (SC) Parliamentary Constituency**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule**
**President, Bharatiya Janata Party, Maharashtra**



**जनहितार्थ जारी**

**मतदान हा तुमचा हक्क आहे. तो योग्य करण्याचा प्रयत्न करा**



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# काँग्रेसचा रडीचा डाव उधळला

काहीही झाले तरी मतदार आपल्याला कौल देणार नाहीत, याची खात्री असल्याने निवडणुकीच्या वर्षभर आधीच काँग्रेसने रडीचा डाव खेळायला सुरुवात केली होती. प्रत्यक्ष रणमैदानात आपण भारतीय जनता पार्टी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पराभूत करू शकत नाही, याची पुरेपूर जाणीव असल्याने काँग्रेसने देशात अपप्रचार सुरू केला होता. निवडणुकांमध्ये मतदान हे यंत्रांद्वारे अर्थात ईव्हीएमच्या माध्यमातून न घेता ते मतपत्रिकांद्वारे घ्यावे, अशी मागणी काँग्रेसने लावून धरली होती. हिंमत असेल तर मतपत्रिकेच्या माध्यमातून निवडणुका लढवून दाखवाव्या, असे आव्हानही काँग्रेसने भाजपाला दिले होते. कारण नसताना ईव्हीएमबाबत अपप्रचार सुरू करून मतदारांच्या मनात संभ्रम पसरविण्याचे कारस्थान काँग्रेसने केले. पण, त्याला यश आले नाही. शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएमबाबतच्या सर्व याचिका फेटाळून लावताना जुनी स्थिती आता येणार नसल्याचे स्पष्ट केल्याने काँग्रेसने सुरू केलेला रडीचा डाव आपोआप उधळला गेला आहे. स्वत:ची सत्ता असताना जनहिताची कोणतीही कामे केली नाहीत, सेक्युलॅरिझमच्या नावावर देशात, जातीय दुहीची बीजं पेरली, धर्माच्या नावावर मुस्लिमांच्या मनात हिंदूंबाबत दहशत निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला, देशात सामाजिक सौहार्द कायम टिकणार नाही यासाठीच सत्तेचा उपयोग केला आणि स्वत:ची राजकीय पोळी शेकून घेतली, हे आता जनतेला चांगले कळले आहे. ईव्हीएमचे बटन दाबून मिळालेल्या मतांशी व्हीव्हीपॅटमधील चिठ्ठ्यांची जुळवणी करण्याची मागणी सुप्रीम कोर्टाने फेटाळून लावल्याने शंका घेणाऱ्यांना जबरदस्त चपराक बसली आहे. ईव्हीएममध्ये कुठल्याही प्रकारची छेडछाड होऊ शकते, ही बाब सुप्रीम कोर्टाने फेटाळून लावल्याने शंका घेणाऱ्यांचे पितळही उघड पडले आहे. ईव्हीएमबाबत उपस्थित करण्यात आलेले सर्व प्रश्न फेटाळून लावतानाच बॅलेट पेपरद्वारे मतदान घेण्याची जुनी व्यवस्था अंमलात आणली जाऊ शकत नसल्याचेही कोर्टाने स्पष्ट केल्याने देशात उर्वरित टप्प्यांमधील मतदान ईव्हीएमद्वारेच पार पडण्याचा मार्गही मोकळा झाला आहे. व्यवस्थेच्या कोणत्याही पैलूवर डोळे बंद करत अविश्वास व्यक्त केल्याने विनाकारण संभ्रम निर्माण होतो आणि विकासाच्या मार्गात अडथळे येतात, असे जे न्यायालयाने म्हटले आहे, ते सत्य आहे. ज्या व्यवस्थेच्या भरवशावर काँग्रेसने कर्नाटक, तेलंगणा आणि हिमाचल प्रदेशात झालेल्या विधानसभेच्या निवडणुका जिंकल्या, त्याच व्यवस्थेवर आता लोकसभेच्या निवडणुकीत अविश्वास व्यक्त करून काँग्रेसने देशात संशयाचे वातावरण तयार करीत पराभवाच्या भीतीने आलेले नैराश्यच प्रदर्शित केले आहे. २०१४ आणि २०१९ अशा सलग दोन निवडणुकांमध्ये मतदारांनी काँग्रेसला सपशेल नाकारले, मोदींना स्वीकारले. मोदींनी जनतेचा विश्वास सार्थ ठरवत आता २०२४ मध्ये विजयाची हॅट्‌ट्रिक करण्याचा केलेला संकल्प आणि त्याला मिळत असलेला मतदारांचा प्रतिसाद काँग्रेसच्या पायाखालची वाळू सरकवणारा आहे. स्वत: निवडणुका जिंकल्या तर मतदान यंत्र चांगले आणि पराभव पत्करावा लागला तर यंत्रात दोष, अशी दुटप्पी भूमिका काँग्रेसने घ्यायला नको. पण, सत्तेबाहेर राहून कासावीस झालेल्या काँग्रेसने काहीही करून मोदींना, संघाला आणि भाजपाला बदनाम करण्याचा विडाच उचललेला दिसतो. नकारात्मक भूमिका घेतली तर आपण जनतेची दिशाभूल करून मोदींना पराभूत करू शकतो, अशी विकृत मानसिकता बनवून घेतलेल्या काँग्रेसला सततच्या पराभवातून काहीच शिकता आले नाही, हे स्पष्ट झाले आहे. प्रादेशिक पक्षांची कुबडी घेऊन निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या काँग्रेसला यंदाही मोठ्या पराभवाचा सामना करावा लागणार आहे. निवडणुकांची घोषणा होण्याआधीच पंतप्रधान मोदी आणि भाजपाने प्रचाराचे मैदान गाजवत काँग्रेसला घटनाक्रमाचा अंदाज दिलाच होता. काँग्रेस अंधारात चाचपडत असताना मोदींनी लख्ख प्रकाशात 'अब की बार चार सौ पार' असा नारा देत देशात चैतन्य निर्माण केले होते. मोदींच्या या नाऱ्यामुळे काँग्रेससह विरोधी पक्षांवर एकप्रकारचे मानसिक दडपण आले आणि भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये तसेच मोदी समर्थकांमध्ये उत्साह संचारल्याचे देशाने पाहिले. ४०० जागा मिळाल्या तर जनतेला जी आश्वासने दिली आहेत, ती पूर्ण करता येतील, ही भूमिका मोदींनी पंतप्रधान या नात्याने स्पष्ट केली असल्याने काँग्रेसकडून घटना बदलाचा जो आरोप केला जात आहे, त्यावर कुणीही विश्वास ठेवायला तयार नाही. भाजपाने ४०० जागा जिंकण्याची घोषणा हवेत केलेली नाही. गेल्या १० वर्षांत मोदी सरकारने विकासाची जी प्रचंड कामे केलीत, त्याआधारेच भाजपाकडून मते मागितली जात आहेत. संपूर्ण देशभर मोदीमय वातावरण आहे. पहिल्या दोन टप्प्यांत मतदानाची टक्केवारी कमी झाली असली, तरी कौल भाजपालाच मिळणार, हे उघड आहे. मतांचा टक्का घसरला म्हणून काँग्रेस व इतर विरोधकांनी आनंदित होण्याची आवश्यकता नाही. कमी मतदानाचा फटका विरोधी पक्षांनाही बसू शकतो, याचा त्यांना विसर पडतोच कसा? नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासूनच देशात काँग्रेस आणि विरोधी पक्षांकडून अपप्रचार सुरू आहे. मोदी आता घटना बदलणार आहेत, संविधान बदलले तर देशात पुन्हा निवडणुकाच होणार नाहीत, ही शेवटची निवडणूक ठरेल, अशा वावड्या उठवून जनतेत संभ्रम निर्माण करायचा आणि स्वत:ची राजकीय पोळी शेकायची, हा काँग्रेसचा धंदा आता जनता कायमचा बंद पाडणार, हेही स्पष्ट दिसते आहे. काँग्रेसची केंद्रात सत्ता असताना घटनेत ८० वेळा दुरुस्त्या करण्यात आल्या, याचा सोयीस्कर विसर जर राहुल गांधी आणि त्यांच्या साथीदारांना पडला असेल तर मतदार निवडणुकीतून त्यांना जागा दाखवून देतील, हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. एवढ्या संख्येत घटनेत दुरुस्त्या करण्याची काँग्रेसला आवश्यकताच काय होती? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी घटना तयार केली, ती बदलण्याचा प्रश्नच येत नाही, बदलण्याचा अधिकारही कुणाला नाही. पण, सरळ मार्गाने निवडणुका जिंकता येत नाही आणि जिंकल्या नाही तर सत्ता मिळणार नाही, या भयगंडाने ग्रासलेल्या काँग्रेस आणि विरोधकांनी आता अपप्रचाराचे शस्त्र हाती घेत स्वत:च घटनेची पायमल्ली सुरू केली आहे. अपप्रचार करणे हे घटनेच्या विरोधात आहे. जी गोष्ट कधी घडूच शकत नाही अशा गोष्टीबाबत जनतेत संभ्रम निर्माण करणे, हा खरे तर राष्ट्रद्रोह मानला पाहिजे. सातत्याने मोदी, संघ आणि भाजपाला शिव्या घालण्यापेक्षा जनतेच्या हितासाठी आपण काय करणार आहोत, कोणत्या प्रभावी योजना राबविणार आहोत; तो सविस्तर कार्यक्रम जर काँग्रेस आणि विरोधकांनी जनतेपुढे सादर केला तर जनता सकारात्मक प्रतिसाद देऊ शकते. पण, कायम नकारात्मक भूमिका घेत दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलात तर मतदार जागा दाखवून देतात, याचा अनुभव वारंवार घेऊनही काँग्रेसचे चरित्र सुधारत कसे नाही, याचेही आता आश्चर्य वाटेनासे झाले आहे. निवडणुका म्हटल्या की आरोप आणि प्रत्यारोप आलेच. लोकशाहीत त्याला स्थानही आहे. पण, आरोप करताना मर्यादांचे पालन केले गेले पाहिजे. राजकीय पक्षांची जी विश्वसनीयता आहे, ती टिकून राहिली पाहिजे. विश्वसनीयता टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान आज आपल्या लोकशाहीपुढेही उभे ठाकले आहे. सत्तेचा अमरपट्टा कुणीही घेऊन आलेले नाही. स्वातंत्र्यानंतर ६० वर्षे काँग्रेसने अनिर्बंध सत्ता गाजवली. सत्ताकाळात केलेल्या चुकांचे फळ मतदारांनी काँग्रेसला दिले. भाजपाला परिश्रमाचे फळ दिले. सत्ता मिळाली त्याचा उपयोग भाजपाने देशाच्या प्रगतीसाठी आणि जनतेच्या कल्याणासाठी केल्याने सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळेल, याचा विश्वास भाजपाला वाटतो आहे. या विश्वासातूनच मोदींनी 'चार सौ पार' हा नारा दिला आहे. भाजपाच्या पारड्यात किती जागा टाकायच्या याचा फैसला शेवटी सार्वभौम जनताच करणार आहे. काँग्रेसने अपप्रचार करून स्वत:ची विश्वसनीयता गमावण्याचे कारण नाही.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# मालदीववर चीनचा कब्जा!

एकेकाळी भारताशी मित्रत्वाचे संबंध असणाऱ्या मालदीववर चीनने ताबा मिळविण्याची प्रक्रिया अखेर पूर्ण झाली. भारतविरोधी भूमिका घेत मालदीवचे राष्ट्रपतिपद जिंकणाऱ्या मोहम्मद मुईझ्झू यांनी देशाच्या संसदीय निवडणुकीतही प्रचंड बहुमत मिळविले. मुईझ्झू यांनी काही महिन्यांपासून भारतविरोधी भूमिका घेतली होती. मालदीवची जनता यावर आपली नाराजी नोंदवील, असा एक कयास भारतात नोंदविला जात होता. मात्र, मालदीवच्या जनतेने आपल्या राष्ट्रपतींच्या भारत विरोधी भूमिकेवर एकप्रकारे शिक्कामोर्तब करीत मुईझ्झू यांच्या पीपल्स नॅशनल काँग्रेसला ९३ सदस्यांच्या पीपल्स मजलिसमध्ये पूर्ण बहुमत दिले. चीन समर्थक राष्ट्रपतींच्या पक्षाने जवळपास ९३ पैकी ६८ जागा जिंकल्या आहेत आणि भारत समर्थक मानल्या जाणाऱ्या मालदीव डेमोक्रॅटिक पार्टीला फक्त १५ जागा मिळाल्या आहेत.

**चीन समर्थक** : राष्ट्रपती मुईझ्झू यांना चीन समर्थक मानले जाते. त्यांनी उघड उघड भारतविरोधी भूमिका घेत मालदीवमध्ये तैनात भारतीय सैनिकांच्या ८० सदस्यीय तुकडीला देश सोडण्याचा आदेश दिला होता. चीनच्या इशाऱ्यावरून त्यांनी हे टोकाचे भारतविरोधी पाऊल उचलले होते. संसदीय निवडणुकीलाही त्यांनी भारतविरोधी मोहिमेचे एक माध्यम बनविले होते. 'आज तुम्ही जे मत टाकणार आहात, ते उद्या मालदीवचे भवितव्य ठरविणार आहे. मालदीवला कुणाचा गुलाम करावयाचे की मालदीवचे सार्वभौमत्व अबाधित ठेवायचे याचा निवाडा तुम्हाला करावयाचा आहे,' अशी भूमिका त्यांनी घेतली होती. आणि, दुर्दैवाने मालदीवच्या मतदारांनी त्यांच्या या भारतविरोधी भूमिकेवर शिक्कामोर्तब केले. राजधानी मालेमधील मतदारसंघातही मुईझ्झू यांच्या पक्षाला विजय मिळाला आहे.

**संसदेचे महत्त्व** : मालदीवच्या शासन व्यवस्थेत संसदेला महत्त्वाचे स्थान आहे. राष्ट्रपतींची निवड थेट मतदानाने होत असली, तरी राष्ट्रपतींना स्वतंत्र निर्णय घेण्याचा अधिकार नाही. त्यासाठी संसदेची स्वीकृती आवश्यक असते. मालदीव संसदेत दोन तृतीयांश बहुमत मिळाल्यानंतर राष्ट्रपती मुईझ्झू यांना आपली भारतविरोधी व चीनसमर्थक भूमिका रेटणे सोपे जाणार आहे. आजवर त्यांच्या पक्षाला, आघाडीला संसदेत बहुमत नव्हते. विशेषत: मालदीवमधील भारतीय सैन्य माघारी बोलाविले जावे, या मुईझ्झू यांच्या भूमिकेला, तेथील संसदेने स्वीकृती दिली नव्हती. आता त्यांना संसदेचा कोणताही अडसर राहिलेला नाही.

**तणाव वाढला** : भारतातील काही समाजमाध्यमांनी मालदीवच्या बहिष्काराची मोहीम सुरू केल्यानंतर मालदीव सरकारने भारताच्या विरोधात



अधिक आक्रमक होण्याचा निर्णय घेतला होता. मालदीवच्या काही मंत्र्यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान केले होते. नंतर त्यांनी ते मागेही घेतले. भारत-मालदीव संबंध ताणले गेले असताना या घटनेने हा तणाव अधिक वाढला होता.

**चीनची गुंतवणूक** : चीनने मालदीवमध्ये मोठी गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. मालदीवमध्ये काही पायाभूत प्रकल्प उभारण्याचा निर्णय चीनने घेतला असून त्यासाठी ही गुंतवणूक असल्याचे सांगितले जाते. चीन पायाभूत प्रकल्पात गुंतवणूक करण्याचे आमिष मालदीवला दाखवित असून नंतर तो मालदीववर लवकरच कब्जा मिळविल, असे मानले जात आहे. मालदीवमधील हे निकाल भारतासाठी निराशाजनक ठरणारे आहेत. भारताच्या दक्षिणेत अतिशय महत्त्वाच्या व मोक्याच्या ठिकाणी असणाऱ्या मालदीववर चीनचा ताबा होणे ही बाब भारतासाठी निश्चितच चिंताजनक असल्याचे माजी लष्करी अधिकाऱ्यांना वाटत आहे. श्रीलंका भारतविरोधी भूमिका घेत असताना, मालदीवही चीनच्या कह्यात जाणे साधारण घटना मानली जाणार नाही, असे या अधिकाऱ्यांना वाटत आहे. भारतानेही मालदीवमध्ये चांगली गुंतवणूक केली आहे. मालदीवची अर्थव्यवस्था पर्यटनावर आधारित असून भारतातून सर्वाधिक विदेशी पर्यटक मालदीवमध्ये येत होते. आता भारतातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या घटली असून भारत सहाव्या क्रमांकावर गेला आहे. २०२३ च्या पहिल्या तिमाहीत ५६ हजार भारतीय पर्यटक मालदीवला गेले होते तर २०२४ च्या पहिल्या तिमाहीत फक्त ३४ हजार भारतीय पर्यटक मालदीवला गेले. भारतीय पर्यटकांच्या संख्येत ४० टक्के घट झाली. याचा पुरेपूर फायदा चीनचे उठविला. २०२३ च्या पहिल्या तिमाहीत फक्त १८ हजार चिनी पर्यटक मालदीवला गेले होते तर यावर्षी २०२४ च्या पहिल्या तिमाहीत ६८ हजार चिनी पर्यटक मालदीवला गेले. मालदीव पर्यटनाच्या आकडेवारीत भारत पहिल्या क्रमांकावर तर चीन दहाव्या क्रमांकावर होता. आता भारत सहाव्या क्रमाकांवर गेला असताना चीन मात्र पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे.

**चीनचे प्रयत्न** : भारताला घेरण्यासाठी मालदीववर ताबा मिळविण्याचे जोरदार प्रयत्न चीनकडून मागील काही वर्षांपासून केले जात होते. यासाठी चीनने एक १० कलमी कार्यक्रम राबविला. मालदीवची तहानभूक भागविण्याची चीनची योजना होती. त्यानुसार चीनने मालदीवला १५०० टन पिण्याचे पाणी पुरविले. मालदीव पाण्याने वेढले असले, तरी त्याला पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत असते. हे हेरून चीनने त्याला पिण्याचे पाणी पुरविले. मालदीवमधील रुग्णालयांसाठी रुग्णवाहिका देणगी दाखल देण्यात आल्या. प्रारंभी, २० रुग्णवाहिका देण्यात आल्या होत्या. नंतर त्यात ५० ची भर घालण्यात आली. त्यामुळे मालदीवची जनता खूश झाली. आपल्या देशातील जनतेसाठी घरे बांधण्यासाठी मालदीव गृहनिर्माण विकास महामंडळाने चायना मशिनरी इंजिनीअरिंग कार्पोरेशनसोबत एक करार केला. घरे बांधण्यासाठी आवश्यक असलेले सारे साहित्य चीन पुरविणार आहे. चीन-मालदीव यांच्यात मुक्त व्यापार करार करण्यात आला. याने आपली अर्थव्यवस्था बळकट होईल, असा मालदीवचा खुळा समज आहे.

**रस्ते बांधकाम** : राजधानी मालेमधील सारे रस्ते नव्याने बांधून देण्याचा निर्णय चीनने घेतला. यासाठी चीन मालेकडून कोणताही मोबदला घेणार नाही, असेही सांगण्यात आले. मालदीव सरकार व मालदीवची जनता चीनच्या या प्रलोभनांना बळी पडली असून आपल्या राष्ट्रपतींना भारतविरोध करण्याचा जणू एक जनादेश जनतेने दिला आहे.

**एक आव्हान** : मालदीवमधील घटनाक्रम परराष्ट्रमंत्री डॉ. जयशंकर यांच्यासाठी एक आव्हान ठरणार आहे. मित्र आता शत्रू झाला आहे. त्याला पुन्हा मित्र करण्याचे कसब त्यांना पार पाडावे लागणार आहे. मालदीव एक अतिशय लहानसा देश असला, तरी तेथील ही ताजी घडामोड जागतिक राजकारणातील एक मोठी घटना ठरावी, अशी आहे.

**चीनची प्रतिक्रिया** : मालदीवमधील निकालावर चीनने सावध प्रतिक्रिया दिली आहे. मालदीवच्या जनतेने आपल्या राष्ट्रपतींच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे आणि ही अतिशय चांगली बाब आहे. येणाऱ्या काळात चीन-मालदीव संबंध अधिक बळकट होतील, असे आम्हाला वाटते. चीनची ही प्रतिक्रिया या लहानशा देशात त्याने एकप्रकारे रक्तहीन क्रांती कशी घडविली, हेच सांगत आहे.

## वेध

**अनिरुद्ध पांडे**

# रामनामाचे पवाडे, तुकोबांचे...

*रामनामाचे पवाडे । अखंड ज्याची वाचा पढे ।*
*धन्य तो एक संसारी । रामनाम जो उच्चारी ॥*
*रामनाम गर्जे वाचा । काळ आज्ञाधारक त्याचा ।*
*तुका म्हणे रामनामी । कृतकृत्य जालो आम्ही ॥*

या संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या ओळी. संत साहित्य ही महाराष्ट्राच्या जीवनातील अनन्यसाधारण बाब आहे. ज्या संप्रदायाचे तत्त्वज्ञान संतसाहित्य आविष्कृत करते, तो वारकरी संप्रदाय महाराष्ट्र संस्कृतीचा गाभा आहे. ज्ञानदेवांनी या संप्रदायाची तत्त्वज्ञानात्मक पायाभरणी केली आणि तुकोबा त्यांचे भावकाव्यात्म कळस झाले, असे तुकोबांच्या शिष्य बहिणाबाई यांनी एका रूपकातून मांडले आहे, ते असे,

*संतकृपा झाली । इमारत फळा आली । ज्ञानदेवे घातला पाया । उभारिले देवालया । नामा तयाचा किंकर । तेणे रचिले आवार । जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत । तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥*

हे आपले सारेच संत महाकवीच म्हणावे इतक्या ताकदीचे कवी होते. कबीर, तुलसीदास, सूरदास या हिंदी संतांचा विचार केल्यास भारतवर्षातील सारेच संत हे नुसतेच समाजसुधारक नव्हते, तर महाकवीही होते, हे दिसून येईल. कळसाचे दर्शन घेतले की देवदर्शनाचे पुण्य लाभते, अशी आध्यात्मिक मान्यता आहे. म्हणजे संत तुकारामांचा अभ्यास करा, म्हणजेच कळसाचे दर्शन घ्यायचे असे आहे. महाराष्ट्रातीलच नव्हे, तर आपल्या देशातील सारेच संत प्रभू रामचंद्रांचे निस्सीम भक्त होते. त्यांच्या लिखाणात रामकाव्य, रामभक्ती ठिकठिकाणी डोकावत असते. संत तुकाराम महाराजांच्या अभंगरूपी काव्यातही 'राम' दिसत असतो असाच ठायीठायी. आपल्या मराठमोळ्या तुकोबारायांनी,

*राम कहे सो मुख भला रे । बिन रामसे बीख । रामराम कहे रे मन ।*
*औरसुं नहीं काज । बहुत उतारे पार । आधे राख तुका की लाज ॥*

ही भाषा कुठून आत्मसात केली, हे देवच जाणे. तुकोबांची ही हिंदी भाषा कोणाच्या सहवासामुळे फुलून येते काय माहीत. पण संत परंपरा ही फक्त महाराष्ट्राची नव्हती तर साऱ्या देशाची होती आणि ती एकमेकांशी चांगलीच जुळून होती, हे यावरून दिसते.

देशभरातील संत परंपरा हा एक अभ्यासाचा विषय आहे. इतकेच नव्हे, तर प्रत्येकच संत हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. या प्रत्येक संताचा अभ्यासकांनी स्वतंत्र अभ्यास केला आहे. अनेकांनी संत अभ्यासून डॉक्टरेट मिळविल्या आहेत तर दुसरीकडे एकाच संतावर अनेकांनी प्रबंध लेखन करून डॉक्टरेट मिळविल्या आहेत. संत कबीर हे समाजातील अनिष्ट चालीरीतींवर प्रहार करणारे, राम-कृष्णांचे परमभक्त, लोकांचे कान टोचणारे जगातले सर्वश्रेष्ठ व्यंग्यकार होते, असे हिंदी भाषेतील जाणकार मानतात. हिंदी भाषेत सर्वाधिक डॉक्टरेटचे विषय म्हणजे कबीर, तुलसीदास हे संतच आहेत. मराठीचा विचार केल्यास फारशी वेगळी स्थिती असण्याची शक्यता नाही. नुसतेच संत नाहीत, तर महाकवी संत...!

*खेळ मांडियेला वाळवंटी घाई । नाचती वैष्णव भाई रे ॥*
*क्रोध अभिमान केला पावरणी । एका एका लागतील पायी रे ॥*

असे भक्तीच्या आनंदाबद्दल सांगणारे संत तुकोबाराय सोप्या शब्दांत अभंगातून आपले म्हणणे मांडत. ते आपल्या समकालीन संतांना जगाने संतत्व कसे बहाल केले होते हेसुद्धा आवर्जून श्रद्धेने आणि कौतुकाने सांगतात.

'सिंपियाचा पोर एक खेळीया नामा । तेणे विठ्ठल बसवंत केला रे ।
एक घाई खेळता तो न चुकेचि कोठे । तया संत जन मानवले रे ॥
ज्ञानदेव मुक्ताबाई वटेश्वर चांगा । सोपान आनंदे खेळती रे ॥
रामा बसवंत कबीर खेळीया । जोडा बरसा मिळाला रे ॥
ब्राह्मणाचा पोर खेळीया एका भला । तेणे जन खेळकर केला रे ॥'

या शब्दांत तुकोबा संत परंपरेबद्दल सांगतात. हे सारेच संत राम व कृष्ण या आपल्या देवतांप्रती फारच श्रद्धाळू आणि हळवे होते.

रामरूप केली । रामे कौसल्या माउली ॥ राम राहिला मानसी । ध्यानी चिंतनी जयासी॥ राम होय त्यासी । संदेह नाही भरवसा ॥ ऐसा नित्य राम ध्याय । तुका वंदी त्याचे पाय ॥ अशी भावनाप्रधान तुकोबारायांची भक्ती, श्रद्धा आहे रामाप्रती.

'रामराम उत्तम अक्षरे । कंठी धरिली आपण शंकरे । कैसी तारक उत्तम तिही लोकां । हलाहल शीतल केलें शिवा देखा ॥' किंवा 'राम म्हणतो काम क्रोधांचे दहन । होय अभिमान देशोधडी ॥ राम म्हणता तुटेल भावबंधन । नये श्रम सीण स्वप्नास ही ॥' असे अभंग 'तुकाराम गाथे'त ठायीठायी आहेत. सर्वच भारतीय संतांनी प्रभू रामचंद्रांचा आदर्श भक्तिभावाने समाजासमोर ठेवला आहे आणि समाजानेही तो आत्मसात केला आहे, निरंतर.

९८८१७१७८२९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# बोलाचीच कढी, बोलाचाच भात!

सध्या निवडणुकांमुळे सर्वत्र विविध पुढाऱ्यांची भाषणे सुरू आहेत. भ्रष्टाचारामध्ये आकंठ बुडालेला म्हणतो की, भ्रष्टाचार ही देशाला लागलेली कीड आहे. ज्यांनी शेजाऱ्या-पाजाऱ्यांची, मित्रांची-नातेवाईकांची साधी साधी कामे केलेली नाही तो म्हणतो की, युवकांनी स्वतःला समाजसेवेसाठी झोकून द्यावे. चौकामध्ये एखादे भांडण झाले किंवा थोडीशी गर्दी जमा झाली तर जो ती गर्दी पाहूनच पळून जातो, असे लोक म्हणतात, युवकांनी सैन्यामध्ये सामील व्हावे. जे दैनंदिन चालणाऱ्या कामात दैनंदिन सहभाग सोडाच; परंतु ज्यांचा साप्ताहिक, मासिक सहभागही राहत नाही असे लोक दैनंदिन कार्य करणाऱ्या लोकांना दैनंदिन कार्याचे महत्त्व, ते करण्याची आवश्यकता समजावून सांगणारे भाषण करतात. बेशिस्त लोक शिस्तबद्धतेच्या गोष्टी सांगताना दिसतात. 'नाव सोनूबाई हाती कथलाचा वाळा' अशा स्वरूपाची एक म्हण प्रचलित आहे. 'नाव समशेर बहाद्दर आणि माणूस अगदीच भेकड' अशा पद्धतीचे अनेक विरोधाभास आपल्याला समाजामध्ये दिसतात. म्हणूनच 'बोलाचीच कढी बोलाचाच भात, जेवूनिया तृप्त कोण झाला?' असे म्हणावेसे वाटते.

पूर्वीच्या काळी 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' असे म्हटले जात होते. कारण समाजामध्ये असे अनेकानेक प्रकारांचे आदर्श होते; ज्यांचे जीवन, ज्यांचे वागणे आणि ज्यांचे बोलणे हे समाजासाठी आदर्श होते. आजच्या भाषेत ज्यांना 'रोल मॉडेल' म्हणता येईल अशा पद्धतीचे हे लोक होते. समाज नेहमी अशाच लोकांचे अनुसरण करीत असतो. प्रत्येक क्षेत्राला एका श्रेष्ठ आदर्शाची आवश्यकता असते. 'देखणी ती पाऊले जी स्वस्तिपद्मे चालती,' असेही म्हटले गेले आहे. अशा पावलांच्या मागून चालण्यामध्ये समाजाला नेहमीच धन्यता वाटत आलेली आहे.

स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये ज्यांनी नि:स्वार्थपणे देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले बलिदान केले अशांच्या जीवनाकडे पाहून, त्यांच्या त्यागाकडे पाहून समाजातून हजारो लोक स्वातंत्र्याची प्रेरणा घेऊन उठले. देशाच्या स्वातंत्र्याकरिता बलिदान करणाऱ्या क्रांतिवीरांना विश्वास होता की, आमच्या मागून आमचेच भाऊबंद आमच्यासारखेच या मार्गावर पुढे येतील व भारत मातेच्या मुकुटावर स्वातंत्र्याचा कुंकुम तिलक लावतील. 'सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते, उठतील त्या ज्वाळातून भावी क्रांतीचे नेते' अशा पद्धतीचा विश्वास त्यांच्या मनामध्ये होता.

१९४७ साली देश स्वतंत्र झाला आणि त्यानंतर आदर्शांची पडझड सुरू झाली. समाजामध्ये स्वार्थकेंद्रितता मोठ्या प्रमाणावर बळावली. भ्रष्टाचार हा 'शिष्टाचार' झाला. त्यागमय जीवन जगणारे, तत्त्वांनी वागणारे कालबाह्य होऊ लागले. 'चलता है, जमाने के साथ चलो' ही मानसिकता वाढीला लागली. सर्व गोष्टींशी जुळवून घेणारे, हवेप्रमाणे दिशा बदलणारे, सरड्याप्रमाणे रंग बदलणारे हे समाजाचे नेतृत्व करायला लागले. राजकीय नेते म्हणजे सामाजिक कार्यकर्ते अशा पद्धतीचा समज एकेकाळी होता. त्यांची प्रतिमा होता होता एवढी मलिन झाली की, पांढरे कपडे घालणारे राजकीय नेते म्हटले की, हे नक्कीच भ्रष्टाचारी असतील, लांड्यालबाड्या यांनी केलेल्या असतील, असा सर्वसामान्य माणसांचा समज असतो. काहीही शिक्षण नसताना, अंगी विशेष कोणती योग्यता नसताना हे लोक मोठमोठ्या पदांवर जाऊन बसतात कसे, हा प्रश्न सर्वसामान्य माणसाला नेहमी सतावत राहिलेला आहे. हुशार लोकांना लाळघोटेपणा, हाजी-हाजी करूनच आपली हुशारी सिद्ध करावी लागते. तरीही सर्वसामान्य माणूस यांच्याकडे कानाडोळा करून आपले दैनंदिन जीवन जगण्यासाठी आवश्यक तो संघर्ष करीत राहतो. परंतु, ज्या वेळेस अशा लोकांकडून लोकांचे मार्गदर्शन केले जाते त्यावेळेला मात्र लोकांना कपाळाला हात लावण्याची वेळ येते.

युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद म्हणायचे की, 'मला शंभर तरुण द्या. मी देशाचा चेहरामोहरा बदलवून दाखवतो.' तरुणांमध्ये परिवर्तन आणण्याची शक्ती असते. या शक्तीला जर योग्य दिशा दिली गेली तर त्यातून समाजामध्ये, देशामध्ये योग्य प्रकारचे परिवर्तन घडून येते. तरुण वयात जर विचारांना योग्य दिशा मिळाली तर त्या विचारांसाठी जीवन समर्पित करण्याची, झोकून देण्याची मानसिकता तरुणांची असते.

आपल्या देशामध्ये आज अनेक संघटना चांगले काम करीत असताना दिसून येतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, स्वाध्याय परिवार, स्वामी नारायण परिवार अशा अनेक संस्थांची नावे घेता येईल. यामध्ये एकापेक्षा एक चांगले कार्य करणारे लोक दिसून येतात. यामध्ये सहभागी झालेली प्रत्येक व्यक्ती आपल्यापेक्षा ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कार्य करणाऱ्या व्यक्तीला जेव्हा पाहते, त्यावेळेस त्याला त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे, कार्याचे, त्यागाचे आकर्षण वाटते व त्यालाही वाटते की, आपणसुद्धा असेच कार्य केले पाहिजे. 'एक दीप से जले दुसरा, दुसरे से जलते अनेक' अशा पद्धतीने श्रेष्ठ कार्याचा हा वसा एकाने दुसऱ्याला, दुसऱ्याने तिसऱ्याला देण्याचे काम अव्याहतपणे सुरू राहते. ज्या देशामध्ये नि:स्वार्थपणे काम करणारे असे हजारो तारकापुंज जीवन जगत राहतील, त्या देशामध्ये आदर्शांची कमतरता पडणार नाही.

'मेरी झांसी नहीं दूंगी' म्हणणारी झाशीची राणी, हिंदवी स्वराज्याची प्रतिज्ञा घेणारे छत्रपती शिवाजी महाराज, मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी आपले जीवन समर्पित करणारे महाराणा प्रताप, भारताच्या आध्यात्मिक उत्थानासाठी प्रयास करणारे स्वामी विवेकानंद असे अनेकानेक आदर्श भारतासमोर उभे आहेत. अशा भारताला व भारतीय समाजाला आदर्शांची वानवा पडू नये. समाजाने आपल्या आदर्शांच्या बाबतीत जागरूक राहिले पाहिजे. सिनेमातील नट-नट्या हे अभिनयाचे आदर्श राहू शकतात, जीवनाचे नव्हे. जुगाराची जाहिरात करणारे खेळाडू हे कदाचित खेळाडू म्हणून आदर्श असतील, परंतु जीवनाचे आदर्श ते नाहीत, हे तरुणांनी ओळखले पाहिजे. सामाजिक संस्थांनी आपल्या कार्यकर्त्यांचे प्रबोधन करताना ज्यांचे जीवन त्या कार्यासाठी समर्पित आहे अशाच योग्य व्यक्तींना पुढे आणले पाहिजे; जेणेकरून त्यांच्या जीवनाकडे पाहून इतरांच्या मनात नि:संदेह समाजभक्तीचा दीप उजळेल व 'बोलाचीच कढी...' असे म्हणण्याची पाळी येणार नाही.

९५५२५३५८१३
(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### सायबर गुन्ह्याची नवी तऱ्हा

२५ एप्रिल २०२४ रोजी माझ्या कौटुंबिक संबंधित महिलेला २० हजार रुपयांचा फटका बसला. त्यांच्या मोबाईलवर एका व्यक्तीने मी मुंबई पोलिसशी संबंधित असून दवाखान्यात माझ्या पत्नीच्या उपचारासाठी आलो असून तेथे पैसे भरताना ते चुकीने तुमच्या बँक खात्यात जमा झाल्याचे सांगितले. महिलेच्या रजिस्टर्ड मोबाईलवर बँकेचा २० हजार रुपये जमा झाल्याचा एसएमएसदेखील आला. अशा वेळी संभ्रमित व्यक्ती एसएमएस, मोबाईल नंबरने आला की बँकेने पाठवला, हे नेमके पडताळून पाहात नाही. तसेच संभाषण करणाऱ्या व्यक्तीच्या बोलण्याच्या पद्धतीमुळे भ्रमित होते. संबंधित व्यक्ती महिलेला, पैसे ताबडतोब पाठवा. कारण पैसे वैद्यकीय कारणासाठी जमा करायचे आहेत, असे सांगत होती आणि मी मुंबई पोलिसवाला असल्याचे सांगून जरबेने बोलत होती. त्यामुळे महिलेने २० हजार रुपयांचे पेमेंट मोबाईलद्वारे केले. तद्नंतर त्या गृहस्थाने, 'अहो ३० हजार रुपये आणखी चुकीने तुमच्या खात्यात आले आहेत; ते परत करा,' असे सांगितले. हे ३० हजार रुपये बँकेत क्रेडिट झाल्याचा एसएमएसही महिलेला आला. परंतु, यावेळी त्यांना शंका आल्याने ३० हजार रुपये पाठवले नाहीत. शेजाऱ्यांशी सल्लामसलत केल्यावर आपल्याला २० हजार रुपयांचा फटका बसल्याचे त्यांना जाणवले. नंतर बँकेत चौकशी केली असता खात्यात २० हजार रुपये क्रेडिट झाल्याची नोंद नव्हती; मात्र २० हजार रुपये डेबिट झाले होते. म्हणजेच बँक खात्यात पैसे क्रेडिट झाल्याचा जो एसएमएस आला होता; तो खोटाच तयार केला गेला होता. हे खरे आहे की, बऱ्याचदा व्यक्ती आपल्या रजिस्टर्ड मोबाईलवर बँकेकडून आलेल्या एसएमएसला पडताळून न पाहता संभ्रमावस्थेमुळे अशाप्रसंगी गुन्ह्यांची बळी ठरते. सध्या बँक या प्रकरणाची चौकशी करीत आहे. नेहमीप्रमाणे गुन्हेगाराच्या मोबाईल नंबरवर नंतर, संपर्क बंद झाला आहे, असा निरोप येत होता. अशा प्रकरणात एक काळजी अवश्य घ्यावी की, अपरिचित व्यक्तीने माझे पैसे तुमच्या खात्यात आल्याचे सांगितले तर प्रत्यक्ष बँकेत चौकशी करावी आणि त्या आधी अपरिचितास ठणकावून सांगावे की, तुम्हीच या व्यवहारासंबंधात तुमच्या संबंधित बँकेशी संपर्क करावा आणि पैसे पाठवू नये.

**राम राजे**/९४२१७७९९४५

## वाचक पत्रे

### ...अन् कार्यकर्ते फिरकलेच नाही

'मतदानाबाबत नागपूरकरांचा निरुत्साह' अशा आशयाची एक बातमी नागपूर तथा रामटेकच्या प्रमुख उमेदवारांच्या मतदान केलेल्या छायाचित्रांसह आपल्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली. भाजपा हा शिस्तबद्ध कार्यकर्त्यांचा पक्ष आहे असे म्हटले जाते; पण ती शिस्तबद्धता अलिकडे बघायला मिळत नाही. यापूर्वी अगदी वॉर्डाची निवडणूक असली, तरी त्या वॉर्डातील बुथ प्रमुख व कार्यकर्ते मतदान केले की नाही, याची घरोघरी जाऊन शहानिशा करीत. पण अलिकडे हे दिसत नाही. नेत्यांसोबत फोटो काढण्यातच जबाबदार कार्यकर्ते दिसून येतात. गल्लोगल्ली नेतेच तयार करून ठेवले तर कार्यकर्ते राहतील कुठे? आरोग्य शिबिर, चष्मे वाटप, रक्तदान हे प्रकारही आता जुने वाटतात. केवळ समन्वय बैठका काय कामाच्या? मतदानाचा टक्का असाच कमी होत राहिला तर पोलिओ डोजसाठी घरोघरी फिरतात, तसे ईव्हीएम मशीन घरोघरी फिरवावी तर लागणार नाही ना?

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

### आपला माणूस

लोकसभेचे वारे वाहू लागले की, प्रचार, जाहीरनामा आणि बरीच आश्वासनं देऊन मतदाराला आकर्षित करायचे आणि मत आपल्याकडे ओढायचे उद्योग सुरू होतात. पण आता मतदार हुशार झाला आहे. आता ट्रेंड आला आहे... आपला माणूस, जनतेतला माणूस, तुमच्यामधीलच हवा; मग स्थानिक उमेदवार अथवा दुसऱ्या गावातून थोपलेलाही चालेल. खरं पाहायला गेलं तर माणूस स्थानिक असू वा परप्रांतीय, शिक्षित असू अथवा अशिक्षित, पैसेवाला सुटी की खालून वर आलेला असू; उमेदवार हा इच्छाशक्ती असलेला हवा. अर्थात ती इच्छाशक्ती विकासकामाची असावी. आपल्या मतदारसंघातील गरजा पूर्ण करणारी असावी. असे काही मतदारसंघ आहेत की, तेथील नेतृत्वाने ते मतदारसंघ परिपूर्ण केले आहेत. अकलूज, बारामती ही ठिकाणे त्याची उदाहरणे आहेत. तेथील जनता ही त्यांच्या पाठीमागे कायम असते. सोलापूरला मात्र या गोष्टीचा शाप असावा. कारण येथील राजकारणी फक्त स्वविकासालाच महत्त्व देताना दिसले. एखादी चांगली उद्योग वाहिनी अथवा विकासाला चालना देणारा प्रकल्प अजूनही प्रतीक्षेतच आहे. त्या इच्छाशक्ती असलेल्या नेतृत्वाच्या सोलापूर प्रतीक्षेत आहे. कुणी मिळेल का सोलापूरला निवृत्तिधारकांचे गाव हे बिरूद पुसणारा आणि येथील तरुणांना त्यांच्याच गावी मिळेल तसा रोजगार मिळवून देणारा. परत एकदा गिरणगावात भोंगा वाजेल का? माझे सोलापूर परत एकदा महाराष्ट्राच्या नकाशात प्रगतिशील म्हणून ओळखले जाऊ शकेल का? यासाठी गरजेचा आहे 'आपला माणूस' निवडून यायला पाहिजे आणि मतदाराला हा आपला माणूस ओळखता येणे गरजेचे आहे.

**श्रीपाद महाजन**/सोलापूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त

### भाजपा शिक्षक आघाडीच्या जिल्हा संयोजकपदी प्राचार्य सुरेश गुंड

**वैराग, दि. २८ एप्रिल-**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेश संयोजक डॉ. प्रशम कोल्हे यांनी प्रदेश शिक्षक आघाडी कार्यकारिणीची घोषणा केली आहे. यामध्ये बार्शी तालुक्यातून आमदार राजेंद्र राऊत यांचे कट्टर समर्थक प्राचार्य सुरेश गुंड यांची भाजप शिक्षक आघाडीच्या जिल्हा ग्रामीण, माढा जिल्हा संयोजकपदी निवड करण्यात आली आहे. नियुक्तीचे पत्र महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आ. राजेंद्र राऊत, आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत देण्यात आले. प्रा. सुरेश गुंड गेल्या २७ वर्षांपासून माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक म्हणून सेवेत असून सध्या शरदचंद्रजी पवार विद्यालय बावी येथे प्राचार्य म्हणून सेवेत आहेत. सुरेश गुंड हे सोलापूर जिल्हा शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन असून जिल्हा मुख्याध्यापक संघाचे क्रीडा सचिवही आहेत. शैक्षणिक संघटनेच्या माध्यमातून सुरेश गुंड यांनी शिक्षक, सेवकांच्या समस्या सोडविलेल्या आहेत. विनाअनुदान शाळेचा तसेच जुनी पेन्शन मिळण्याकरिता आंदोलनाच्या माध्यमातून लढा सुरू ठेवलेला आहे.





### डॉ. आंबेडकर मध्यवर्ती महामंडळाकडून पोलिस आयुक्तांचा सत्कार

**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्यासह पोलिस अधिकाऱ्यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळ उत्सव व विश्वस्त कमेटी च्या वतीने १४ एप्रिल ते २१ एप्रिल २०२४ या कालावधीत सर्व सार्वजनिक मंडळाच्या वतीने मोठ्या उत्साहाने आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला. या उत्सव काळावधी दरम्यान पोलिस दलाच्यावतीने शांतता व सुव्यवस्थेबाबत उत्तम प्रकारे नियोजनबद्ध व चोख व्यवस्थापना मुळे मिरवणूक शिस्तबद्धरित्याा पार पडली. याचे श्रेय पोलीस आयुक्त, त्यांचे अधिकारी व पोलीस कर्मचारी यांना जाते. या निमित्ताने बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळ उत्सव व विश्वस्त कमेटी च्या वतीने सोलापुर शहराचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, अजीत बोराडे, डॉ. दिपाली काळे यांचा सत्कार करण्यात येऊन आभार पत्र देण्यात आले. आभारपत्र, शाल देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी उत्सव व विश्वस्त कमेटीचे सदस्य उपस्थित होते.

### माजी नगर संघचालक नाना कचरे यांचे निधन

**पुणे, दि.२८ एप्रिल-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वानवडी भागाचे माजी संघचालक, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि जनसेवा सहकारी बँकेचे संस्थापक सदस्य रघुनाथ म्हस्कूजी तथा नाना कचरे



(वय ८८) यांचे शनिवारी राहत्या घरी वानवडी येथे निधन झाले. त्यांच्यामागे सून, जावई व नातवंडे आहेत. वानवडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार झाले. त्यावेळी माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर, आमदार योगेश टिळेकर, संघाचे महेश करपे, प्रसाद लवळेकर, विश्व हिंदू परिषदेचे पांडुरंग राऊत, जनसेवा बँकेचे रवी तुपे, राजेंद्र वालेकर तसेच अनेक नगरसेवक, बँक कर्मचारी नागरिक यावेळी उपस्थित होते. पुण्याच्या पूर्व भागात रा. स्व. संघाचे काम उभे करण्यात नानांचा सिंहाचा वाटा होता. वानवडी, कोंढवा, हडपसर, मुंढवा या भागात संघ कामाबरोबरच, जनसंघाच्या कामात देखील नाना सक्रीय होते. १९७२ मध्ये हडपसर येथे जनसेवा सहकारी बँकेच्या स्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला होता. सहकार भारतीच्या स्थापनेपासूनच्या कार्यात १९७८ पासून ते सहभागी होते. त्यांनी सहकार चळवळीत देखील भरीव काम केले. जनसेवा न्यास, अपंग कल्याणकारी संस्था, श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना या सर्व संस्थांच्या उभारणीत त्यांचा सक्रीय सहभाग होता. अखेरपर्यंत त्यांनी संघ कार्याच्या माध्यमातून विविध सामाजिक कार्यात नाना अखेरपर्यंत कार्यरत होते.

## निधन वृत्त...

### महादेवी सुरळे



**सोलापूर दि. २८ एप्रिल -**

टाकळी (दक्षिण सोलापूर) येथील रहिवाशी महादेवी हणमंत सुरळे (वय ९५) यांचे रविवारी दि २८ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा उद्या सोमवारी दि २९ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुन नातवंडे असा परिवार आहे. ते टाकळी विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे माजी चेअरमन सिद्धाराम सुरळे यांच्या मातोश्री होत्या.

### बाशुभाई बागवान



**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

पेंटर चौकाजवळील रहिवाशी बाशुभाई मेहबूबदौला बागवान (वय ५६) यांचे अल्पशा आजाराने आज रविवारी दुपारी निधन झाले. रविवारी रात्री चिराग अली मुस्लिम कब्रस्तान मध्ये त्यांचे दफनविधी करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ विवाहित मुले आहेत. सुरभी ज्यूस सेंटरचे चालक रफिक बागवान यांचे ते चुलत बंधू होत.

# ...म्हणून बार्शीकरांचे एकेक मत लाखमोलाचे

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ एप्रिल-**

भारतवासियांना सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच सर्वसामान्यांचे सरकार म्हणून नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवण्यासाठी बार्शीकरांचे एकेक मत लाखमोलाचे असल्याचे मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

धाराशिव लोकसभा निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व महायुतीच्या उमेदवार अर्चना राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ बार्शी येथे झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत, आ. राणा जगजितसिंह पाटील, आ. राजेंद्र राऊत,उमेदवार सौ.अर्चना राणाजगजितसिंह पाटील,सौ.कविताताई राजेंद्र राऊत, विजय राऊत, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. रणवीर राजेंद्र राऊत, माजी नगराध्यक्ष असिफभाई तांबोळी, वैराग भागाचे नेते संतोष निंबाळकर, वैरागचे उपनगराध्यक्ष नीरंजन भूमकर, भाजपा तालुकाध्यक्ष मदन दराडे, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील आदीसह मान्यवर उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बार्शीचे आ. राजेंद्र राऊत हे जनतेच्या हितासाठी झटणारे तसेच विकासासाठी धडपडणारे असून त्यांची लोकप्रिय आमदार म्हणून गणना होत आहे. त्यांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा असून संपूर्ण ताकद त्यांच्या मागे असेल. सध्याची धाराशिव लोकसभा निवडणूक ही अर्चनाताई पाटीलविरुद्ध उबाठा उमेदवार नसून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व काँग्रेसचे राहुल गांधी अशी आहे. त्यामुळे नरेंद्र मोदींना साथ द्यावी.

आरोग्य मंत्री तानाजी सावंत म्हणाले की, अर्चनाताई पाटील यांना निवडून देण्यासाठी आम्ही सर्व एक दिलाने काम करीत असून त्यांना सुमारे दोन लाख मताने विजयी करण्याचा निर्धार केला आहे.

आ. राऊत म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून बार्शी शहर व तालुक्याला कोट्यावधी रुपयांचा निधी मिळाला असून या निधीमधूनच बार्शी शहरात ठिकठिकाणी विकासकामे आपणास पाहायला मिळत आहेत. भविष्यातही केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या विविध विकासप्रिय योजना आणण्यासाठी देशात नरेंद्र मोदी यांचे सरकार येणे अत्यंत गरजेचे आहे.

#### मोदींना पंतप्रधान करण्यासाठी मत मला द्या

उमेदवार अर्चनाताई पाटील म्हणाल्या की, धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी केंद्र सरकारकडून विविध योजना राबवण्यासाठी मला आपला प्रतिनिधी म्हणून दिल्लीला पाठवणे अत्यंत गरजेचे आहे. सध्याची निवडणूक ही देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व काँग्रेसचे राहुल गांधी या दोघातच होत आहे असे गृहीत धरून नरेंद्र मोदींना पंतप्रधान करण्यासाठी आपण मला मतदान देऊन खारीचा वाटा उचलावा असे आवाहन त्यांनी केले.

## बार्शीत वर्षापासून महिलेवर दुष्कर्म, मुलांना जीवे मारण्याची धमकी

### तालुका कृषी विभागातील दोघांवर गुन्हा दाखल; मुलांना कीडनॅप करण्याची दिली होती धमकी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ एप्रिल-**

एका महिलेवर वर्षापासून बळजबरीने दुष्कर्म करून त्याचे अश्लिल फोटो व व्हिडीओ व्हायरल करण्यासह पीडितेच्या मुलांना किडनॅप करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून दोघांविरुद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महेश गवारे व अतुल जगताप (रा. ढगे प्लॉट, शिवशक्ती मैदानाच्या पाठीमागे बार्शी) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यातील महेश हा कृषी परिवेक्षक तर अतुल हा कृषी सहाय्यक पदावर बार्शी कृषी विभागात कार्यरत आहेत. पीडिता व आरोपी महेश यांच्यात कौटुंबिक संबंध होते. त्यामुळे दोन्ही कुंटुंबाचे घरी येणे-जाणे होते. २०२० साली




एके दिवशी महेश याने पीडिता घरी एकटीच असल्याचे पाहून लगट करण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी त्यास पीडिताने विरोध केला होता. परंतु कुंटुबाची बदनामी होईल या भितीने घडला प्रकार कोणास सांगितला नाही. दरम्यान थोड्या दिवसांनी दि. ३१ मे २०२० रोजी पती गावाकडे गेल्याने पीडिता व मुले घरामध्ये होते. रात्री ९.३० च्या सुमारास महेश गवारे हा घरामध्ये आला. त्यावेळी पीडितासोबत झोंबाझोबी केली. त्यास विरोध केल्याने त्याने रागाचे भरात पीडिताच्या मुलीस जोरात ढकलून दिल्याने त्यावेळी तिचा हात फॅक्चर झाला होता. घडल्या प्रकारामुळे घाबरून पीडिता शांत राहिली होती. दि. १३ एप्रिल रोजी २०२० पिडीता घरामध्ये एकटीच असल्याची खात्री झाल्यानंतर तो घरी आला. त्यावेळी पीडिताने त्याला तू घरामध्ये का आला असे विचारले असता त्याने तू मी सांगतो तसं सोबत रहा नाहीतर मुलीला किडनॅप करून खल्लास करून टाकीन अशी धमकी दिली. महेश गवारे हा मुलीला किडनॅप करून मारून टाकीन या भितीने पीडिता घाबरून गेली होते. त्यावेळी महेश गवारे याने पीडितेस दमदाटी करून बळजबरीने शरीरसंबंध केले होते. दरम्यान महेशने मोबाईलमध्ये पीडितेचे फोटो व व्हिडीओ तयार करून सेव्ह केले होते. त्यावेळी महेशने पीडितेस तू जर तोंड उघडले तर तुझे नावाचे फेक अंकाऊट काढून आताचे फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करीन अशी धमकी दिली होती. त्यानंतरही महेश हा अधूनमधून पीडिताच्या घरात येऊन बळजबरीने शरीरसंबंध करत होता.

#### पतीलाही जीवे मारण्याची धमकी

अतुल हा मानसिक त्रास देत होता. यामुळे १३ ऑगस्ट २०२२ रोजी पीडितेने मेडीसीनचे गोळ्या घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला होता. त्यावेळी उपचार चालू असताना अतुलने पिडीताकडे येऊन महेश हा पीडिताचे फोटो व व्हिडीओ व्हायरल करणार असल्याची धमकी दिली होती. त्यामुळे झालेल्या आत्याचाराबाबत कोणास काहीएक सांगितले नव्हते. दरम्यान घडल्या प्रकारामध्ये घाबरून जाऊन पीडिता माहेरी जाऊन राहिली होती. त्यानंतर पीडितेच्या पतीलाही जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## 'त्या' मृत मुलीच्या वडिलांनी डॉक्टराच्या कानशिलात लगावली

### बार्शीच्या भोसले हॉस्पिटलमधील प्रकार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ एप्रिल-**

तुम्ही माझ्या मुलीला लडिमिट करून का घेतले. माझ्या पोरीचा जीव गेला, असे म्हणून त्या मृत मुलीच्या वडिलाने डॉक्टरांच्या कानशिलात लगावत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा प्रकार परांडा रोड येथील भोसले हॉस्पिटलमध्ये शुक्रवारी १२.३० वाजता घडला.

याबाबत डॉ. रविकिरण राम भोसले यांनी त्या मृत मुलीचे वडील राजेंद्र दिनकर हाके (रा. उपळाई रोड, बार्शी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अधिक माहिती की बार्शी येथील भोसले हॉस्पिटलमध्ये दि. १ जानेवारी रोजी राजेंद्र हाके यांची मुलगी सोनम महानवर ही डिलेव्हरीसाठी ॲडमीट झाली होती. त्यावेळी ऑपरेशन सिझेरियन डिलेव्हरी झाली होती. दुसऱ्या दिवशी पेशंटची रक्त गोठण्याची प्रक्रिया बिघडल्याने व प्लेटलेट कमी झाल्याने पेशंटला शैलजा हॉस्पिटल बार्शी येथे पाठविले. तेथे उपचार घेऊन पुढील अत्यावश्यक उपचारासाठी आधार हॉस्पिटल सोलापूर येथे गेले. त्यानंतर उपचार चालू असताना दि. ७ जानेवारी २०२४ रोजी सोनम ही मयत झाली. त्यानंतर सोनम हिचे वडील राजेंद्र हाके यांना राग अनावर होत असल्याने हॉस्पिटलमध्ये येऊन वेळोवेळी शिवीगाळ देऊन निघून जात होते. मात्र दि. २६ एप्रिल रोजी राजेंद्र हे हॉस्पिटलच्या वेटिंग रुममध्ये डॉक्टारांची वाट पाहत बसले होते. डॉक्टर हॉस्पिटलमध्ये येताच मृत सोनमच्या वडिलांनी तुम्ही डॉक्टरच आहात काय असे विचारत काही एक न बोलता डॉक्टराच्या कानशिलात मारत माझ्या पोरीचा जीव गेला असे

## ८५ वर्षांवरील जेष्ठ, दिव्यांग अन् अत्यावश्यक सेवेतील ९५ टक्के नागरिकांनी बजावला मतदानाचा हक्क

### उर्वरित ५ टक्के मतदानही एक-दोन दिवसात होणार

### उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

माढा आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग मतदारांसाठी मतदानाची घरपोच व्यवस्था करण्यात आली होती. त्यानुसार १२ डी फॉर्म भरून घेवून जिल्ह्यातील ९५ टक्के अशा नागरिकांचे मतदान आमच्या विशेष टिमने पूर्ण केले असून, अत्यावश्यक सेवेतील नागरिकांचेही याच धर्तीवर मतदान पूर्ण केले आहे. उर्वरित ५ टक्केही मतदान येत्या २ दिवसात पूर्ण होणार असून, या मतपेट्यांचा तालुकानिहाय अहवाल जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे देणार असल्याची माहिती महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी दिली.

माढ्या लोकसभा मतदार संघातील जेष्ठ नागरिकांसाठी आजतागायत १ हजार ६७७ मतदान झाले आहे. यामध्ये ८५ वर्षांवरील १६५२ नागरिक असून, त्यातील १ हजार ४८४ नागरिकांनी मतदान केले आहे. दिव्यांग २१२ असून, त्यातील १९३ जणांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. तर अत्यावश्यक सेवेतील नागरिकांसाठी उद्यापासून मतदान होणार आहे. तर सोलापूर लोकसभा मतदारसंघातील ६ मतदारसंघातून आजतागायत १ हजार ५२६ मतदान झाले आहे. यातील ८५ वर्षांवरील १ हजार ३१८ पैकी १२१६ जणांनी आपला हक्क बजावला आहे. दिव्यांग असलेल्या १३२ जणांपैकी १२२ जणांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. तर अत्यावश्यक सेवेतील ५२९ पैकी १९० जणांनी आपला हक्क बजावला आहे. आजतागायत या दोन्ही मतदारसंघातील ३ हजार २०५ जणांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. तर उर्वरित ५ टक्के मतदान उद्या पूर्ण होणार आहे. यासाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष टीमची नेमणूक केली आहे. ही मतदान प्रक्रियेचे उर्वरित ५ टक्के कामही येत्या एक-दोन दिवसात पूर्ण होणार असून, याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात येणार आहे.





#### ईव्हीएम मशीन्सवर उमेदवार, चिन्ह टाकण्याचे काम सुरू

माढा आणि सोलापूर मतदार संघातील प्रत्येक बुथवर मतदानासाठी देण्यात येणाऱ्या सर्व ईव्हीएम मशीन्स तयार करण्याचे काम आजपासून सुरू झाले आहे. या मतपत्रिकेवर उमेवारांची नावे टाकणे, चिन्ह टाकण्याचे काम सध्या चालू आहे. येत्या २-३ दिवसात हे काम पूर्ण होवून त्या मशीन्स मतदानाच्या पूर्वसंध्येला चोख पोलिस बंदोबस्तात या दोन्ही मतदारसंघातील प्रत्येक बुथवर पाठविण्यात येणार आहेत.

**- गणेश निऱ्हाळी,**
**उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी**

## देशाच्या भविष्यासाठी भाजपा सोबत जाणार

### माजी आ. रमेश कदमांनी केली भूमिका स्पष्ट

### आरोग्य मंत्र्यांनी दिली आमदारकीची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २८ एप्रिल-**

मोहोळचे राष्टरवादीचे माजी आ. रमेश कदम यांनी अखेर त्यांची भूमिका स्पष्ट केली असून देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी नरेंद मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान व्हावेत यासाठी त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा त्यांनी निर्णय घेतला आहे. त्यांना पुढील काळात आमदार करण्याची ग्वाही राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी दिली.

कृषी उत्पन बाजार समितीच्या प्रांगणात माजी आ. रमेश कदम यांच्या समर्थकांनी रमेश कदम यांची लोकसभेची भूमिका स्पष्ट करण्यासाठी सभेचे आयोजन केले होते. यावेळी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी हजेरी लावली. यावेळी प्रदिप निर्मळ, सोमेश क्षीरसागर, ॲड. कैलास खडके, शाहुराजे देशमुख यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी रमेश कदम समर्थकांनी एकच गर्दी केली होती. प्रास्ताविक प्रदीप निर्मळ यांनी केले. आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी काँग्रेसने त्यांच्या काळात संस्थानिकच तयार केले. सरकार बदलल्यानंतर आमच्यासारखे सर्वसामान्य आणि वंचित बाराबलुतेदारतले मुलं आमदार, मंत्री होऊ शकले. मग रमेश कदम हे आमदार आणि मंत्री का होणार नाहीत, असा प्रश्न उपस्थित केला. कोरोना काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले काम जगाने पाहिले असून तिसऱ्या वेळेस त्यांना पंतप्रधान करण्यासाठी कमळापुढील बटन दाबून भाजपाला विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. आगामी काळात माझ्या जीवात जीव असेपर्यंत रमेश कदम यांचा हात सोडणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली.

रमेश कदम यांनी लोकसभा निवडणुकीत काय भूमिका घ्यायची याबाबत प्रश्न निर्माण झाला होता म्हणून कार्यकर्त्यांची मत जाणून घेतली. राजकारणात भावनिक होऊन जमत नाही.वास्तववादी भूमिका स्वीकारली पाहिजे. हाच विचार केला. आपल्या मागच्या कार्यकर्त्यांची कामे झाली पाहिजेत याचा विचार करून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागे उभारण्याचा निर्णय जाहीर केल्याचे त्यांनी सांगितले.

**नावात बदल**

मी **स्नेहा मल्लिकार्जुन पडणुरे** याद्वारे घोषित करते की, माझी मुलगी **क्रिशा कोष्टी** हिचे पासपोर्टमध्ये आईचे नाव **स्नेहा सोमशंकर कोष्टी** असे नजरचुकीने नोंद झाली आहे. त्याऐवजी **स्नेहा मल्लिकार्जुन पडणुरे** असे करण्यात आले आहे. तसेच पत्ता- No 74F, 17 TH A Cross 4 th Stage 4th Block- Woc Basaveshwara nagar, Bengaluru. Pin - 560079, Karnataka India ऐवजी Basavnagar, Post Mandrup, Tal. South Solapur, Dist. Solapur Pin-413221, State- Maharashtra असे करण्यात आले आहे.
ॲफिडेव्हीट नंबर-२४६५/१९-४-२०२४

**नावात बदल**

मी **स्नेहा मल्लिकार्जुन पडणुरे** याद्वारे घोषित करते की, माझी मुलगी **क्रिशा कोष्टी** हिचे पासपोर्टमध्ये वडिलांचे नाव **सोमशंकर छायप्पा कोष्टी** असे नजरचुकीने नोंद झाली आहे. त्याऐवजी **सोमशंकर कोष्टी** असे करण्यात आले आहे. तसेच पत्ता- No 74F, 17 TH A Cross 4 th Stage 4th Block- Woc Basaveshwara nagar, Bengaluru. Pin - 560079, Karnataka India ऐवजी Basavnagar, Post Mandrup, Tal. South Solapur, Dist. Solapur Pin-413221, State- Maharashtra असे करण्यात आले आहे.
ॲफिडेव्हीट नंबर-२४६५/१९-४-२०२४

**नावात बदल**

मी **स्नेहा मल्लिकार्जुन पडणुरे** याद्वारे घोषित करते की, माझ्या मुलीच्या पासपोर्टमध्ये **क्रिशा** एवढेच नावाचा उल्लेख झाला आहे. त्याऐवजी **क्रिशा कोष्टी** असे करण्यात आले आहे. पत्ता- No 74F, 17 TH A Cross 4 th Stage 4th Block- Woc Basaveshwara nagar, Bengaluru. Pin - 560079, Karnataka India ऐवजी Basavnagar, Post Mandrup, Tal. South Solapur, Dist. Solapur Pin-413221, State- Maharashtra असे करण्यात आले आहे.
ॲफिडेव्हीट नंबर-२४६५/१९-४-२०२४

**प्रपत्र क-१**

(उमेदवाराने वृत्तपत्रे, दूरदर्शने यामध्ये प्रसिध्द करण्यासाठी)

**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाउंडेशन आणि इतर विरुध्द युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार

उमेदवाराचे नाव : **श्री. राम विठ्ठल सातपुते**
पत्ता : **श्रीराम निवास, ५० फाटा मांडवे, ता. माळशिरस, जि. सोलापूर**
राजकीय पक्षाचे नाव : **भारतीय जनता पार्टी**
निवडणुकीचे नाव : **लोकसभा निवडणूक २०२४**
मतदारसंघाचे नाव : **४२- सोलापूर (अनुसूचित जाती) लोकसभा मतदारसंघ**

मी, **श्री. राम विठ्ठल सातपुते,** वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चरित्रबद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे.

| अ.क्र. | (अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे | | |
|---|---|---|---|
| | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे) थोडक्यात वर्णन |
| १ | ३- जॉईंट सिव्हिल जज् ज्यु.डी. ॲड जे.एम.एफ.सी. | खटला क्र. एस.सी.सी. २४०४६/२०१७ | इंडियन पिनल कोड १४७, १४३, ३२३, ३५३, ५०४, ३४ बॉम्बे पोलीस ॲक्ट ३७ (३) आर. डब्ल्यू.१३५ विद्यार्थी आंदोलन |
| २ | १८ ज्युडी. वर्ग-१, पुणे | खटला क्र. आर.सी.सी. ३४९६/२०१८ | इंडियन पिनल कोड १४३, १४७, १४९, ३२३, ३३६, ३४१ बॉम्बे पोलीस ॲक्ट-१३५ विद्यार्थी आंदोलन |
| ३ | १८ ज्युडी.मॅजे. वर्ग-१, पुणे | खटला क्र. एस.सी.सी. ४२०११८/२०१३ | इंडियन पिनल कोड १४३, १४७, ३२३, ५०४, १४९ विद्यार्थी आंदोलन |
| ४ | जे.एम.एफ.सी. सोलापूर | खटला क्र. एस.सी.सी. ६२७७/२०२३ | इंडियन पिनल कोड ३३६, १८८, २६९, २७० सह आपत्ती व्यवस्थापन ५१ (ब) रोग अधिनियम कलम ३ आणि म.पो. अधिनियम १३५ आंदोलन |

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### भवानी देवी, तनिष्का खत्री ऑलिम्पिकसाठी अपात्र

**चेन्नई** : आशियाई ओशिनिया विभागीय ऑलिम्पिक तलवारबाजी पात्रता स्पर्धेत भारताच्या भवानी देवी व तनिष्का खत्री पॅरिस ऑलिम्पिकसाठी आपली पात्रता सिद्ध करण्यात अपयशी ठरल्या. तनिष्काने कडवा संघर्ष करत महिलांच्या ईपी प्रकाराची अंतिम फेरी गाठली, परंतु या निर्णायक लढतीत तिला सिंगापूरच्या किरिया टिकनाहकडून १३-१५ असा पराभव पत्करावा लागला, तर तिकडे भवानी देवीला हाँगकाँगच्या चू विंग कियू हिच्याकडून १२-१५ असा पराभव पत्करावा लागला. भवानीदेवी ही तलवारबाजी क्रीडा प्रकारात टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करणारी एकमेव खेळाडू असून तिला पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भाग घेण्याची आशा होती, परंतु तिचा स्वप्नभंग झाला.

### नदाल तिसऱ्या फेरीत



**माद्रिद** : २२ वेळचा ग्रॅण्ड स्लॅम विजेता राफेल नदालने आपले विजयी घोडदौड कायम ठेवत ॲलेक्स डी मिनौरवर ७-६ (६), ६-३ अशी मात करून माद्रिद ओपन टेनिस स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला व ॲलेक्सकडून झालेल्या पराभवाचा वचपा घेतला. दुखापतीतून सावरल्यानंतर नदालची हा केवळ चौथा स्पर्धात्मक सामना होता. यापूर्वी अकराव्या मानांमकित डी मिनौरने बार्सिलोनामध्ये नदालवर ७-५, ६-१ अशी मात केली होती. माझा गत एक महिन्याचा काळ अतिशय कठीण गेला. मला पुनरागमन करू असे वाटत नव्हते, परंतु मी पुन्हा आपल्या घरच्या टेनिस कोर्टवर खेळू शकेल असे स्वप्न बघत होतो आणि आता ते स्वप्न खरे ठरत आहे, असे स्पेनचा ३७ वर्षीय नदाल म्हणाला. आता पुढील महिन्यात होणाऱ्या फ्रेंच ओपनमध्ये अखेरचे सहभागी होण्याचे त्याचे स्वप्न आहे.

### आर्सेनलचा रोमांचक विजय

**लंडन** : येथे खेळल्या गेलेल्या प्रीमियर लीग फुटबॉल स्पर्धेतील सामन्यात आर्सेनलने टोटेनहॅम हॉटस्परवर ३-२ अशा एका गोलच्या फरकाने रोमांचक विजय संपादन केला. आर्सेनलच्या विजयात पिएरी-ईमिल होजबर्गने आत्मघाती गोल केला. सॉन हियूंग मिन पेनॉल्टी किकवर शानदार गोल नोंदविला. या विजयाबरोबरच आर्सेनलने दुसऱ्या स्थानावर असलेल्या विजेत्या मॅन्चेस्टर सिटीच्या पुढे आहे. लिव्हरपूलने तिसरे स्थान मिळविले आहे. आर्सेनलने ३५ सामने खेळले असून अजून त्यांना तीन सामने खेळायचे आहेत. १९५९ सालानंतर प्रथमच आर्सेनलकडून टोटेनहॅम हॉटस्पर तीन गोल स्वीकारत पराभव पत्करला.

### रेयान एडवर्डला करारवाढ

**चेन्नई** : कर्णधार रेयान एडवर्ड्सला चेन्नईयन फुटबॉल क्लबने करारवाढ दिली आहे. रेयान २०२३-२४ या हंगामात सर्व स्पर्धांमध्ये चेन्नईयन एफसीचा कर्णधार म्हणून २५ सामने खेळला व त्याने दोन गोल केले व एका गोलमध्ये सहाय केले. संघ व्यवस्थापनने रेयानच्या करार वाढविला असून तो २०२५ च्या हंगामात संघात कायम राहणार आहे. लिव्हरपूलमध्ये जन्मलेला रेयान उत्तम बचावपटू असून तो गत चार वर्षांपासून चेन्नईयन एफसीमध्ये आहे. राफेल क्रिव्हेलारोनंतर रेयान हा संघातील दुसरा विदेशी खेळाडू आहे. आगामी हंगामात रेयान चेन्नईयन एफसीसाठी अधिक उपयुक्त खेळाडू ठरेल.

# भारतीय पुरुष संघाला १४ वर्षांनंतर सुवर्णपदक




ऐतिहासिक सुवर्णपदक पटकावणारे भारतीय तिरंदाज

**विश्वचषक तिरंदाजी स्पर्धा**

**ऑलिम्पिक विजेत्या दक्षिण कोरियावर मात**

◆ **शांघाय, २८ एप्रिल**

धीरज बोम्मादेवरा, तरुणदीप राय आणि प्रवीण जाधवचा समावेश असलेल्या भारतीय पुरुष रिकर्व्ह संघाने रविवारी येथे विद्यमान ऑलिम्पिक विजेत्या दक्षिण कोरियाला पराभवाचा धक्का देत १४ वर्षांनंतर तिरंदाजी विश्वचषकात ऐतिहासिक सुवर्णपदक पटकावले.

विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात बलाढ्य दक्षिण कोरिया संघावर भारतीय पुरुष रिकर्व्ह संघाचा हा पहिला विजय आहे आणि त्यामुळे आगामी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळवण्याची शक्यता वाढेल.

धीरज, तरुणदीप व प्रवीण या त्रिकुटाने एकही सेट न गमावता संयमाने खेळाचे प्रदर्शन करत बलाढ्य कोरियन संघाचा पराभव केला. ४० वर्षीय आर्मी मॅन तरुणदीप हा देखील ऑगस्ट २०१० मध्ये शांघाय विश्वचषक चौथ्या चरणाच्या स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या संघाचा भाग होता. त्यानंतर राहुल बॅनर्जी, तरुणदीप आणि जयंता यांचा समावेश असलेल्या रिकर्व्ह संघाने जपानचा पराभव केला.

स्पर्धेतील अव्वल-दोन मानांकित संघादरम्यानच्या लढतीत भारताने ५-१ (५७-५७, ५७-५५, ५५-५३) असा विजय मिळवला व भारताच्या सुवर्णपदकांची संख्या पाचवर नेली.

अंकिता भकट व धीरज यांच्या मिश्र संघालाही हे यश लाभले. अंकिता व धीरजने मेक्सिकोच्या ॲलेक्झांड्रा व्हॅलेन्सिया व मॅटियास ग्रांडे या जोडीचा ६-० (३५-३१, ३८-३५, ३९-३७) असा पराभव करत कांस्यपदक जिंकले.

पुरुषांच्या सांघिक अंतिम फेरीचा सामना भारत व दक्षिण कोरियादरम्यान झाला. यात किम वूजिन व किम जे देओक या टोकियो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्या संघाचे दोन सदस्यांचा समावेश होता. ली वू सीओक हा तिसरा सदस्य होता. यात भारताने बाजी मारली. (वृत्तसंस्था)

# दुसऱ्या विजयासह भारतीय महिला उपांत्यपूर्व फेरीत

**थॉमस, उबेर चषक बॅडमिंटन**

**सिंगापूरवर ४-१ ने विजय**

◆ **चेंगडू, २८ एप्रिल**

चीनमधील चेंगडू येथे सुरु असलेल्या थॉमस व उबेर चषक बॅडमिंटन स्पर्धेत रविवारी भारतीय महिला बॅडमिंटन संघाने दुसऱ्या गट साखळी सामन्यात सिंगापूर संघावर ४-१ असा विजय नोंदवला. या विजयाबरोबरच भारताने उपांत्यपूर्व फेरीतील आपले स्थान निश्चित केले आहे. हा विजय भारतीय पुरुष संघाच्या यशाचे प्रतिबिंब आहे. पुरुष संघाने थॉमस चषकात थायलंडवर ४-१ असा विजय मिळविला.

भारताने या वर्षीच्या उबेर चषकासाठी एक युवा संघ मैदानात उतरवला असताना सिंगापूरला पराभूत करण्यापूर्वी पहिल्या सामन्यात लढाऊवृत्ती कॅनडाविरुद्ध आपली क्षमता सिद्ध केली.




ईशाराणी बरुआ




अनमोल खरब

दोन विजयांसह भारतीय महिला संघ अ गटात चीननंतर दुसऱ्या स्थानावर आहे. अव्वल स्थान निश्चित करण्यासाठी अव्वल दोन संघ मंगळवारी अंतिम साखळी सामन्यात आमने-सामने असतील.

सलामीच्या सामन्यात २४ वर्षीय अश्मिता चालिहाला सिंगापूरच्या येओ जिया मिनकडून सरळ गेममध्ये १५-२१ १८-२१, ०-१ असा पराभव पत्करावा लागला. हा सामना ३० मिनिटे चालला.

महिला दुहेरीच्या सामन्यात प्रिया कोन्जेंगबम आणि श्रुती मिश्रा या युवा भारतीय जोडीने जिओ एन हेंग आणि जिन यू जिया या जोडीवर वर्चस्व गाजवले व ३४ मिनिटांत २१-१५, २१-१६ असा सहज विजय नोंदवून १-१ अशी बरोबरी साधली.

पुढील एकेरी सामन्यांमध्ये ईशाराणी बरुआने अर्ध्या तासांत तिची सिंगापूरची प्रतिस्पर्धी इंसिराह खानवर २१-१३, २१-१६ असा विजय मिळवला. महिला दुहेरीच्या सामन्यात सिमरन सिंघी व रितिका ठाकर या जोडीने यी टिंग एल्सा लाई व झॅन मिशेल या जोडीवर २१-८ २१-११ अशी मात केली, तर अंतिम एकेरीच्या सामन्यात अनमोल खरबने ३४ मिनिटांत ली झिन यी मेगनवर २१-१५ २१-१३ असा विजय नोंदविला. (वृत्तसंस्था)

### गॅरी कर्स्टन पाकिस्तान संघाचा प्रशिक्षक

◆ **कराची, २८ एप्रिल**

दक्षिण आफ्रिकेचा माजी फलंदाज गॅरी कर्स्टन यांची पाकिस्तान टी-२० क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ऑस्ट्रेलियाचे माजी वेगवान गोलंदाज जेसन गिलेस्पी पाकिस्तानच्या कसोटी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी राहतील. पाकिस्तान क्रिकेट मंडळाने रविवारी आपल्या संघाच्या प्रशिक्षकपाच्या नियुक्तीची घोषणा केली. पाकिस्तानचे माजी अष्टपैलू अझहर मेहमूद हे या दोघांनाही सहाय्य करतील. (वृत्तसंस्था)

# टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघाची घोषणा आज

◆ **नवी दिल्ली, २८ एप्रिल**

टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धा पुढील ३३ दिवसांत सुरू होणार आहे आणि भारतीय संघातील अंतिम १५ च्या निवडीवरून भारतीय क्रिकेट चाहत्यांमध्ये चर्चा रंगली आहे. बीसीसीआयच्या राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर सोमवारी आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेसाठी भारताच्या १५ सदस्यीय संघाची घोषणा करण्यासाठी सज्ज आहेत.



आयपीएल २०२४ मध्ये आरसीबीच्या शानदार प्रदर्शनानंतर माजी कर्णधार विराट कोहलीने भारतासाठी सलामी द्यावी, असे मत दिग्गज क्रिकेटपटू व तज्ज्ञांनी व्यक्त केले. त्यामुळे कोहलीची भूमिका निश्चित करण्यापासून समितीला अनेक निवड डोकेदुखीचा सामना करावा लागणार आहे. बॅकअप भूमिकेसाठी निवडकर्ते यशस्वी जयस्वाल व शुभमन गिल यांच्यापैकी एकाची निवड करतील.

ऋषभ पंत, संजू सॅमसन, केएल राहुल आणि अगदी दिनेश कार्तिक हे भारतीय संघातील संभाव्य दोन स्थानांचे प्रमुख दावेदार म्हणून उदयास आले आहे. त्यामुळे यष्टिरक्षक-फलंदाज म्हणून कोणाची निवड करायची असा प्रश्न निर्माण झाला आहे.

**सॅमसन, पंत की राहुल**

संजू सॅमसन २०२१ पासून आयपीएलमध्ये अव्वल फॉर्ममध्ये आहे. येथेच त्याने केएल राहुल व ऋषभ पंत यांच्यापेक्षा जास्त धावा केल्या आहेत. त्यांनी गत काही हंगामात संमिश्र कामगिरी केली आहे. सलामीवीर म्हणून त्याच्या स्थानाचा फायदा राहुलला जास्त सरासरी आहे, पण स्ट्राइक रेटच्या बाबतीत- सर्वात महत्त्वपूर्ण पॅरामीटर - सॅमसनने सध्या आपल्या दोन्ही प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकले आहे.

संजू सॅमसनने लखनौमध्ये शनिवारी लखनौ सुपर जायण्ट्सविरुद्ध सात गड्यांनी विजय मिळवून देताना अवघ्या ३३ चेंडूंत नाबाद ७१ धावांसह आणखी एक शानदार विजयी खेळी केली. चार अर्धशतकांसह १६१ च्या स्ट्राइक रेटने ३८५ धावांसह सॅमसन हा या हंगामातील दुसरा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. (वृत्तसंस्था)

### हार्दिक पांड्याचा फॉर्म चिंतेचा विषय

भारतीय संघासाठी मुख्य चिंतेचा विषय आयपीएलमधील हार्दिक पांड्याचा फॉर्म आहे. पांड्याने आतापर्यंत मुंबई इंडियन्ससाठी नऊ सामन्यांमध्ये संभाव्य ३६ पैकी १९ षटके टाकली आहेत. नियुक्त फिनिशर म्हणून त्याने या सामन्यांमध्ये केवळ १० षट्कार मारले आहेत. परंतु आयपीएलमध्ये त्याची चौफेर फलंदाजी बघायला मिळाली नाही. त्याने आतापर्यंत १४२ च्या स्ट्राइक रेटने १९६ धावा केल्या. तरीही पांड्याला पसंती देणारी गोष्ट म्हणजे त्याच्यासारखा पर्यायी खेळाडू नाही.

शिवम दुबेची विश्वचषकासाठी निवड होण्याची शक्यता आहे. तो गोलंदाजी करत नाही, पण कौशल्य आणि वेगाच्या बाबतीत दुबे हा गोलंदाज पांड्याच्या जवळपास नाही, पण त्याचा सध्याचा फलंदाजीचा फॉर्म (आठ सामन्यांत २२ षट्कार) सुद्धा दुर्लक्षित करता येणार नाही.

जसप्रीत बुमराहला साथ देण्यासाठी गोलंदाजी विभागात विशेषत: वेगवान आक्रमणाची निवड करण्यावर भर असेल.

# दोन मनगट फिरकीपटू निवडावे : इरफान पठाण

◆ **नवी दिल्ली, २८ एप्रिल**

आगामी टी-२० विश्वचषकासाठी भारताने आपल्या संघात पाच विशेषज्ञ गोलंदाजांसह दोन मनगट फिरकीपटूंची निवड केली पाहिजे, असे् मत भारताचा माजी अष्टपैलू इरफान पठाण याने व्यक्त केले.

संघाच्या घोषणेसाठी १ मे ही अंतिम मुदत जवळ येत आहे.

माझ्या अंतिम एकादशमध्ये रवी बिश्नोई व कुलदीप यादव हे दोन योग्य मनगट फिरकी गोलंदाज खेळायला आवडतील, असे पठाण म्हणाला, परंतु त्याने युझवेंद्र चहलला विश्वचषकासाठी बोलावण्यास नकार दिला. परंतु चहलच्या क्षेत्ररक्षणातील कामगिरीकडे दुर्लक्ष कता येणार नाही. संघाला क्षेत्ररक्षणाचा समतोल साधायचा असेल, तर त्याचा विचार करायला हवा, असेही तो म्हणाला.

भारतीय संघासमोर सर्वात मोठी समस्या आहे ती वेगवान गोलंदाजीची. गोलंदाजांमध्ये जसप्रीत बुमराह हा एकमेव स्वयंचलित निवड आहे. बुमराहशिवाय किमान दोन वेगवान गोलंदाज हवे आहेत, जे नियमित अंतिम एकादशचा भाग असू शकतात. अशा स्थितीत बुमराहसोबत मोहम्मद सिराज व अर्शदीप सिंगला संधी मिळू शकते, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

### तिसरा वेगवान गोलंदाज म्हणून सिराज नको : श्रीकांत



दरम्यान, भारताचा माजी फलंदाज के. श्रीकांतने मोहम्मद सिराजला संघातील तिसरा वेगवान गोलंदाज म्हणून नापसंती दर्शविली. कारण सिराज एका सामन्यात चांगली गोलंदाजी करेल व नंतरच्या १० सामन्यांमध्ये कामगिरी करू शकणार नाही, तो म्हणाला.

आवेश खान चांगली कामगिरी करत आहे व त्याने आंतरराष्ट्रीय आघाडीवर चांगली कामगिरी केली आहे. त्याने यॉर्कर्समध्येही प्रभुत्व मिळवले आहे, असे श्रीकांत म्हणाला.

मात्र, ऑस्ट्रेलियाचा माजी अष्टपैलू टॉम मूडीने सिराजला पाठिंबा दिला आहे. तो दीर्घ कालावधीसाठी भारतासाठी सर्व फॉरमॅट क्रिकेट खेळला आहे. विश्वचषकात पाऊल टाकण्यासाठी मी त्याला १०० टक्के पाठिंबा देईन, असे मूडी म्हणाला.

# भारतीय महिलांचा बांगलादेशवर ४४ धावांनी विजय

**सामनावीर रेणुका सिंगचे १८ धावांत ३ बळी**

◆ **सिल्हेट, २८ एप्रिल**

येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात रेणुका सिंगच्या प्रभावी गोलंदाजीच्या बळावर भारतीय महिला संघाने यजमान बांगलादेशवर २४ चेंडू शिल्लक ठेवत ४४ धावांनी विजय नोंदविला. रेणुकाने अवघ्या १८ धावांत ३ बळी टिपलेत व तिलाच सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. या विजयाबरोबरच भारताने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

भारताने २० षटकांत ७ बाद १४५ धावा काढल्या आणि बांगलादेशसमोर विजयासाठी १४६ धावांचे आव्हान ठेवले, परंतु त्यांना २० षटकांत ८ बाद १०१ धावापर्यंतच मजल मारता आली. बांगलादेशच्या निगर सुल्तानाने अर्धशतक झळकावत आपल्या संघाला विजय मिळवून देण्यासाठी कसोशीने प्रयत्न केला, परंतु तिची खेळी संघाला विजय मिळवून देण्यास पुरेशी ठरली नाही.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताकडून सलामीवीर स्मृती मंधाना (९) लवकरच बाद झाली, परंतु त्यानंतर शेफाली वर्मा (३१), यासिका भाटिया (३६), हरमनप्रीत कौर (३०) व ऋचा घोषने (२३) बांगलादेशच्या गोलंदाजांशी चिवट झुंज देत संघाला सन्मानजनक धावसंख्या उभारून देण्यात मदत केली. संजीवन सजना (११) व पूजा वस्त्राकार (४) श्रेयांक पाटीलने (नाबाद १) थोडेफार योगदान दिले.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना बांगलादेशची दाणादाण उडाली. सुल्तानाने तेवढी एकाकी झुंज देत शर्थीचे प्रयत्न केले, परंतु इतर फलंदाज भारतीय गोलंदाजांच्या प्रभावी माऱ्यासमोर खेळपट्टीवर फार वेळ टिकाव धरू शकले नाहीत. सुल्तानाने ४८ चेंडूंत ५ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ५१ धावांची खेळी केली. पूजा वस्त्राकारने तिला एबी कौरकडून झेलबाद केले. बांगलादेशने २० षटकांत कसेबसे ८ बाद १०१ धावांपर्यंत मजल मारली.

भारताकडून रेणुका सिंगने १८ धावांत ३ बळी, तर पूजा वस्त्राकारने २५ धावांत २ बळी, श्रेयांक पाटील, दीप्ती शर्मा व राधा यादवने प्रत्येकी १ बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# बंगळुरूचा ९ गड्यांनी विजय

**सामनावीर विल जॅक्सचे शतक, कोहलीचे अर्धशतक**

◆ **अहमदाबाद, २८ एप्रिल**

रविवारी नरेंद्र मोदी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या आयपीएल सामन्यात विल जॅक्सचे (नाबाद १००) शतक व विराट कोहलीच्या (७०) अर्धशतकाच्या बळावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने माजी विजेत्या गुजरात टायटन्सवर ९ गडी राखून दणदणीत विजय नोंदविला. गुजरातच्या साई सुदर्शन (८४) व मोहम्मद शाहरूख खानने (५४) झळकावलेले अर्धशतक व्यर्थ ठरले.

गुजरात टायटन्सने २० षटकांत ३ बाद २०० धावा उभारल्या आणि बंगळुरूसमोर विजयासाठी २०१ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले. बंगळुरूने १६ षटकांत १ बाद २०६ धावा काढून आपला विजय निश्चित केला. या विजयाबरोबर आरसीबीचे आता ६ गुण झाले असून मुंबई व बंगळुरूचे प्रत्येकी सहा गुण असून ते तळाच्या स्थानी आहेत.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या गुजरात टायटन्सकडून सलामीवीर ऋद्धिमान साहा (५) व शुभमन गिल (१६) लवकरच बाद झाले, परंतु त्यानंतर साई सुदर्शन, मोहम्मद शाहरूख खान व डेव्हिड मिलरने बंगळुरूच्या गोलंदाजांचा धैर्याने सामना करत संघाच्या धावसंख्येला आकार दिला. साई व शाहरुखानने तिसऱ्या गड्यासाठी ८६ धावांची भागीदारी केली. मोहम्मद सिराजच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी शाहरूखने अवघ्या ३० चेंडूंत ३ चौकार व ५ षट्कारांच्या मदतीने ५८ धावांची खेळी केली. त्यानंतर साई सुदर्शनने डेव्हिड मिलरच्या साथीने नाबाद खेळी करत संघाला दोनशे धावांचा टप्पा गाठून दिला. साई सुदर्शनने ४९ चेंडूंत ८ चौकार व ४ षट्कारांसह नाबाद ८४ धावांची खेळी केली, तर मिलरने १९ चेंडूंत २ चौकार व षट्कारसह नाबाद २६ धावांची भर घातली.

विजयासाठी २०१ धावांचा पाठलाग करताना विराट कोहली व फाफ डु प्लेसिसने ४० धावांची सलामी भागीदारी करत आपल्या आरसीबी संघाच्या विजयाचा पाया रचला. प्लेसिस १२ चेंडूंत २४ धावा काढून साई किशोरच्या गोलंदाजीला बळी पडला. त्यानंतर कोहली व विल जॅक्सने नाबाद खेळी करत आरसीबीच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. कोहलीने ४४ चेंडूंत ६ चौकार व ३ षट्कारांसह नाबाद ७० धावांची, तर विल जॅक्सने अवघ्या ४१ चेंडूंत नाबाद १०० धावांची विजयी खेळी केली. (वृत्तसंस्था)

# भारतीयांमध्ये किरण, संजीवनी प्रथम

**टीसीएस जागतिक १० के बंगळुरू मॅराथॉन**

**पीटर व लिलियान आपापल्या गटांत अव्वल**

◆ **बंगळुरू, २८ एप्रिल**

येथे रविवारी पार पडलेल्या सोळाव्या टीसीएस जागतिक १० के बंगळुरू मॅरेथॉनमध्ये आंतरराष्ट्रीय गटात पुरुषांत केनियाच्या पीटर एमवानिकीने (२८.१५ सेकंद), तर महिलांत लिलियान कसाईतने (३०.५६ सेकंद) विजेतेपद पटकावले. भारतीयांमध्ये पुरुष गटात किरण म्हात्रेने (२९.३२) प्रथम स्थान, तर महिला गटात संजीवनीने (३४.०५) प्रथम स्थान मिळविले.

पीटर व लिलियान हो देघेही पुरुष गटातील २७.३८ सेकंदाचा, तर महिला गटातील ३०.३५ सेकंदाचा विक्रम मोडण्यात अपयशी ठरले.




भारतीय गटात महिलांमध्ये पहिल्या तीन क्रमांकावर स्थान मिळविणाऱ्या संजीवनी (मध्यभागी), लिली दास व प्रीनू यादव

पुरुष गटात पीटर पाठोपाठ हिलरी चेपक्वानी (केनिया, २८.३३), हॅगोस इयोब (इथिओपिया, २८.३९) स्थान मिळविले. भारतीय पुरुषांमध्ये रणजित पटेल (२१९.३५) व धर्मेंद्र (२९.४५) अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान मिळविले. भारतीय महिलांमध्ये लिली दास (३४.१३ सेकंद) व प्रीनू यादवने (३४.२४) अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान मिळविले. (वृत्तसंस्था)

# मेस्सीचे २ गोल, इंटर मियामी विजयी


**मेजर लीग सॉकर**

◆ **फॉक्सबोरो, २८ एप्रिल**

प्रतिष्ठेच्या मेजर लीग सॉकर (एमएलएस) स्पर्धेत मॅसॅच्युसेट्सच्या फॉक्सबोरो येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात लियोनेल मेस्सीने नोंदवलेल्या दोन गोलच्या बळावर इंटर मियामीने न्यू इंग्लंड रिव्हॉल्यूशन संघावर ४-१ अशा गोलफरकाने शानदार विजय मिळवला.

बेंजामिन क्रेमास्ची व लुईस सुआरेझने गोल नोंदवून इंटर मियामीच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. इंटर मियामीचे पाच सामन्यातून २१ गुणांची कमाई केली. इंटर मियामीने रिव्हॉल्यूशन संघाविरुद्धच्या विजयाच्या रेकॉर्डमध्ये ४-३ अशी सुधारणा केली व फॉक्सबोरोमध्ये आपला सलग तिसरा पराभव टाळला.

सरळ तीन सामने गमावल्यानंतर मैदानावर उतरणाऱ्या न्यू इंग्लंड रिव्हॉल्यूशनने उत्स्फर्त खेळाला सुरुवात केली व पहिल्याच मिनिटात टॉमस चॅन्कलेने गोल केला व आघाडी मिळविली. एका गोलने पिछाडीवर राहिलेल्या इंटर मियामीच्या मेस्सीने ३२ व्या मिनिटाला रॉबर्ट टेलरकडून मिळालेल्या चेंडूवर ताबा घेत झकासपणे गोल नोंदवून आपल्या संघाला सामन्यात १-१ असे बरोबरीवर आणले.




न्यू इंग्लंड रिव्हॉल्यूशनविरुद्धच्या एमएलएस सामन्यात चेंडूसाठी संघर्ष करताना इंटर मियामीचा लियोनेल मेस्सी

त्यानंतर ६८ व्या मिनिटाला अर्जेंटिनाने मियामीला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. ८३व्या मिनिटाला क्रेमास्चीने मियामीला ३-१ अशी आघाडी मिळवून दिली.

सलग पाच सामन्यात एकापेक्षा अधिक गोलचे योगदान देणारा मेस्सी हा एमएलएस इतिहासातील पहिला खेळाडू ठरला. एमएलएसमध्ये नऊ गोलसह मेस्सी क्रिस्टियन अरांगोपेक्षा एका गोलने आघाडीवर आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# विकासासाठी मोदींना मत द्या : देवेंद्र फडणवीस

## अकलूज येथील महायुतीचे उमेदवार रणजितसिंह निंबाळकर यांच्या प्रचारसभेत केले आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २९ एप्रिल-**

भारताचे पंतप्रधान विश्वगुरू नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षांत मोठा विकास केला. बेघरांना घरे दिली. शुद्ध पिण्याचे पाणी पुरवले. रेशन फ्री केले. मुद्रा लोन स्वतः जामीन राहून दिले. बाराबलुतेदारांसाठी विश्वकर्मा योजना लागू केली आणि अशा मोदींना पुन्हा एकदा भारताचे पंतप्रधान करण्याची संधी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या रूपाने आली आहे. रणजितसिंहांना मत म्हणजेच मोदींना मत असे समजून आपण आपले बहुमूल्य मत भाजपाच्या उमेदवारांना द्यावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

अकलूज येथील विजय चौकात झालेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी आ. जयकुमार गोरे, माजी आ. प्रशांत परिचारक, पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील, रश्मी बागल, चित्राताई वाघ, राजकुमार पाटील, ॲड. सुभाष पाटील, विठ्ठलराव शिंदे, के. के. पाटील, बाजीराव काटकर, मुक्तार कोरबू, अशोक गायकवाड, हनुमंतराव सुळ, राहुल ढेरे, ॲड. सोमनाथ वाघमोडे उपस्थित होते. उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी आपण प्रलंबित असलेल्या रेल्वे प्रकल्प, नीरा देवधरचे पाणी २२ गावांना मिळवून देण्यात यश मिळवले आहे. लवकरच या भागात एमआयडीसी व तरुणांना रोजगार मिळेल असे आश्वासन दिले.




### घड्याळ चित्र अन् कमळ कमळ आवाज

चित्राताई वाघ यांनी अनावधाने रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या घड्याळाच्या चित्रावर मतदान करा असे म्हणताच प्रेक्षकांमधून कमळ कमळ असा आवाज आला आणि त्यांनी ती चूक दुरुस्त करत रणजिसिंह यांच्या विजयासाठी कमळावर मतदान करा, असे जाहीर केले.

### धवलसिंह समर्थकांची मोटरसायकल रॅली

धवलसिंह मोहिते-पाटील यांनी रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना पाठिंबा दिला. त्यांचे कार्यकर्ते मोटरसायकल रॅलीने सभेस उपस्थित राहिले. यावेळी पद्मजादेवी मोहिते-पाटील यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत देवेंद्र फडणवीस आमदार असताना येथे आले होते. नंतर लगेचच ते मुख्यमंत्री झाले. या विजय चौकातील सभेला आज अतिशय महत्त्व आहे, असे सांगितले.

### मोहिते-पाटलांबाबत वाईट वाटते

मोहिते-पाटलांविषयी देवेंद्र फडणवीस काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष होते. ते म्हणाले आम्ही ज्यांना सहकार्य केले त्यांनी आमची साथ सोडली. त्यांना संधीचा उपयोग करता आला नाही. पवारांनी त्यांचे पत्ते कट केले होते. राजकीय अस्तित्व संपवले होते. त्याच पवारांसोबत जाताना वाईट वाटते. धवलसिंहांचा लवकरच निर्णय होईल व ते आपल्या सोबत असतील असेही यावेळी ते म्हणाले.

## महत्त्वाचे

### ‘सोढी’चे शेवटचे लोकेशन मिळाले

**नवी दिल्ली :** ‘तारक मेहता का उल्टा चष्मा’ या लोकप्रिय मालिकेतील सोढीची भूमिका साकारणारा कलाकार



गुरुचरणसिंग चार दिवसांपासून बेपत्ता असल्याने खळबळ माजली आहे. आता त्याच्याविषयीचे शेवटचे लोकेशन पोलिसांना सापडले आहे. त्यानुसार, दिल्लीतील पालमसह अनेक भागातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये हा अभिनेता पाठीवर बॅग घेऊन पायी चालताना दिसला. एवढेच नव्हे, तर त्याने दिल्लीतील एटीएममधून सात हजार रुपये काढले आहेत. त्याचे मोबाईलमधील तपशील तपासल्यानंतर पोलिसांना या गोष्टी लक्षात आल्या आहेत.

### देवेगौडा यांच्या नातवावर लैंगिक शोषणाचा गुन्हा

**बंगळुरू :** कर्नाटकातील हसन लोकसभा मतदारसंघाचे खासदार व माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे नातू प्रज्वल रेवन्ना यांच्यावर लैंगिक शोषणाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, चौकशीसाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी यासंदर्भातील आदेश दिले आहे. समाज माध्यमावर रेवन्ना यांचे महिलांसोबतचे अश्लील व्हिडीओ व्हायरल झाले होते. याप्रकरणी हसन जिल्ह्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याची दखल घेत कर्नाटक राज्य महिला आयोगाने २६ एप्रिल रोजी मुख्यमंत्र्यांकडे या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसआयटी गठित करण्याची मागणी केली होती. कर्नाटकात व्हायरल व्हिडीओवरून माजी मुख्यमंत्री एच. डी. कुमारस्वामी यांनी म्हटले की, मुलाला बदनाम करण्यासाठी आखलेला हा राजकीय डाव आहे.

### भारतीय हद्दीत घुसलेल्या पाकिस्तानी नागरिकाला सोपविले

**चंदीगड :** अनवधानाने भारतीय हद्दीत घुसल्यानंतर पकडण्यात आलेल्या एका पाकिस्तानी नागरिकाला मानवतावादी आधारावर पाकिस्तान लष्कराकडे सोपविण्यात आल्याची माहिती बीएसएफच्या प्रवक्त्याने रविवारी दिली. सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) जवानांनी शनिवारी पंजाबच्या फाजिल्का जिल्ह्यात सीमेवरील कुंपणाजवळ पाकिस्तानी नागरिकाला पकडले होते. चौकशी दरम्यान त्याने सांगितले की, त्याला आंतरराष्ट्रीय सीमेची माहिती नव्हती आणि त्याने अनवधानाने भारतीय हद्दीत प्रवेश केला. त्याच्या झडतीदरम्यान त्या व्यक्तीकडे आक्षेपार्ह काहीही आढळले नाही. पाकिस्तानी नागरिकांच्या अनावश्यक हालचालींना प्रतिबंधित करण्यात अपयश आल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यासाठी पाकिस्तान लष्करासोबत फ्लॅग मीटिंग आयोजित करण्यात आली होती.

### कोरोनातील तीन मृतकांवर पाच वर्षांनंतर अंत्यसंस्कार

**रायपूर :** कोरोनातील कथा आजही ऐकवल्या जातात. मात्र, छत्तीसगडमध्ये त्यावेळी कोरोनाने दगावलेल्या पाचजणांच्या पार्थिवावर तब्बल पाच वर्षांनंतर अंत्यसंस्कार करण्यात आला. पहिल्या लाटेत मृत्युमुखी पडलेल्या तीन जणांच्या मृतदेहांवर आता अंत्यसंस्कार झाले. त्यांचे मृतदेह पीपीई बॅगमध्येच पडून होते. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अंत्यसंस्काराचा आदेश न दिल्याने ते राहून गेले. असे आश्चर्यकारक कारण समोर आल्याने सारेच चकित आहेत.

### अजमेरमध्ये मौलवींला मारहाण

**जयपूर :** राजस्थानमधील अजमेर येथील एका मशिदीच्या मौलवीला तीन मुखवटा घातलेल्या लोकांनी मारहाण केली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे पोलिसांनी सांगितले. ही घटना शनिवारी पहाटे २ च्या सुमारास घडली. आरोपींनी रामगंज पोलिस स्टेशनच्या हद्दीतील कांचन नगरमध्ये असलेल्या मशिदीत प्रवेश केला आणि मौलवी मोहम्मद ताहीर यांच्यावर लाठ्यांनी हल्ला केला. ताहिरचा जागीच मृत्यू झाला. ही घटना घडली तेव्हा मशिदीत सहा मुलेही उपस्थित होती, असे पोलिसांनी सांगितले. आरोपींनी मुलांना याबाबत वाच्यता न करण्याची धमकी दिली आणि कोणालाही माहिती देऊ नये किंवा मदतीसाठी फोन करू नये म्हणून त्यांचे मोबाईल हिसकावून घेतले.

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | ४१.३ | २७.६ |
| अमरावती | ३९.२ | २४.७ |
| बुलडाणा | ३९.१ | २७.६ |
| चंद्रपूर | ४१.८ | २३.० |
| गडचिरोली | ४१.६ | २४.४ |
| गोंदिया | ३३.८ | २४.४ |
| नागपूर | ३७.४ | २४.२ |
| वर्धा | ३९.० | २३.० |
| वाशीम | ४१.८ | २२.२ |
| यवतमाळ | ४१.५ | २३.० |



बंगळुरू येथे रविवारी आयोजित मॅरेथॉन स्पर्धेत राम, हनुमान व इतर विविध वेशभूषांमध्ये लोकांनी सहभाग घेतला

# ‘वंदे मेट्रो ट्रेन’ लवकरच सुरू होणार

## प्रवाशांना मिळणार इंटरसिटीसारख्या सुविधा!

◆ **नवी दिल्ली, २८ एप्रिल**

लवकरच वंदे मेट्रो ट्रेन देशात धावताना दिसणार आहे. या गाड्या सुरू झाल्याने दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मोठी सोय होणार आहे. कारण, या गाड्या इंटरसिटीच्या धर्तीवर चालवल्या जाणार आहेत. म्हणजेच या गाड्या त्यांच्या मार्गावरील बहुतांश स्थानकांवर थांबतील.

सध्या वंदे भारत मेट्रो ट्रेनचे काम वेगाने सुरू आहे. सुरुवातीला १२४ शहरांना जोडण्यासाठी वंदे भारत मेट्रो ट्रेन चालवली जाईल. याबाबत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, पहिली वंदे मेट्रो ट्रेन जुलैपासून रुळांवर धावण्यास सुरुवात होईल. सुरुवातीला दोन-तीन महिने चाचणी तत्त्वावर चालवली जाईल. त्यानंतर इतर मार्गांवरही चालवण्यात येईल.

मात्र, आतापर्यंत या गाड्या कोणत्या मार्गावर चाचणीसाठी चालवल्या जाणार आहेत, हे माहीत नाही. लवकरच या गाड्यांच्या चाचणीसाठी रेल्वे मार्ग निश्चित करणार आहे. आतापर्यंत ५० वंदे भारत गाड्या तयार झाल्या आहेत. चाचणीनंतर ४०० अतिरिक्त वंदे मेट्रो गाड्या मागवल्या जातील. येत्या दोन वर्षांत या गाड्यांचे संचालन सुरू करण्यात येणार आहे. वंदे मेट्रो ट्रेनमधील डब्यांची संख्या गरजेनुसार ठरवली जाईल. जर आपण वंदे भारत मेट्रो ट्रेनच्या डब्याबद्दल बोललो तर या रेल्वे गाड्यांना चार, पाच, १२ आणि १६ डबे असतील.

मात्र, ज्या मार्गांवर प्रवासी संख्या जास्त असेल, त्या मार्गांवर धावणाऱ्या वंदे मेट्रो ट्रेनमधील डब्यांची संख्या १६ असेल. जिथे किमान प्रवासी असतील, तिथे चार डब्यांच्या गाड्या चालवल्या जातील. इंटरसिटीच्या धर्तीवर पहिली स्वदेशी सेमी-हायस्पीड वंदे मेट्रो धावणार आहे. ही ट्रेन त्या शहरांना जोडेल जी जास्तीत जास्त २५० किमी अंतरावर असतील. ◂(वृत्तसंस्था)

# स्वस्तात मिळणार फ्रीज, टीव्ही, वॉशिंग मशीन, एसी

## गृहोपयोगी वस्तूंच्या बाजारातही अंबानींचा प्रवेश

◆ **मुंबई, २८ एप्रिल**

दिग्गज भारतीय उद्योगपती मुकेश अंबानी यांनी ऊर्जेपासून ते फॅशनपर्यंत अन् इंटरनेटपासून ते ग्रॉसरीपर्यंत विविध क्षेत्रांत १९,८५,००० कोटी रुपयांचा व्यवसाय उभारला आहे. पण, आता अंबानी आणखी एका क्षेत्रात खळबळ माजवण्याच्या तयारीत आहेत. रिलायन्स इंडस्ट्रीज, कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स आणि होम अप्लायन्स व्यवसायात उतरण्याच्या तयारीत आहे.

गेल्या वर्षीच रिलायन्स कंझ्युमरने मेड फॉर इंडिया कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक ब्रॅण्ड ‘इंडिपेंडन्स’ लॉन्च केला होता. या ब्रॅण्डअंतर्गत रिलायन्सने पीठ, तांदूळ, डाळीसारखे स्वस्त खाद्यपदार्थ बाजारात आणले. आता कंपनी स्वस्त एसी, फ्रीज, टीव्ही यासारख्या कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स आणि होम अप्लायन्स व्यवसायात उतरण्याची तयारी करीत आहे. या सेगमेंटमधील परदेशी कंपन्यांचे वर्चस्व कमी करण्यासाठी रिलायन्सने योजना आखली आहे. सध्या या सेगमेंटमध्ये एलजी, सॅमसंग, व्हर्लपूल, हेअर सारखे ब्रॅण्ड्स आहेत.

रिलायन्स व्हायझर ब्रॅण्ड अंतर्गत मेड-इन-इंडिया उत्पादने लॉन्च करण्याच्या तयारीत आहे. या अंतर्गत एसी, टीव्ही, फ्रीज, एलईडी बल्ब, वॉशिंग मशीनसारखी उत्पादने लॉन्च केली जातील. दरम्यान, भारतात घरगुती उपकरणांची बाजारपेठ १.१ लाख कोटी रुपयांची आहे, ज्यामध्ये एलजी, सॅमसंग, व्हर्लपूल, हायर इत्यादी परदेशी कंपन्यांचा ६० टक्के हिस्सा आहे, तर एसी मार्केटमध्ये टाटाच्या व्होल्टासचे वर्चस्व आहे.

अलिकडेच रिलायन्स रिटेलने एअर कूलर लॉन्च केले. आता कंपनी होम अप्लायन्स क्षेत्रात दबदबा वाढवण्यासाठी डिक्सन टेक्नॉलॉजीज आणि मिर्क इलेक्ट्रॉनिक्स, या कंपन्यांशी बोलणी करीत आहे. विशेष म्हणजे, जिओप्रमाणेच इतरांपेक्षा स्वस्त उत्पादन देण्याचा रिलायन्सचा शिरस्ता असल्याने त्यांच्या आगमनाने बड्या कंपन्यांचे धाबे दणाणले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### बीएमडब्ल्यू आय-५ लक्झरी कार लॉन्च

**नवी दिल्ली :** बीएमडब्ल्यू इंडियाने बीएमडब्ल्यू आय-५ ही लक्झरी कार भारतीय बाजारात आणली आहे.

ही कार म्हणजे बीएमडब्ल्यूच्या नवीन जनरेशन आय-५ सीरिज सेडानचे इलेक्ट्रिक व्हर्जन आहे. कंपनीचा दावा आहे की, ही लक्झरी इलेक्ट्रिक कार पूर्ण चार्ज केल्यावर ५१६ किलोमीटरपेक्षा जास्त रेंज देऊ शकते. त्यात ड्युएल डिजिटल डिस्प्ले, पॅनॉरॅमिक ग्लास रूफ आणि एडीएएससारख्या प्रगत वैशिष्ट्यांसह प्रदान करण्यात आले आहे. ऑडी ई-ट्रॉन जीटी आणि पोर्शे टायकनचे एंट्री लेव्हल व्हेरिएंट बदलण्यासाठी ही कार स्वस्त पर्याय म्हणून घेतली जाऊ शकते. याची किंमत १.२० कोटी रुपये असून, वॉरंटी १.६ लाख किलोमीटरपर्यंत आहे. याचे बुकिंग आधीच सुरू झाले आहे.

### देशातील जमिनीचे सर्वाधिक व्यवहार दिल्लीत

◆ **नवी दिल्ली, २८ एप्रिल**

देशात आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये जमिनीचे १०१ मोठे व्यवहार झाले. त्यात एकूण २,९८९ एकर जमिनीची विक्री झाली. सर्वाधिक व्यवहार देशातील प्रमुख सात महानगरांत झाले आहेत. जमिनीच्या व्यवहारांमध्ये दिल्लीने प्रथम क्रमांक पटकावला असून, मुंबई दुसऱ्या स्थानी आहे.

मालमत्ता क्षेत्रातील सल्लागार संस्था अनारॉकने सरलेल्या आर्थिक वर्षात देशात झालेल्या जमीन व्यवहारांचा अहवाल जाहीर केला आहे. या अहवालानुसार, गेल्या आर्थिक वर्षात १०१ मोठे जमीन व्यवहार झाले. त्यात २,९८९ एकर जमिनीची विक्री झाली. त्याआधीच्या आर्थिक वर्षात ८३ व्यवहार होऊन १,८८६ एकर जमिनीची विक्री झाली होती. त्या तुलनेत गेल्या वर्षी जमिनीची विक्री ५८ टक्के जास्त आहे. गृहनिर्माण बाजारपेठेत तेजीचे वातावरण असल्याने या प्रकल्पांसाठी प्रामुख्याने जमिनीचे व्यवहार झाले आहेत.

देशातील प्रमुख सात महानगरांमध्ये ८३ व्यवहार झाले असून, त्यातून १,१३५ एकर जमिनीची विक्री झाली आहे. त्यात दिल्ली ३१३ एकरच्या २९ व्यवहारांसह आघाडीवर आहे. मुंबई १५७ एकरच्या १९ व्यवहारांसह दुसऱ्या स्थानी आहे. ◂(वृत्तसंस्था)

### ‘आयटी’ कंपन्यांच्या मनुष्यबळात घट

**नवी दिल्ली :** माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील देशातील आघाडीच्या कंपन्यांच्या मनुष्यबळात सरलेल्या आर्थिक वर्षात घट नोंदविण्यात आली आहे. यात टीसीएस, इन्फोसिस आणि विप्रो या प्रमुख कंपन्यांचा समावेश आहे.

विप्रो कंपनीच्या मनुष्यबळात मागील दशकभरात तिसऱ्यांदा वार्षिक घट नोंदविण्यात आली आहे. कंपनीचे मनुष्यबळ आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या सुरुवातीला २,५८,५७० होते. आर्थिक वर्षाच्या अखेरीस ते २,३४,०५४ वर घसरले. वर्षभरात कंपनीच्या मनुष्यबळात एकूण २४,५१६ म्हणजेच ९.५ टक्के घट झाली. सलग सहाव्यात तिमाहीत विप्रोच्या मनुष्यबळात घट झाली आहे. टीसीएसचे मनुष्यबळ गेल्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला ६,१४,७९५ होते. आर्थिक वर्ष संपले त्या वेळी हे मनुष्यबळ ६,०१,५४६ वर आले आहे. एकूण १३,२४९ म्हणजेच २.१ टक्के घट नोंदविण्यात आली. टीसीएसच्या मनुष्यबळात १९ वर्षांमध्ये पहिल्यांदाच घट झाली आहे. इन्फोसिसचे मनुष्यबळ गेल्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला ३,४३,२३४ होते. आर्थिक वर्षाच्या अखेरीस ते ३,१७,२४० वर आले. वर्षभरात कंपनीच्या मनुष्यबळात एकूण २५,९९४ म्हणजेच ७.५ टक्के घट नोंदविण्यात आली आहे.




### कंगनाची भाजपा मुख्यालयाला भेट

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात सगळेच नेते व्यस्त आहेत, त्यामुळे सर्वच पक्षांच्या मुख्यालयात नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची गर्दी कमी झाली आहे. भाजपा मुख्यालयाचाही याला अपवाद नाही. जबाबदारी दिलेले प्रमुख नेते आणि राष्ट्रीय प्रवक्ते वगळता भाजपा मुख्यालयात कोणी प्रमुख नेते सध्या दिसत नाही. पक्षात प्रवेश करणाऱ्यांची गर्दी भाजपा मुख्यालयात रोजच दिसून येते. नाही म्हणायला विविध वाहिन्यांचे पत्रकार दिवसभर ठाण मांडून असतात. मागील आठवड्यात चित्रपट अभिनेत्री कंगनाने भाजपा मुख्यालयाला अचानक भेट दिली. कंगना हिमाचलप्रदेशच्या मंडी लोकसभा मतदारसंघात भाजपाची उमेदवार आहे. मंडीमध्ये तिचा मुकाबला काँग्रेस नेते विक्रमादित्यसिंह यांच्याशी आहे. कंगना तशीही राष्ट्रीयपातळीवर चर्चेत असते. महाराष्ट्रात महाविकास आघाडीच्या सरकारला तिने चांगलेच जेरीस आणले होते.

कंगनाला पाहून माध्यमांच्या पत्रकारांची धावपळ उडाली. कंगनाने भाजपा महासचिव चुघ यांची भेट घेतली. माध्यम विभागाचे सहप्रमुख संजय मयख यांनाही ती भेटली. आपल्या मतदारसंघातील निवडणूक व्यूहरचनेबाबत भाजपा नेत्यांशी चर्चा करायला, ती भाजपा मुख्यालयात आली असता, पत्रकारांना बाईटही दिला. पत्रकार तसेच भाजपा मुख्यालयातील कर्मचाऱ्यांनी कंगनासोबत छायाचित्र आणि सेल्फी काढून घेतली. तिने कोणालाच नाराज केले नाही. असेस्तोवर काहीवेळ भाजपा मुख्यालयात वर्दळ उडाली होती.

### रोहिणी आचार्य यांची लढत लालूप्रसाद यादवांशीच

नावात काय असते, असे म्हटले जाते. पण, नावातच सर्व काही असते. एका नावाच्या अनेक व्यक्ती असतात. नामसाधर्म्यामुळे अनेकवेळा गोंधळ उडतो. मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी राजकीय पक्ष काही मतदारसंघांत एकाच नावाचे आणि आडनावाचे अनेक उमेदवार रिंगणात उतरवतात. महाराष्ट्राच्या रायगड जिल्ह्यात सुनील तटकरे नावाचे दोन-तीन उमेदवार काही वर्षांपूर्वी रिंगणात होते, असे म्हणतात. बिहारच्या सारण लोकसभा मतदारसंघात राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि राजद नेते लालुप्रसाद यादव यांच्या कन्या रोहिणी आचार्य रिंगणात आहेत. त्यांचा सामना माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते राजीव प्रताप रुडी यांच्याशी आहे. या लढतीमुळे चर्चेत असलेला हा मतदारसंघ आणखी एका गोष्टीमुळे चर्चेत आला आहे. या मतदारसंघातून लालुप्रसाद यादव यांनीही अर्ज भरला आहे. पण, तुम्ही समजता ते हे लालुप्रसाद यादव नाही. हे मुख्यमंत्री नाही आणि राजदचे नेतेही नाही. हे नामसाधर्म्य असलेले अपक्ष उमेदवार आहे. निवडणुका लढवण्याचा त्यांचा छंद आहे. आतापर्यंत नगरसेवकपदापासून राष्ट्रपतिपदाच्या अनेक निवडणुका त्यांनी लढवल्या. पण, कोणत्याही निवडणुकीत ते जिंकू शकले नाही. सारणमध्ये रोहिणी आचार्य यांना एका लालुप्रसाद यादव यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरवले, तर दुसऱ्या लालुप्रसाद यादवांविरोधात त्यांना निवडणूक लढावी लागत आहे. अपक्ष लालुप्रसादांना किती मते मिळतील, हे सांगता येणार नाही, पण नामसाधर्म्यामुळे त्यांना राष्ट्रीय पातळीवर प्रसिद्धी चांगली मिळाली आहे.

### दक्षिण भारतीय आणि वीरेंद्र सचदेव

लोकसभा निवडणुकीचा प्रचार सध्या जोरात सुरू आहे. या काळात प्रत्येक गोष्टीचा तसेच कार्यक्रमाचा उपयोग राजकीय पक्ष निवडणूक प्रचारासाठी करून घेतात. मागील आठवड्यात माजी उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांनी आपल्या निवासस्थानी एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी त्यांनी अनेक भाजपा नेत्यांना आमंत्रित केले होते. त्यानुसार सगळेच नेते उपस्थित होते. मात्र, यात दिल्ली प्रदेश भाजपा अध्यक्ष वीरेंद्र सचदेव यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सचदेव दक्षिण भारतीय लोक परिधान करतात, तशी लुंगी (मुंडू) नेसून आले होते. याबाबत विचारले असता, सचदेव म्हणाले की, यंदा दक्षिण भारतात कमळ मोठ्या प्रमाणात फुलणार आहे. त्याची ही सुरुवात आहे.

राजधानी दिल्लीच्या सातही लोकसभा मतदारसंघात दक्षिण भारतीय मतदारांची संख्या लक्षणीय आहे. दक्षिण भारतीय मतदारांना आपल्याकडे वळवण्यासाठी भाजपा प्रयत्न करीत आहे. दक्षिण भारतातील भाजपाच्या अनेक नेत्यांना प्रचारासाठी दिल्लीत बोलावले जाणार आहे. भाजपाचे अध्यक्ष के. अण्णामलाई हे भाजपाचे दक्षिण भारतीय मतदारांसाठीचे स्टार प्रचारक राहणार आहेत. ते आल्यानंतर या प्रचाराला वेग येणार आहे. त्याची सुरुवात सचदेव यांनी नायडू यांच्या निवासस्थानी दक्षिण भारतीय वेषभूषेत येऊन केली.

### संजीव बलियान यांच्यासमोरील दुहेरी आव्हान

काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी अमेठी मतदारसंघातून, तर त्यांची बहीण काँग्रेस प्रियांका वढेरा रायबरेलीतून लोकसभेची निवडणूक लढणार असल्याची चर्चा सुरू आहे. मात्र, काँग्रेस पक्षाने या दोघांच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा केली नाही. भाजपाने अमेठीतून केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांची उमेदवारी जाहीर केली. मात्र, रायबरेलीतील आपल्या उमेदवाराची घोषणा केली नाही. इराणी जवळपास महिनाभरापासूनच अमेठीत तळ ठोकून आहेत. २९ एप्रिलला त्या उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. अमेठी आणि रायबरेलीत पाचव्या टप्प्यात म्हणजे २० मेला मतदान होणार आहे. पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यपालन राज्यमंत्री संजीव बलियान अमेठी लोकसभा मतदारसंघाचे भाजपाचे निवडणूक प्रभारी आहेत.

आतापर्यंत बलियान स्वत:च्या मुजफ्फरनगर मतादरसंघातील निवडणुकीत व्यस्त होते. आता या मतदारसंघातील निवडणूक आटोपली असून, येते काही आठवडे ते अमेठीत तळ ठोकून बसणार आहेत. २०१९ च्या निवडणुकीतही बलियान अमेठीत भाजपाचे निवडणूक प्रभारी होते, त्यावेळी स्मृती इराणी यांनी राहुल गांधी यांचा पराभव केला होता. यावेळी स्वत: बलियान यांना आपल्या मतदारसंघातील निवडणूक जिंकण्यासोबत अमेठीत स्मृती इराणी यांना विजयी करण्याचे आव्हान आहे. अमेठीतील भाजपाच्या विजयावर बलियान यांचे केंद्रीय मंत्रिमंडळातील स्थान अवलंबून आहे. ही दोन्ही आव्हाने बलियान यशस्वीपणे यात शंका नाही.

*दिल्लीवाला*

# प. बंगाल सरकारची सुप्रीम कोर्टात धाव

## संदेशखालीच्या सीबीआय चौकशी आदेशाला आव्हान

◆ **नवी दिल्ली, २८ एप्रिल**

संदेशखाली येथील महिलांवरील गुन्हे आणि जमीन बळकावण्याच्या आरोपांची सीबीआय चौकशी करण्याचा निर्देश देणाऱ्या कलकत्ता उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या पश्चिम बंगाल सरकारच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी होणार आहे.

न्या. बी. आर. गवई आणि न्या. संदीप मेहता यांच्या न्यायासनासमोर या प्रकरणाची सुनावणी होण्याची शक्यता आहे. उच्च न्यायालयाच्या १० एप्रिलच्या आदेशाने पोलिस दलासह संपूर्ण राज्य यंत्रणेचे मनोधैर्य खचले, असे राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत म्हटले आहे.

उच्च न्यायालयाने एका अत्यंत सामान्य आदेशात राज्याला निर्देश दिला की, सीबीआयला कोणत्याही मार्गदर्शक तत्त्वांशिवाय आवश्यक ती मदत करावी. संदेशखाली येथे ईडीच्या अधिकाऱ्यांवर झालेल्या हल्ल्याचा तपास सीबीआय आधीच करीत आहे आणि ५ जानेवारी रोजी झालेल्या घटनांशी संबंधित तीन गुन्हे नोंदवले आहेत.

संदेशखाली येथील महिलांवरील गुन्हे आणि जमीन बळकावण्याच्या आरोपांची चौकशी करून पुढील सुनावणीच्या तारखेला सर्वसमावेशक अहवाल सादर करण्याचा आदेशही उच्च न्यायालयाने सीबीआयला दिला.

हायकोर्टाने म्हटले की, या प्रकरणाची २ मे रोजी पुन्हा सुनावणी होईल, या दिवशी सीबीआयला अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.

रेशन वितरण घोटाळाप्रकरणी तृणमूल काँग्रेसचा निलंबित नेता शाहजहान शेखच्या ठिकाणांची झडती घेण्यासाठी ईडीचे अधिकारी संदेशखाली येथे ५ जानेवारी रोजी गेले असता जमावाने त्यांच्यावर हल्ला केला होता. ◂(वृत्तसंस्था)

### भांडुपमध्ये सापडलेली रक्कम बँकेचीच

◆ **मुंबई, २८ एप्रिल**

ऐन निवडणुकीच्या काळात शनिवारी रात्री भांडूपमधून मोठी रोकड जप्त झाल्याने चर्चेला ऊत आला होता. मात्र, ही सव्वा दोन कोटींची रक्कम बँकेचीच असल्याचे निष्पन्न झाले. ही रक्कम एटीएममध्ये भरण्यासाठी घेऊन जात असल्याचे समोर आले. या प्रकरणी तरीही आयकर विभाग अधिक चौकशी करीत आहे. निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाने शनिवारी रात्री उशिरा भांडूप सोनापूर येथून सेक्युर कंपनीची व्हॅन पकडली होती. ◂(वृत्तसंस्था)

## संक्षिप्त वृत्त

### भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आ. राम सातपुते यांच्या प्रचारार्थ रॅप साँग

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ रॅप साँग तयार करण्यात आले आसून सोलापूर शहर आणि जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. सोलापूर लोकसभा निवडणुकीत भाजप आणि महायुतीचे उमेदवार आ. राम सातपुते यांच्या प्रचारार्थ नवे रॅप साँग लाँच करण्यात आले आहे. मुद्द्याचेच बोलतोय एक जरा असे त्याचे नाव आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील नागरिकांची या रॅप साँगला पसंती मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपा सरकारने केलेली कामे, आमदार राम सातपुते यांनी माळशिरस विधानसभेत केलेली भरीव कामे यांवर आधारित हे रॅप साँग आहे. सोशल मीडियामधून हे रॅप साँग मोठ्या प्रमाणावर शेअर केले जात आहे.

### सोलापूरचे डॉ. श्रीगणेश पाटील यांनी शेअर केली फिटस्‌बद्दल माहिती

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त डॉ. श्रीगणेश पाटील, लहान मुलांचे मेंदूरोग व फिट तज्ञ,(एमबीबीएस,डीसीएच,डीएनबी फेलोशिप इन पेडियाट्रिक न्यूरोलॉजी आणि एपिलेप्सी (मुंबई) पीजीडीएमएलएस) यांनी फिटस्‌बद्दल माहिती शेअर केली. डॉ. पाटील म्हणाले, फिटस् हा मेंदूच्या एक सामान्य आजार आहे. मेंदूमधील विद्युत लहरीच्या शॉटसर्किटमुळे फिटस होतात. त्यांनी फिटसबाबत गैरसमज आणि सत्यता यावर प्रकाश टाकला. फिटसबाबतचे गैरसमज म्हणजे फिटस् दैवी किवा मायावी शक्तिमुळे हातात. फिट संसर्गजन्य आजार आहे. असा रुग्णांचा संपर्क, एकत्रित जेवणामुळे हा आजार होतो. फिटस् आल्यानंतर तोंडामध्ये धातूचा चमच्यासारख्या कठीण वस्तू ठेवल्याने जीभ चावली जाणार नाही. फिट चालू असताना नाकापुढे कांदा, चप्पल लावावी, फिटच्या रूग्णांना शाळेत अथवा खेळण्यास पाठवू नये. एकदा फिट आली की वारंवार आयुष्यभर येतात. त्याला औषध नाही. तांत्रिक, पारंपारीक पद्धतीनेच उपाय होतो. फिटस्‌चा रूग्ण काम आणि लग्न करू शकत नाही. फिट्स अथवा एपिलेप्सीचे दौरे येत असल्यास योग्यवेळी डॉक्टरांकडे जाऊन औषधोपचारांमुळेही यावर तोडगा निघू शकतो, असे बालरोग तज्ञ संघटना अध्यक्ष डॉ. आण्णासाहेब लोखंडे म्हणाले.



### वीरशैव व्हिजन उत्सव अध्यक्षपदी शिवानंद सावळगी; सचिवपदी राहुल बिराजदार

**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**


जगद्ज्योती महात्मा बसवेश्वरांच्या जयंतीनिमित्त वीरशैव व्हिजनच्या उत्सव समिती अध्यक्षपदी शिवानंद सावळगी तर सचिवपदी राहुल बिराजदार यांची निवड करण्यात आली. वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यात नुतन पदाधिकाऱ्यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी अविनाश हत्तरकी, अमित कलशेट्टी, सहसचिव बसवराज जमखंडी, कोषाध्यक्ष श्रीमंत मेरू, सहकोषाध्यक्ष गंगाधर झुरळे, कार्याध्यक्ष मनोज पाटील, सोमनाथ चौधरी, व्याख्यानमाला प्रमुख प्रा. मलकप्पा बणजगोळे, प्रा. महेश कोटीवाले, प्रसिद्धीप्रमुख गौरीशंकर अतनुरे, सिद्धेश्वर कोरे, स्पर्धा प्रमुख प्रा. शिव कलशेट्टी, मेहुल भुरे, सांस्कृतिक प्रमुख संतोष अंकद, बसवराज चाकाई, सोशल मीडिया प्रमुख चेतन लिगाडे, अमोल कोटगोंडे, पूजा प्रमुख मेघराज स्वामी, संतोष स्वामी, कार्यक्रम प्रमुख गणेश घाळे, केतन अंबुलगे, प्रवक्ता विनायक दुदगी, सल्लागारपदी आनंद दुलंगे, संजय साखरे, सोमेश्वर याबाजी, नागेश बडदाळ, राहुल शेटे, राजेश नीला, विजयकुमार बिराजदार, नागेश गदगे, संगमेश कंठी, दिपक बडदाळ, महेश विभुते, बापू जाधव यांची निवड करण्यात आली. प्रास्ताविक राजशेखर बुरकुले यांनी केले. सूत्रसंचालन सोमेश्वर याबाजी यांनी तर आभार राहुल बिराजदार यांनी केले.



### दुचाकीस्वाराच्या मृत्यूप्रकरणी पिकअप चालकाविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

दुचाकीस्वाराच्या मृत्यूप्रकरणी पिकअप चालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सुधाकर उमेश पोतदार (वय २७, रा. कुरनूर, ता. अक्कलकोट) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. याबाबत उमेश रामचंद्र पोतदार (वय ५८, रा. कुरनूर) यांच्या फिर्यादीवरुन पिकअप क्र. एमएच १३ एएक्स ८६६४ च्या चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ एप्रिल रोजी सायंकाळी विजापूर ते सोलापूर रस्त्यावरील केगाव ब्रिज येथे एमएच १३ एएक्स ८६६४ च्या चालकाने वाहन निष्काळजीपणे व भरधाव चालवून एमएच १३ डीव्ही ७१८३ क्रमांकाच्या दुचाकीला जोरदार धडक दिली होती.



### जखमी अवस्थेतील तरूणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

क्रांती चौक ते स्वामी समर्थ विडी घरकुल रस्त्यावर जखमी अवस्थेत मिळून आलेल्या तरूणाचा मृत्यू झाला. हर्षल बाळकृष्ण बोड्डा(वय ३२, रा. स्वामी समर्थ विडी घरकुल, कुंभारी) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. २८ एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास क्रांती चौक ते स्वामी समर्थ विडी घरकुल जाणाऱ्या रस्त्यावरील श्री साई मोबाईल शॉपीच्या समोरील रोडवर हर्षल हा जखमी अवस्थेत बेशुध्द पडलेला मिळून आला होता. त्यामुळे त्यास पोलिस उपनिरीक्षक शेख यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. त्यावेळी डॉ. श्रीकृष्ण बागल यांनी त्यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# मार्कंडेय रुग्णालयात जागतिक दर्जाचे उपचार मिळतील

**डॉ. शैलेश पुणतांबेकर यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

गुरूकूल परंपरा जपल्यास आपल्या देशातील डॉक्टर इतरांच्या पुढे जातील असे सांगतानाच शहरातील श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयाच्या नवीन इमारतीत, मेट्रोसिटीत मिळणाऱ्या जागतिक दर्जाचे उपचार देखील भविष्यात उपलब्ध होतील. मार्कंडेय रुग्णालयाच्या नवीन विस्तारित इमारतीची उभारणी अभिमानास्पद आहे असे गौरवोद्गार रविवारी पुण्याचे प्रसिध्द लॅप्रोस्कोपिक-रोबोटिक सर्जन डॉ. शैलेश पुणतांबेकर यांनी मार्कंडेय रुग्णालयाच्या नूतन इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी काढले.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैशंपायन मेडीकल कॉलेजचे माजी अधिष्ठाता डॉ. विश्वनाथ येमूल होते. यावेळी माजी खासदार व रुग्णालयाचे संस्थापक अध्यक्ष गंगाधरपंत कुचन, रुग्णालयाचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली, चेअरमन डॉ. विजयकुमार अरकाल, व्हाईस चेअरमन श्रीनिवास कमटम, संचालक आनंद चंदनशिवे, डॉ.माणिक गुर्रम, पदमशाली समाजाचे अध्यक्ष सुरेश फलमारी यांची प्रमुख उपस्थिती होती.



डॉ.शैलेश पुणतांबेकर पुढे म्हणाले, रुग्णालयाच्या इमारत उभारणी अनेक अडचणींवर मात करत ही नवीन वास्तू बांधण्यात आली आहे. श्री मार्कंडेय रुग्णालयात जागतिक दर्जाची रुग्णसेवा लवकरच सुरू होईल असा आशावाद यावेळी त्यांनी व्यक्त केला.

पुणतांबेकर पुढे म्हणाले की, कुठलेही हॉस्पिटल हे चांगल्या इमारतीवर चालत नाही तर ते उत्तम डॉक्टरांवर चालते. तेव्हा उत्तम डॉक्टरांची हॉस्पिटलसाठी गरज आहे. मार्कंडेय सोलापूर रुग्णालयाची इमारत उत्तम असून येथे नामांकित डॉक्टरही आहेत. याच्या जोरावर हे हॉस्पिटल भावी काळात जागतिक स्तराचे बनावे. मार्कंडेय रुग्णालयातील डॉक्टरांनी गरीब रुग्णांना चांगली सेवा देऊन रुग्णालयाचा व आपला लौकिक वाढवावा, अशी अपेक्षा डॉ. पुणतांबेकर यांनी व्यक्त केली.

**रुग्णालयाची प्रगती नक्कीच होणार**

अध्यक्षीय भाषणात डॉ. विश्वनाथ येमूल म्हणाले, चांगले प्रशासन असल्यास तसेच मनापासून काम केल्यास रुग्णालयाची सेवा सुरळीतपणे चालू शकते. मार्कंडेय रुग्णालय मोठ्या कष्टाने उभे केले, तेव्हा या रुग्णालयाची प्रगती नक्कीच होणार असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**वैद्यकीय योजनांचा लाभ गरिबांना मिळवून देण्याचा प्रयत्न**

रुग्णालयाचे अध्यक्ष सत्यनारायण बोल्ली म्हणाले, या रुग्णालयाच्या उभारणीत गंगाधरपंत कुचन, रामकृष्णपंत बेत, ईरय्या बोल्ली, सि.म. आडम, मल्लय्या पुल्ली, सिद्रामप्पा चिप्पा, डॉ. वळसंगकर आदींचा मोठा वाटा आहे. या रुग्णालयाला वीजेचा एक्सप्रेस फीडर, नर्सिंग कॉलेज मिळवून देण्याचे काम माझ्या पुढाकारातून झाले. सर्व घटकांच्या उत्तम सहकार्यामुळे रुग्णालयाचा गाडा व्यवस्थित सुरू आहे. भावी काळात शासनाच्या वैद्यकीय योजनांचा लाभ गरिबांना मिळवून देण्याचा प्रयत्न राहणार आहे.

रुग्णालयाचे संचालक आनंद चंदनशिवे यांनी मार्कंडेय रुग्णालयाच्या वाटचालीत सत्यनारायण बोल्ली यांचा महत्वाचा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी कार्यक्रमास संचालक डॉ. माणिक गुर्रम, डॉ. सुदीप संभारम, अशोक आडम, लक्ष्मीनारायण कुचन, मनोहर अन्नलदास, पार्वतय्या श्रीराम, राजेशम येमूल, रमेश विडप, माधवी चिट्याल, सुधाकर गुंडेली, आनंद चंदनशिवे, श्रीधर बोल्ली, डॉ.भारत मुळे, डॉ. संपत बलदवा, डॉ. लता पाटील, लक्ष्मीनारायण कुचन, पार्वतय्या श्रीराम, प्रशासकीय अधिकारी स्वामी आकेन, यांच्या सह रुग्णालयाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

प्रास्ताविक मार्कंडेय रुग्णालयाचे चेअरमन डॉ.विजयकुमार अरकाल यांनी केले.सूत्रसंचालन डॉ. लता मिठ्ठाकोल-पाटील यांनी केले. आभार व्हाईस चेअरमन श्रीनिवास कमटम यांनी मानले.

## महाविद्यालयीन तरूणीची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

महाविद्यालयात शिकणाऱ्या जळगावच्या तरूणीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.




दर्शना प्रविण पाटील (वय २१, रा. ओम साई रेसिडेन्सी, जळगाव सध्या, रा. राज पॅलेस, सोलापूर) असे तिचे नाव आहे. दर्शना ही वालचंद अभियांत्रिकीमहाविद्यालयातशिकत होती. तिच्यासोबत राहणाऱ्या दोन मुली शुक्रवारी दुपारी गावी गेल्या होत्या. त्यानंतर रात्री दर्शनाच्या एका मैत्रिणीने तिला कॉल केला असता तिने कॉल न घेतल्याने ती मैत्रिण रात्री दर्शनाच्या रुमवर गेली होती. त्यावेळी रूमचा दरवाजा न उघडल्याने तिने शेजाऱ्यांना सांगितले. त्यांनी पोलिसांना कळविले. रात्री दहाच्या सुमारास हवालदार घुगे यांनी दरवाजा तोडून रुममध्ये प्रवेश केला असता दर्शना हिने स्वयंपाक खोलीतील छताच्या पंख्याला गळफास घेतल्याचे आढळून आले. तिला शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तिचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. सिव्हील पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

## केबल पाईपच्या साठ्याला लागलेली आग अर्ध्या तासात विझविली

**मरिआई चौकातील कचरा संकलन केंद्राजवळील घटना**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

मरिआई चौकातील महापालिकेच्या कचरा संकलन केंद्राजवळ उघड्यावर ठेवलेल्या केबल पाईपच्या साठ्याला रविवारी आग लागली. ही आग केवळ अर्ध्या तासात विझविण्यात महापालिका अग्निशमन दलाला यश आले.

आज दिवसभरात उन्हाचा जोरदार कडाका होता. विशेष म्हणजे आज ४३.७ अंश सेल्सिअस इतके तापमान होते. दरम्यान, आज रविवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास ही आग लागली. या आगीमुळे धुराचे लोट आकाशात उडाले होते. दुपारी दोन वाजता अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. दलाच्या जवानांनी फोमचा मारा करून केवळ अर्ध्या तासात आग आटोक्यात आणली. दरम्यान हा पाईपचा साठा कोणाचा होता हे मात्र समजू शकले नाही. याबाबत अग्मिशमन दलदेखील अनभिज्ञ आहे. दरम्यान, अग्निशमन दलाचे प्रमुख केदार आवटे यांनी सांगितले की, केबल पाईपचा साठा नक्की कोणाचा आहे, याविषयी आम्हाला माहिती नाही. आग लागूनदेखील यासंदर्भात कोणी हा माल आमचा आहे हे सांगण्यासाठी आमच्याशी संपर्क केला नाही. एकंदर हा माल नक्की कोणाचा आहे, आगीत किती नुकसान झाले हे समजू शकले नाही.

## राज्यासाठी शाईच्या २ लाख १५ हजार ८५० बाटल्या

**निवडणूक आयोगाची तिसऱ्या टप्प्यासाठी तयारी पूर्ण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

राज्यभरात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. या लोकसभा निवडणुकीकरिता मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर शाई लावण्यासाठी महाराष्ट्रात सुमारे २ लाख १५ हजार ८५० शाईच्या बाटल्या लागणार आहेत. या शाईचे वाटप जिल्हानिहाय करण्यात आले आहे. दरम्यान, आता निवडणूक आयोगाची तिसऱ्या टप्प्याची मतदान प्रक्रिया पूर्ण झाली असल्याचे सांगण्यात येते. राज्यातील ४८ लोकसभा मतदार संघांमध्ये ९८ हजार ११४ मतदान केंद्र आहेत.

**म्हैसूर पेंटस् कंपनीत उत्पादन**

लोकसभा निवडणुकांकरिता राज्यातील ४८ मतदारसंघांमध्ये ९ कोटी २४ लाख ९१ हजार ८०६ मतदार मतदानाचा हक्क बजावतील. ससया मतदारांच्या डाव्या तर्जनीवर शाई लावण्याकरिता निवडणूक आयोगामार्फत सुमारे २ लाख १५ हजार ८५० शाईच्या बाटल्याची मागणी नोंदविण्यात आली आहे. या सर्व बाटल्या राज्याला मिळाल्या असून सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत. मतदारांच्या तर्जनीवर लावण्यात येणारी आणि काही दिवस पुसली न जाणारी ही शाई म्हैसूर पेंटस् कंपनीमार्फत बनवली जाते.




प्रत्येक मतदार केंद्रासाठी प्रत्येकी २ शाईच्या बाटल्या याप्रमाणे १ लाख ९६ हजार २२८ शाईच्या बाटल्यांची संख्या होते. याशिवाय १ लाख ६९ हजार २२८ शाईच्या बाटल्यांबरोबरच १० % टक्के अधिक अशा एकूण २ लाख १५ हजार ८५० शाईच्या बाटल्या पोहोच करण्यात येत आहेत.

## शेटफळच्या सिद्धेश्वर यात्रेत पोलिसाला धक्काबुक्की

**तिघांवर गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

शेटफळ (ता. मोहोळ) येथील सिध्देश्वर देवाच्या यात्रे पोलिस कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की करून सरकारी कामात अडथळा आणणाऱ्या तिघांवर मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिस नाईक विठ्ठल पठाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन रमेश दशरथ जाधव (वय २४, रा. शेटफळ), सिध्दांत राजू देवकाते (वय २४, रा. मोडलिंब) आणि नेताजी मारूती माळी (वय ३४, रा. बावी) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ एप्रिल रोजी सिध्देश्वर देवाच्या यात्रेत मध्यरात्रीच्या सुमारास छबिना फिरून मंदीराजवळ आला असता बंदोबस्तासाठी असलेले पोलिस नाईक पठाडे यांनी ट्रॅक्टरच्या पाठीमागे असलेल्या जाधव व इतरांना बाजूला सरका असे म्हणाल्यानंतर तिघांनी पोलिस नाईक पठाडे यांना धक्काबुक्की करून सरकारी कामात अडथळा आणला. म्हणून मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक भागवत पुढील तपास करीत आहेत.

## भक्ती मार्गाने जीवन समृद्ध करावे : हभप वैष्णवी पुजारी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २८ एप्रिल-**

जन्म-मरणाच्या फेऱ्यातून जीवन मुक्त करून आहे तो जन्म सार्थकी लावण्याकरिता भक्ती मार्ग अमूल्य आहे. याकरिता सर्वांनी भक्ती मार्गातच आपले जीवन सार्थकी लावून मानवी जन्म अनमोल करावे, असे निरूपण युवा कीर्तनकार हभप वैष्णवी पुजारी यांनी केले.



श्री वटवृक्ष स्वामी समर्थ महाराज देवस्थानतर्फे आयोजित श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी महोत्सवाच्या धर्मसंकीर्तन महोत्सवातील तिसरे पुष्प कीर्तन सेवेतून गुंफतना त्या बोलत होत्या. वैष्णवी पुजारी यांनी जगद्‌गुरु तुकाराम महाराजांचे मोलाचे आयुष्य 'वेचूनिया जाय' या अभंगातून कीर्तन सेवेचे निरूपण केले. या कीर्तन सेवेत त्यांना तबल्यावर नितीन दिवाकर तर हार्मोनियमवर कौस्तुभ यांनी साथसंगत केली. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्ज्वलाताई सरदेशमुख, प्रसाद सोनार, श्रीशैल गवंडी, प्रथमेश इंगळे, ओंकार पाठक, मोहन जाधव, स्वामीनाथ लोणारी, रवीराव महिंद्रकर, ज्ञानेश्वर भोसले, मनोहर देगावकर, शिवशरण अचलेर, दीपक जरीपटके, केशव नकाते यांच्यासह भाविक, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी मतदारराजा सज्ज

**भाजपा प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांचा विश्वास**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

गेल्या १० वर्षात भाजपा सरकारने केंद्र आणि राज्यातील विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना देशातील तळागाळातील लोकांपर्यंत नेवून सर्वच स्तरातील सर्वसामान्य घटकांचा आर्थिक आलेख उंचावल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आपल्या राज्यातील तमाम जनता तिसऱ्यांदा पंतप्रधान करणार असल्याचा आत्मविश्वास भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील महायुती उमेदवारांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आता निवडणूक रिंगणार उतरले असून, दि. २९ व ३० एप्रिल रोजी त्यांच्या ६ जाहीर सभांचे आयोजन केल्याने अवघा महाराष्ट्र ढवळून निघेल, असाही विश्वास प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी दै. तरुण भारतशी बोलताना व्यक्त केला. राज्यातील महायुती उमेदवार आणि भाजपा कार्यकर्ते-पदाधिकारी केंद्र आणि राज्य सरकारने केलेल्या विविध विकासकामांची माहिती तमाम जनतेला देत असून, ते विकासकामांनाच मत मागत आहेत. आता पंतप्रधान मोदी यांच्या उद्या आणि परवा म्हणजेच सोमवारी आणि मंगळवारी ६ जाहीर सभा होणार आहेत. महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी मोदी हे सोमवारी सोलापूर, कराड आणि पुणे येथे तर मंगळवारी माळशिरस, धाराशिव आणि लातूर येथे जंगी प्रचारसभा घेणार आहेत.



बावनकुळे सोलापूर मतदारसंघाबाबत पुढे म्हणाले की, पंतप्रधान मोदींच्या सोलापूर लोकसभा मतदारसंघातील भाजपा-महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारासाठी सोमवारी दुपारी दीड वाजता होम मैदान येथे जाहीर सभा, कराड येथे उदयनराजे भोसले यांच्या प्रचारार्थ सभा दुपारी ३:४५ वाजता, संध्याकाळी ५:४५ वाजता पुणे (हडपसर) येथे रेसकोर्स मैदानावर सभा होणार आहे. ही सभा पुण्याचे महायुती उमेदवार मुरलीधर मोहोळ, मावळचे श्रीरंग बारणे, बारामतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार आणि शिरुरचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ होणार आहे. मंगळवारी ३० एप्रिल दुपारी ११:४५ ला माढामधील महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारासाठी माळशिरस येथे दुपारी दीड वाजता तर धाराशिव येथे महायुतीच्या उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या अर्चनाताई पाटील यांच्यासाठी तर दुपारी ३ वाजता, लातूर येथे भाजपाचे सुधाकर श्रृंगारे यांच्यासाठी सभा होणार आहेत. आ. सचिन कल्याणशेट्टी, नरेंद्र काळे, कराड-धैर्यशील कदम, विक्रम पावसकर, पुणे-राजेश पांडे, जयंत येरवडेकर, धीरज घाटे, माळशिरस-आमदार जयकुमार गोरे, प्रशांत परिचारक, धाराशिव-आमदार राणाजगजितसिंह पाटील, आमदार अभिमन्यू पवार, लातूर-आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार रमेश कराड, अरविंद निलंगेकर अशी माहितीही बावनकुळे यांनी दिली आहे. दरम्यान, या सभा झाल्यानंतर भारतीय जनता पार्टीचा अजेंडा लोकांना कळणार आहे. 'फिर एक बार मोदी सरकार' आले तर पुढील ५ वर्षात आपल्या देशाचा मोठा विकासात्मक कायापालट होणार असल्याचे संकेतही त्यांनी दिले.

**भाजपाकडून प्रत्येक बुथवर मायक्रोप्लॅनिंग**

सोलापूर लोकसभा महाविकास आघाडीच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ काँग्रेस नेते राहूल गांधी यांची जाहीर सभा झाली आणि त्यांनी काँग्रेसचा विकासकामांचा अजेंडा सांगून जनतेचा विश्वास मिळविला होता. यामुळे भाजपानेही सावध पवित्रा घेत थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा सोलापुरातील महायुती उमेदवार आ. राम सातपुते यांच्यासाठी लावली. इतकेच नाहीतर लगेच दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवारी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ योगी यांचीही जाहीर सभा लावली आहे. हे दोन्ही नेते राज्यातील जनतेला भाजपाच्या विकासकामांचा अजेंडा सांगणार आहेत. याचा फायदा भाजपा उमेदवाराला कितपत होईल, हे येणारा काळच सांगणार आहे. दरम्यान, सध्यातरी प्रत्येक बुथवर भाजपाकडून मायक्रोप्लॅनिंग सुरू असल्याचे दिसून येत आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● निवासी संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor (The Editors are responsible as per PRB Act). Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue.

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## दहा लाखांसाठी विवाहितेचा छळ; पतीसह आठ जणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

दहा लाख रुपयांसाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह आठजणांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबबात अंजली विनायक वारद (वय २३, रा. जोडभावी पेठ, गोल चावडीजवळ, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती विनायक वारद, सासू जयश्री वारद, नणंद स्मिता मिरगे, नंदावा अनिल मिरगे, नणंद गिता दसपु, नंदवावा



सचिन दसफुले, नणंद शुभांगी कोठावळे, नंदावा प्रशांत कोठावळे (रा. नाशिक) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंजली व विनायक यांचा विवाह फेब्रुवारी २०२१ मध्ये झाला आहे. लग्नानंतर अंजली या सासरी नांदत असताना पती विनायक व त्याच्या घरातील लोकांनी छोट्या-मोठ्या घरगुती कारणावरून तसेच प्लॉट नावावर करून दे व माहेरून १० लाख रुपये घेऊन ये म्हणून अंजलीचा शारीरीक व मानसिक छळ केला. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक शेख पुढील तपास करीत आहेत.

## ▶▶ क्राईम वृत्त...




### मालट्रकखाली सापडून पादचारी महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

मालट्रकखाली सापडून पादचारी महिलेचा मृत्यू झाला. यादम्मा मल्लेशन तवटम (वय ६०, रा. जुना विडी घरकुल, सोलापूर) असे मरण पावलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत सतीश मल्लेशम तवटम (वय ४२, रा. सुनिल नगर, तिरूमला चौक, एमआयडीसी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मालट्रकचालक अमिर मेहबूब कुरेशी (रा. भेसवाही, कान्हरगाव, ता. नैनपूर, जि. मांडला, मध्य प्रदेश) याच्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ एप्रिल रोजी सायंकाळी सातच्या सुमारास यादम्मा तवटम व पद्मा झुंजेरे या दोघी पायी सागर चौक मार्गे हैद्राबाद रोडवरील समर्थ मेडीकल येथे औषध गौळ्या आणण्यासाठी जात होत्या. त्यावेळी चंदन काट्यासमोर अमिर कुरेशी याने त्याच्या ताब्यातील एमपी २२ झेडबी ४७८६ क्रमांकाचा मालट्रक निष्काळजीपणे चालवून पायी जाणाऱ्या यादम्मा यांना जोरदार धडक दिली. यामध्ये यादम्मा यांच्या डोक्यावरून ट्रकचे चाक गेल्याने त्यांचा मृत्यू झाला. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक कुकडे पुढील तपास करीत आहेत.

# सोलापूरवर सूर्यनारायणाचा प्रकोप; यंदा सर्वाधिक ४३.७ अंशसेल्सिअस तापमान

**राज्यात उष्माघाताची रुग्णसंख्या वाढू लागली**

**अवकाळी पावसाचाही व्यक्त होतोय अंदाज**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

मुंबईसह राज्याला उष्णतेच्या लाटेचा तडाखा बसत असून सोलापूरचे तापमान शनिवारी ४२ आणि रविवारी ४३.७ अंशावर गेले आहे.

राज्यातील बहुतांश ठिकाणचे तापमान ४० अंशाच्या घरातच होते. यातील काही जिल्हे ४२ अंशाच्या घरातच असल्याने राज्यातील उष्माघाताची रूग्णसंख्या २००च्या घरात गेली आहे. दरम्यान, रविवारीही कोकणासह अवघ्या राज्यात उष्णतेच्या लाटेचा प्रभाव कायम असल्याने हे तापमान ३८ ते ४४ अंशाच्या घरातच होते. यामुळे दिवसभर उष्ण वातावरणामुळे अंगाची लाही-लाही होत होती.

राज्यात आतापर्यंत १८४ उष्माघाताच्या रुग्णांची नोंद झाली असून, त्यापैकी १४३ रुग्ण गेल्या २२ दिवसांमध्ये वाढले आहेत. पुण्यातही उष्माघाताच्या रुग्णांची संख्या ६ वर गेली आहे. याआधी १ मार्च ते ४ एप्रिल दरम्यान राज्यात उष्माघाताच्या रुग्णांची संख्या ४१ होती. तेव्हापासून आतापर्यंत म्हणजे २७ एप्रिल पर्यंत ही रुग्णसंख्या २००पर्यंत गेली आहे. यापैकी सर्वाधिक २० रुग्ण धुळे जिल्ह्यात आढळले आहेत. त्या खालोखाल ठाणे (१९), नाशिक (१७), वर्धा (१६), बुलढाणा (१५) तर सातारा येथे १४ रुग्णांची नोंद झाली आहे. इतर जिल्ह्यांमध्ये ही संख्या १३च्या खालोखाल आहे. वाढत्या उन्हामुळे आरोग्यविषयक अनेक तक्रारीमध्ये वाढ झाली आहे. प्रामुख्याने डोके दुखी, त्वचा कोरडी पडणे, लघवी कमी प्रमाणात येणे, पिवळी लघवी येणे, शरीरावर लाल चट्टे उठणे, हात, पाय आणि टाचांना सूज येणे, स्नायू दुखणे, चक्कर येणे, डोळ्यांची आग होणे या प्रकारचा त्रास अनेकांना होत आहेत.

याप्रकारची लक्षणे तीव्र स्वरुपात जाणविल्यास वैद्यकीय सल्लूयाने उपचार घ्यावा व उन्हापासून बचाव करावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे. रविवारी कोकणातही उष्णतेच्या लाटेचा प्रभाव कायम राहणार असून, तापमान ३८ ते ४४ अंशाच्या घरात राहील. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातील काही जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पाऊस होईल, अशी माहिती हवामान खात्याकडून देण्यात आली आहे. आजही राज्यातील इतर जिल्ह्यातही ४० अंशाच्या पुढेच पारा होता.



### असे आहे औषध किट

मतदान केंद्रांवर नियुक्त असलेल्या आरोग्य पथकाला जि.प.च्या आरोग्य विभागामार्फत औषधाचे किट पुरवले जाईल. यात ओ.आर.एस. ड्रेसिंग साहित्यासह प्राथमिक उपचाराचे साहित्य व औषधे असणार आहेत. उष्म्याचा त्रास जाणवला, तर मतदारांना तातडीच्या उपचारासह प्रथमोपचार सेवा मिळणार आहे.

### मतदान केंद्रांवर आरोग्य पथके

लोकसभेचे तिसऱ्या टप्प्यातील म्हणजेच ७ मे रोजी कडक उन्हात लोकसभा निवडणुकीचे मतदान होत आहे. वाढत्या उष्म्याचा धसका निवडणूक आयोगाने घेतला आहे. यामुळे खबरदारी म्हणून मतदारांची काळजी घेण्यासाठी सातारा व माढा लोकसभा मतदारसंघांतील मतदान केंद्रांवर आरोग्य पथके तैनात करण्यात आली आहेत. तसेच पुरेशा औषधाचे किटही केंद्रांवर ठेवण्यात येणार असून, त्याची जबाबदारी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांवर देण्यात आली आहे. सर्व मतदान केंद्रांकर एक आशा व पाच मतदान केंद्रापाठीमागे एक आरोग्य कर्मचारी व समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना पुरेशा औषध किटसह मतदाना दिवशी मतदान प्रक्रिया सुरू झाल्यापासून मतदान पूर्ण होईपर्यंत उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### कडक उन्हातही बळीराजा लागला पेरणीपूर्व तयारीला

शहर-जिल्ह्यात उन्हाचा तडाखा असतानाही असे कडक ऊन अंगावर घेवून बळीराजा शेतात खरिपाच्या पेरणीपूर्व तयारीला लागला आहे. सध्या बळीराजा शेतात काळी माती टाकणे, खते टाकणे, नांगरणी, कुळवणी, पणजी मारणे आदी कामात गुंग असल्याचे दिसत आहे. बैल बारदाना आता बहुतांश शेतकऱ्यांकडे नसल्याने ट्रॅक्टरने ही कामे चालू असल्याचे चित्र दिसत आहे.

## डायल ११२ वर पोलिसांना खोटी माहिती देणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

डायल ११२ वर पोलीसांना खोटी माहिती देऊन दिशाभुल करणा-या व्यक्ती विरूध्द सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना एकाच वेळी पोलीसांकडुन सर्व प्रकारची मदत मिळावी या उद्देशाने डायल ११२ ही योजना सुरू करण्यात आली आहे. २७ एप्रिल २०२४ रोजी सोलापूर तालुका पोलीस ठाणेकडील नेमणुकीस असलेले पोलिस हवालदार गणेश लोखंडे यांना डायल ११२चे कर्तव्य देण्यात आले होते. त्यावेळी त्यांना त्याचे एम.डी.टी चॅनल नंबर १वर १२.०२ वा. सुमारास मोबाईल नंबर ७२१८२६१०२६ वरून अज्ञात व्यक्तीने बोरामणी (ता.द.सोलापूर) येथील व्हॉलीबॉल मैदानाच्या ठिकाणी एका १८ वर्षीय मुलीला तिच्या नव-याने अर्ध्या तासापुर्वी मारहाण करून कु-हाडीने जीवे मारले आहे, अशी माहिती दिली होती. त्याप्रमाणे हवालदार लोखंडे यांनी प्राप्त माहिती नुसार मोबाईल नंबर ७२१८२६१०२६ वर संपर्क साधला परंतु सदर मोबाईलधारकाने तो स्वीकारला नाही म्हणुन त्यांनी दिलेल्या माहितीची खातरजमा करणे करीता बोरामणी येथे बोरामणी गावचे पोलीस पाटील व पोलीस ठाणे कडील तांबे पोलीस अंमलदार याचेसह जाऊन माहिती घेतली असता तेथे असा कोणताही प्रकार घडला नसल्याचे समजुन आले. यावरून डायल ११२ वर मोबाईल नंबर ७२१८२६१०२६ यांनी पोलीसांना खोटी माहिती पुरविली म्हणुन त्याचे विरूध्द गणेश मारूती लोखंडे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादी वरून भारतीय दंड संहिता कलम १८२ प्रमाणे सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे. डायल ११२ हे नागरिकांच्या मदतीकरीता असून त्यावर कोणत्याही नागरिकांनी चुकीची अथवा खोटी माहिती पोलीसांना पुरविल्याचे निष्पन्न झालेस त्या संबंधीत नागरिकाविरूध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत देवळेकर यांनी सांगितले आहे.







वाहन पार्किंग व्यवस्था : जुनी मिल कंपाऊंड मैदान, एक्जीबिशन ग्राऊंड मरीआई चौक, पुंजाल मैदान, नू. म. वि. प्रशाला पाठीमागील मुलांचे शासकीय वसतीगृह मैदान, स्काऊट गाईड मैदान - संगमेश्वर महाविद्यालयाजवळ,
दुचाकी पार्किंग - नॉर्थकोर्ट मैदान आणि हुतात्मा स्मृती मंदिर

प्रकाशक - नरेंद्र गोविंद काळे

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### सहयोग ब्राम्हण मंडळातर्फे उपनयन संस्कार

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**
सहयोग ब्राम्हण सेवा मंडळ जुळे सोलापूर व कौस्तुभ ब्राम्हण वधू-वर सूचक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वामध्ये भारतीय संस्कृती सर्वोच असून हि संस्कृती टिकवण्यासाठी अधूनिक युगांत वेदाचे अध्ययन आणि अध्यापन करणे अत्यंत आवश्यक असून ब्राम्हण समाजातील १० गरीब व होतकरू बालकांसाठी मोफत उपनयन संस्कार करण्यात आले. सर्वेष कणबसकर, वेदान्त कुलकर्णी, ऋतुराज कुलकर्णी, श्रीपाद भट, रोहीत व रोहन पाटील, सर्वेष व तीर्थराज कुलकर्णी, तन्मय व तनिष मोशी या सर्व बटूनां आर्शीवाद देण्यासाठी उद्योजक बीपीनभाई पटेल, सुर्या इंटरनॅशनल हॉटेलचे दत्ता आणा सुरवसे, सुर्या उदयोग समुहाचे प्रभाताई सुरवसे, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगांवकर, सरकारी वकिल ॲड. प्रदिपसिंग रजपूत, ॲड.निलेश जोशी, रा. स्व. संघ सोलापूर माजी कार्यवाह संतोष कुलकर्णी, वृतवेधचे संपादक प्रशांत बडवे, ब्रम्हगर्जनेचे अध्यक्ष विक्रम ढोनसळे, जयतिर्थ पडगानुर, जयंत पुराणीक आदी मान्यवरांच्या उपस्थितीत मंगलमय वातारणात सर्वांना आशीर्वाद देण्यात आले. त्यांनी बटूंना शाल व भगवे उपरणे देवून सन्मानीत करण्यात आले. मान्यवरांचे स्वागत संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी व नियोजन प्रमुख रविंद्र नाशिककर यांचे हस्ते करण्यात आला. हा उपक्रम यशस्वी करण्यामध्ये सहयोग ब्राम्हण सेवा मंडळाचे जुळे सोलापूर व कौस्तुभ ब्राम्हण वधू-वर मंडळाचे पदाधिकारी अनिता कुलकर्णी, सुप्रिया जोशी, वासुदेव पाठक, प्रकाश दिवाणजी, उदय कुलकर्णी, विजयराव कुलकर्णी, सुशांत कुलकर्णी, मिलिंद पटवर्धन, सतिश पाटील, अजय कुलकर्णी, वैभव कुलकर्णी, शशीकांत कुलकर्णी, आरती अरगडे, संपदा जोशी यांचे सहकार्य लाभले.

### मनोज जरांगे पाटील आज सोलापुरात

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**
सोमवारचा दिवस हा सोलापूरकरांसाठी जाहीर सभांचा हॉटस्पॉट ठरणार आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा सोमवारी सोलापुरात होत असून, यामध्ये मराठ्यांचे नेते मनोज जरांगे पाटील सोलापुरात येणार



असल्याची माहिती सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आली आहे. सोमवारी सायंकाळी ५ वाजता मरीआई चौक येथे मनोज जरांगे पाटील यांचे आगमन होणार असून, मराठा समाजाच्या वतीने त्यांचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. स्वागत स्वीकारल्यानंतर मंगळवेढा सांगोला सांगली मार्गे बेळगाव येथे जाहीर सभेसाठी रवाना होणार असल्याची माहिती माऊली पवार, समन्वयक सकल मराठा समाज यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

### संनियंत्रण पथकाकडून निवडणूक खर्चाची केली तपासणी

**सोलापूर दि.२८ एप्रिल-**
भारत निवडणूक आयोग नवी दिल्ली यांनी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक, निवडणूक खर्च संनियंत्रण यांवरील अनुदेशांचा सारसंग्रह जानेवारी २०२४ अन्वये ४२, सोलापूर लोकसभा मतदार संघातील उमेदवारांची खर्चाच्या नोंदवह्या तपासणीच्या वेळापत्रकानुसार पहिली तपासणी खर्च निरिक्षक उमेश राठोड यांच्या उपस्थितीत दि. २६ एप्रिल रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृह, सातरस्ता येथे करण्यात आली. पहिल्या तपासणीवेळी ४२ सोलापूर लोकसभा मतदारसंघातील एकूण १८ उमेदवार उपस्थित होते. ३ उमेदवार अनुपस्थित होते. सदर निवडणूक खर्चासाठी ४२ सोलापूरमध्ये २० उमेदवारांनी बँक खाते उघडले आहे. खाते न उघडलेल्या उमेदवारांना तसेच अनुपस्थित उमेदवारांना खर्च निरिक्षक उमेश राठोड यांनी नोटीस बजावली असून, नियमाप्रमाणे अचूक खर्च नोंदविण्याच्या सूचना दिल्या आहेत. खर्च तपासणीच्या वेळी ४२ सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे खर्च निरिक्षक उमेश राठोड तसेच नोडल अधिकारी खर्च संनियंत्रण व सर्व सहाय्यक खर्च निरिक्षक तसेच खर्च संनियंत्रण पथकातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी खर्च समितीने अत्यंत काटेकर उमदवाराच्या खर्चाची तपासणी केली.



### आ.प्रणिती शिंदेच्या प्रचारार्थ प्रभाग क्रमांक तीनमध्ये सभा

**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**
प्रभाग क्रमांक तीनमध्ये माजी महापौर महेश कोठे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीच्या लोकसभेच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ सभेचे आयोजन करण्यात आले होते. श्रीकांत दासरी यांच्या पुढाकाराने नीलकंठेश्वर मंदिर जवळ भवानी पेठ शेजारी येथे कॉर्नर बैठक घेण्यात आली. यावेळी सुरेश बिद्री, संजीव होमकर, वासुदेव इप्पलपल्ली, शिवा ढोकळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी भारती इप्पलपल्ली, नरसिंग चन्ना, रवि गड्डम, प्रवीण बत्तुल आदी उपस्थित होते.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्याविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**
अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीतेने दिलेल्या फिर्यादीवरून बुडन रहिमबक्ष बागवान याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन महिन्यापूर्वी बुडन बागवान याने यातील अल्पवयीन पिडीतेला घरी कुणी नसताना बोलाविले व तिला चहा पिण्यास दिला. त्यानंतर बागवान याने अल्पवयीन पिडीतेवर अत्याचार करून तोंड दाबून तु जर ही गोष्ट कुणाला न सांगण्याबाबत धमकी दिली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक संजीवनी व्हट्टे पुढील तपास करीत आहेत.

# सोलापूरकरांचे कोणतेही काम तात्काळ मार्गी लावेन

### उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिला शब्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**
बारामती लोकसभा निवडणूक महायुतीच्या अधिकृत उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारार्थ आम्ही सोलापूरकर विचार मंच, पुणे आयोजित सोलापूरवासियांचा मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी पुण्यातील सोलापूरकरांचे कोणतेही काम तत्काळ मार्गी लावण्याचा शब्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूरकरांना दिला.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत महीला प्रदेश अध्यक्ष रूपालीताई चाकणकर, सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या उपस्थितीत पुणे शहर उपाध्यक्ष संजय पाटील, राष्ट्रवादी युवक पुणे शहर निरीक्षक समाधान काळे यांनी आयोजित केला होता.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या मेळाव्यात बारामती लोकसभा मतदारसंघात पुणे येथील खडकवासला विधानसभा क्षेत्रात हजारोंच्या संख्येने रहात असलेल्या सोलापूरकर बांधवांशी संवाद साधला. यावेळी सोलापूरवासियांच्या समस्या जाणून घेत येणाऱ्या काळात त्या ताकदीने सोडवण्यासाठी प्रयत्न करू, असा विश्वास अजित पवारांनी यावेळी दिला. विकासात्मक कामे आरोग्य विषयक अडचणी नोकरी संदर्भात किंवा सोलापूरकरांचे कोणतेही काम असूदेत ते तात्काळ मार्गी लावेन,



आठवड्यातून दोन दिवस मी पुण्यात असतो. तुम्ही मला थेट भेटू शकता किंवा सोलापूरचे स्थानिक नेत्या मार्फत देखील आलात तरी चालेल, असा शब्द दिला.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासात्मक नेतृत्वात अधिक गतीने राज्याचा सर्वांगीण विकास करण्याकरीता बारामती लोकसभा महायुतीचे अधिकृत उमेदवार सुनेत्रा पवार यांना मतदान करून निवडून द्यावे, नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी आपले बहुमूल्य मत द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. या मेळाव्याचे प्रास्ताविक समाधान काळे यांनी केले तर संजय पाटील यांनी या मेळाव्याचा उद्देश मांडला राज्याच्या महीला अध्यक्ष रुपाली चाकणकर, मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी आपले विचार मांडून महायुतीला मतदान करण्याचे आवाहन केले. या मेळाव्यास बाबा धुमाळ, विकास नाना दांगट, बाळासाहेब कापरे, शैलेश चारवाड, युवराज बेलदरे, संतोष फरांदे, दिलीस दादा नवले, राजेंद्र थोरवे, सुनील कलशेट्टी, किशोर वावरे, बाबा पाटील, यशराज पाटील यांनी विशेष सहकार्य केले.

याप्रसंगी यावेळी राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपालीताई चाकणकर, मुख्य प्रवक्ते उमेश पाटील, सोलापूर जिल्हा अध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, रमेश कोंडे, सुधाकर जाधवर, युवराज बेलदरे, संतोष करांडे आदी पदाधिकाऱ्यांसह पुणे येथील वास्तव्य करीत असलेले सोलापूरकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## गोकुळ दूध परिवारातर्फे यूपीएससी उत्तीर्ण राठोड हिचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**
खो-खो चे राष्ट्रीय खेळाडू स्वर्गीय किरण भैया पवार यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून यूपीएससीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवणारी स्वाती राठोड हिचा सत्कार गोकुळ दूध व परिवाराच्या वतीने करण्यात आला. शाल, श्रीफळ आणि काही मदत या विद्यार्थिनीला करण्यात आली.

या विद्यार्थिनी मिळवलेल्या यशाचे कौतुक गोकुळ परिवाराच्या वतीने आम्ही सर्व मित्रमंडळींनी तिच्या घरी जाऊन केले , तसेच या सत्कार समारंभा वेळी कोल्हापूर दूध संघाचे सहाय्यक महाव्यवस्थापक जगदीश पाटील व हनुमंत पाटील यांनी दूरध्वनी वरून सदर विद्यार्थिनीला शुभेच्छा दिल्या. समारंभाला सोलापूर गोकुळ दूध आणि दुग्धजन्यचे वितरक रवी मोहिते, रणजी क्रिकेटपटू उदय डोके, राष्ट्रीय बॉडी बिल्डिंग मध्ये अनेक स्पर्धा विजेते अशपाक भाई शेख, सोलापूर विद्यापीठातील अधिकारी सोमनाथ सोनकांबळे, माजी नगरसेवक नारायण माशाळकर, आमदार अडम मास्तर यांचे स्वीय सहाय्यक इलियास भाई सिद्दिकी, विजय प्रताप युवा मंचचे दिनेश जाधव, सत्तर शेख, रोहन दळवी जमीर इनामदार उपस्थित होता.

# महिलांच्या सन्मानासाठी आ. प्रणिती शिंदेंना खासदार करा

### काँग्रेसच्या विविध सेलच्या मुख्य संयोजिका प्रज्ञा वाघमारे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**
देशभरात महागाई, बेरोजगारी वाढली आहे. सामान्य जनतेचे जगणे मुश्किल झाले आहे. काँग्रेसने दिलेल्या पेन्शनवर बाप मुलांना जगवत आहे असे विदारक चित्र दिसून येत आहे अशी टीका करतानाच सोलापूर लोकसभा मतदारसंघात महिलांच्या सन्मानासाठी काँग्रेसच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांना खासदार करावे, असे आवाहन काँग्रेसच्या विविध विभाग सेलच्या मुख्य संयोजिका प्रज्ञा वाघमारे यांनी केले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने काँग्रेस पक्षातील विविध ४३ विभाग आणि सेलचे प्रमुख पदाधिकारी राज्यभरात विविध मतदारसंघात काँग्रेसच्या ध्येयधोरण आणि विकास कामांची माहिती देण्याचे अभियान राबवत आहेत. वविध विषयांवर आपली



भूमिका करताना त्या म्हणाल्या, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या आदेशानुसार काँग्रेसच्या विविध विभाग व सेलचे पदाधिकारी गेल्या २६ मार्चपासून हे अभियान प्रत्येक मतदारसंघात राबवीत आहेत. काँग्रेस उमेदवारांना निवडून आणण्यासाठी प्रत्येक सेल थेट लोकांपर्यंत घरोघरी जाऊन काँग्रेसचे गॅरंटी कार्ड लोकांना देत आहे. थेट प्रचार यंत्रणा राबविली जात आहे. या अभियानांतर्गत लोकांच्या मनात परिवर्तन होत असल्याचे दिसून येत आहे. काँग्रेस बाबत सकारात्मक मत लोकांमध्ये आहे. देशातील महागाई आणि बेरोजगारी याबाबत मतदारांमध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आहे. लोकांच्या मनातील भावना जाणून घेण्याचे प्रयत्नही सेलच्या माध्यमातून या अभियानाच्या माध्यमातून केले जात आहे.

ईडीसह विविध शासकीय यंत्रणेच्या दबावाने काँग्रेसचे नेत्यांना भाजपात घेऊन गेले. फक्त नेते भाजपात गेले असून जनता मात्र आजही काँग्रेस सोबतच आहे, असे विजयकुमार हत्तुरे यांनी स्पष्ट केले. या अभियानाच्या अंतर्गत सोलापूर लोकसभा मतदारसंघात कालपासून लोकांशी संपर्क साधण्यात येत आहे. काँग्रेसने आपल्या सत्तेच्या कार्यकाळात समाजातील विविध घटकांसाठी योजना राबविल्या. त्याचा लाभ सर्वांना दिला. आजही त्या योजनांची गरज असल्याचे लोक सांगतात, असे प्रदेश प्रवक्ते प्रा. काकासाहेब कुलकर्णी यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस छगन पाटील, योगेश मसलगे-पाटील, सुरेश यादव, डॉ. मनोज राका, डॉ. हेमंत सोनारे, भागेश देसाई, अप्पू शेख आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# आपत्कालीन पिक नियोजनाबाबत जनजागृती करावी

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद; खरीप हंगामपूर्व आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**
या वर्षीच्या खरीप हंगामात पावसाचे आगमन उशिरा झाल्यास जमिनींच्या खोलीनुसार पीक नियोजन, आंतरपीक पध्दतीचा वापर, पिकाची फेरपालट, आवर्षणात तग धरणारी पिके व वाणांचा वापर, पर्यायी पीक व एकात्मिक शेती पध्दतीचा वापर याविषयी नियोजन करावे. नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी तज्ञांचे मार्गदर्शन घेऊन आपत्कालीन पीक नियोजनाबाबत व्यापक प्रमाणात शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.



खरीप २०२४ हंगामपुर्व आढावा बैठक जिल्हा नियोजन भवन, सोलापूर येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहीनकर, कृषी विकास अधिकारी परमेश्वर वाघमोडे, कृषी उपसंचालक राजकुमार मोरे, उपसंचालक (कृषी व्यवसाय) मदन मुकणे, कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख श्री. तांबडे, कृषी विभागाचे जिल्ह्यातील उपविभागीय कृषी अधिकारी, सर्व तालुका कृषी अधिकारी, उपसंचालक पशुसंवर्धन, जिल्हा परिषदेचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक धनंजय पाटील, रेशिम अधिकारी, जिल्हास्तरीय बँकांचे प्रतिनिधी जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्रेते प्रतिनिधी, महाबीज प्रतिनिधी, कृषी औद्योगिक विकास महामंडळाचे प्रतिनिधी, कृषी विभागाशी निगडीत सर्व जिल्ह्यातील अधिकारी उपस्थित होते.

आगामी खरीप हंगाम लक्षात घेता जिल्ह्यात शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते व कृषी निविष्ठा खरीप हंगामात वेळेत व मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करावे. जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना चांगल्या गुणवत्तेचे बियाणे, खते वेळेमध्ये उपलब्ध होतील यांची कृषी विभागाने काळजी घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

स्वयंचलित हवामान केंद्रासाठी तालुकास्तरावर तहसिलदारांनी तात्काळ जागा उपलबध करुन देण्याचे नियोजन करावे. जिल्ह्यामध्ये खतांचा बफर स्टॉक वाढवावा. पीएम किसान योजनेअंतर्गत प्रलंबित ई-केवायसी व आधार सीडेड चे काम तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी दिले. जिल्ह्यातील चांगले काम करणाऱ्या शेतकरी उत्पादक कंपन्या, पॉलीहाउस यांना भेटी देणार असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीत कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनां व त्याबाबतची सदस्थिती याबाबतची माहिती जिल्हाधिकारी यांनी घेऊन आवश्यक सूचनाही दिल्या.

प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी खरीप हंगाम २०२४ साठी कृषी विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या नियोजनाची सविस्तर माहिती बैठकीत सादर केली. खरीप हंगामात जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खते, बियाणे वेळेत व आवश्यक तेवढा पुरवठा करण्याबाबत नियोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच जिल्ह्यात कोठेही बोगस खते, बियाणे कोणाकडूनही विक्री होऊ नये, यासाठी पथक तयार करण्यात आले असून त्याद्वारे धडक कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## करोडी ते तेलवाडी दरम्यान
# तब्बल ५२९४ ऐतिहासिक वृक्षांची कत्तल



### वैभवशाली इतिहास पुसला...पुढे काय?

**तभा वृत्तसेवा। सहयोग प्र.जावळे**
**कन्नड, दि.२८ एप्रिल-**
धुळे राष्ट्रीय महामार्ग उभारतांना करोडी ते तेलवाडी पर्यंत तब्बल ५२९४ मोठी वृक्ष तोडण्यात आली.

सोलापूर धुळे राष्ट्रीय महार्गाच्या चौपदरीकरणाचे कामास सुरुवात झाली आणि या महामार्गालगत असलेल्या वड,पिंपळ, लिंब,आदी मोठी वृक्ष चौपदरीकरणात अडथळा येत असल्याने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मोठी वृक्ष तोडण्याचा निर्णय घेवून तब्बल ५२९४ मोठ्या वृक्षांना तोडण्यात आले.याभागात पुन्हा वृक्ष लागवड करण्याची त्यात तरतूद होती.मात्र त्यानुसार पुढे वृक्ष लागवड झालेली आढळून आली नाही.

भारताच्या वैभवशाली इतिहासात सातवाहन राजघराण्याची सुवर्ण अक्षरात नोंद आहे.शालिवाहन शके म्हणजेच हिंदू कालगणनेनुसार गुढीपाडव्याचा दिवस हा मराठी नव वर्षाचा पहिला दिवस असतो. शालिवाहनराजाने शकांचा पराभव केला तेव्हापासून ही कालगणना सुरू केली असे म्हणतात.त्या शालिवाहन राज्याची राजधानी आजचे पैठण व त्याकाळी प्रतिष्ठान होते.या प्रतिष्ठान मधून त्या काळी पैठणी कापड,रेशीम,हस्तीदंताच्या वस्तू,मसाले,चंदन सह अनेक वस्तू युरोपात निर्यात होत असे.पैठण हून उत्तर भारत व तेथून युरोप असा मार्ग होता,सदर महामार्ग त्याकाळात कन्नडहून पितळखोरा पुढे खान्देश असा होता.कन्नड हे त्याकाळी कनकावातीनगर म्हणून ओळखले जायचे.या शहरात त्याकाळी हिऱ्यांना पैलू पडण्याचे काम करण्यात येत होते असे म्हणतात.येथील हिरेही याच महामार्गावरून युरोपात निर्यात होत होते. म्हणजे इसवी सन पूर्वी पासून हा महामार्ग अस्थित्वात आहे.अशा प्रकारे या महामार्गाला दैदिप्यमान व वैभवशाली इतिहास आहे.




**सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग झाला ओसाड**

पुढे इंग्रजांच्या काळात औट्रम नावाच्या इंग्रज अधिकाऱ्याने कन्नड - चाळीसगाव जोडणाऱ्या घाटाच्या रस्त्याचा शोध लावला. तेव्हापासून सदर घाट हा उत्तर व दक्षिण भारताला जोडणारा दुवा ठरला.इंग्रजांच्या काळापासूनच या रस्त्यावर हळूहळू रहदारी व रहदारी सोबत व्यापार वाढू लागला. घाटापासून पुढे कन्नड व त्याही पुढे काही भाग इंग्रजांच्या अधिपत्याखाली होता याच काळात इंग्रजांनी या भागात रस्त्याच्या दुतर्फा विविध वृक्ष लागवड केल्याची नोंद आहे.

इतिहास काळापासून अस्थित्वात असलेल्या व महाकाय आकार घेवून रस्त्याला शोभा देणाऱ्या या वृक्षांमुळे या परिसराचे वैभव वाढीस लागले होते. पुढे तात्कालीन आमदार स्व.रायभान जाधव यांनी पुढाकार घेवून कन्नड ते वेरूळ व त्यापुढे दुतर्फा रिकाम्या जागेत घन वृक्ष लागवड केली.त्यानंतर महाराष्ट्रातील सर्वाधिक धरणे व तळ्यांचा तालुका म्हणून कन्नड तालुक्याची ओळख या दुतर्फा वृक्षांमुळे सार्थ ठरली.या रस्त्यावरून जाताना एखाद्या वैभाशाली,नैसर्गिक संपदेने संपन्न,प्रगत भागाकडे जात असल्याचे प्रवाशांना त्याकाळी वाटत असे. खान्देशमधून घाट चढून वर आल्यावर थंडगार वाऱ्याची झुळूक अंगावर पडल्या पडल्या या वृक्षांची आठवण येत असे. संभाजीनगर हून सर्व दिशांना जातांना इतर सर्व मार्गापेक्षा सर्वात निसर्गसंपन्न,नयनरम्य प्रवास हा कन्नडच्या दिशेने होता.संभाजीनगर हून जालना,पैठण,वैजापूर किंवा सिल्लोड कडे जातांना रस्त्याच्या कडेला इतकी वृक्षांची गर्दी बघायला मिळत नव्हती.या वृक्षाच्या खाली वर्षभर विविध व्यावसायिक आपले व्यवसाय करायचे.दौलताबाद व खुलताबाद येथील प्रसिद्ध सीताफळ,अंजीर,हे याच वृक्षांखाली विक्रीतून जगभर प्रसिद्ध झाले.उन्हाळ्यात या वृक्षांखाली उसाच्या रसवंतीची चढाओढ रहायची.हजारो पशू व लाखो पक्षांचे हे निवासस्थान होते. राष्ट्रीय महामार्गाच्या उभारणीत या ऐतिहासिक वृक्षांना तोडण्यात आले व वृक्षांसोबत या भागाच्या दैदिप्यमान व वैभवशाली इतिहास पुसला गेला.पुढे या रस्त्याच्या मध्ये व दुतर्फा वृक्ष लागवडीचे नियोजन शासनाने व महामार्ग प्राधिकरणाने केले होते मात्र पुढे काय झाले ते बघुया पुढील भागात.

**क्रमशः**



### लकी चौकातून ४० हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**
शहरातील लकी चौकातील आपटे ज्वेलर्स या दुकानासमोरून चोरट्याने ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत शिरीष सुरेश शिंदे (वय २६, रा. कलावती नगर, एमआयडीसी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरीष शिंदे याने त्याची एमएच १३ डीपी ६६५७ क्रमांकाची दुचाकी ही लकी चौकातील आपटे ज्वेलर्स या दुकानासमोर लॉक करून ठेवली होती. २१ एप्रिल रोजी सायंकाळी चोरट्याने ती दुचाकी चोरून नेली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी- ७५८

**तो कामु सर्वथा जाये । जयाचे आत्मतोषीं मन राहे ।**
**तोचि स्थितप्रज्ञु होये । पुरुष जाणे ।।**

मनाची अस्थिरता हे दुःखाचे एक महत्वाचे कारण आहे. मानसिक स्थैर्यता ज्याच्याकडे आहे, तो दुःखाला मानत नाही. अर्जुन सुध्दा मानसिकदृष्टया अस्थिर झाला आहे. अस्थिर होण्यामुळे त्याला शत्रू असले तरीही समोरच्यांना मारण्याचे दुःख वाटू लागले आहे. त्याला दुःखातून बाहेर काढून युध्दास प्रवृत्त करण्यासाठी त्याला मानसिक स्थैर्याची गरज आहे, याची भगवंताला जाणीव आहे. म्हणून स्थितप्रज्ञ म्हणून कोणास व कसे ओळखावे? अर्जुनाच्या या प्रश्नाचे उत्तर भगवंत देत आहेत. ते म्हणतात, अंतकरणात मोठया प्रमाणात वाढलेली विषयासक्ती, आत्मसुखामध्ये विघ्न असते. या विघ्नामुळे अस्थिरता वाढते. जीवाचे ठायी ब्रम्हरुपाने सर्वकाळ संतुष्ठता असते. परंतु कामाच्या संगतीने जीवाचे विषयामध्ये पतन होते आणि जेव्हा हा काम संपूर्णपणे नाहीसा होतो, तेव्हा त्याचे मन आत्मानंदी स्थिर होते. जेव्हा मन आत्मानंदी स्थिर होते किंवा स्थिर राहते तेव्हा त्या पुरुषाला स्थितप्रज्ञ म्हणून ओळखावे,



**तो कामु सर्वथा जाये । जयांचे आत्मतोषीं मन राहे ।**
**तोचि स्थितप्रज्ञु होये । पुरुष जाणे ।। असे भगवंत सांगतात.**

अशा स्थितप्रज्ञ माणसाची महती सांगतांना भगवंत म्हणतात, या माणसाला अनेक दुःखे जरी प्राप्त झाली तरी याचे मन उदास होत नाही आणि सुख प्राप्त झाले किंवा सुख प्राप्त व्हावे म्हणून सुखाच्या ईच्छेत तो गुंतुन पडत नाही. अर्थात, अशा स्थितप्रज्ञाजवळ काम-क्रोध नसतात. तो ब्रम्हरुपच झाला असल्याने त्याला भय नांवाचा प्रकार माहीती नसतो. अशा व्यक्तिच्या ज्ञान आणि चिंतनाला कसलाही प्रतिबंध असत नाही. असा पुरुष अमर्याद देहादी उपाधी निरास करुन, भेदभाव मुक्त झालेला असतो. म्हणून तो स्थितप्रज्ञ म्हणून ओळखला जातो. अर्जुन आणि भगवंताचा संवाद एकमेकांच्या प्रेमापोटी, चांगल्यापोटी चालला आहे. भगवंताची भीती बाळगून अर्जुन ऐकत नाही तर आदर, आवड व आवश्यकता म्हणून तो ऐकत आहे. भीतीयुक्त आदर न बाळगता तो आदरयुक्त भीती बाळगतो आहे. मानवी जीवनातही असेच असावे. भीतीयुक्त आदराने नुकसान होऊ शकते. पण आदरयुक्त भीतीने नुकसान होत नाही. म्हणून आपणही जीवनात आदरयुक्त भीतीला योग्य ते स्थान देऊ या. विषयासक्ती आत्मसुखात बाधा निर्माण करते. ही विषयासक्ती आपणामध्येही निर्माण होऊ शकते किंवा झालेली असेल. असे असेल तर विषयासक्ती आपणच घालवली पाहिजे. जीवनाचा निर्भेळ आनंद घ्यायचा असेल तर काम, क्रोध, मोह, स्वार्थ, यांना लाथाडलेच पाहिजे. आत्मसुख, आत्मज्ञान म्हणजे नेमके काय, हे आपणही अर्जुनाप्रमाणे जाणून घेतले पाहिजे. एखादी गोष्ट कशी असते हे सांगतांना जर ती गोष्ट, बाब प्रत्यक्ष दाखविली किंवा तीची लक्षणे सांगीतली तर जी जास्त लवकर समजते. भगवंत अर्जुनाला स्थितप्रज्ञ म्हणजे काय? हे तर सांगतच आहेत. पण स्थितप्रज्ञनाची लक्षणेही सांगत आहेत. जेणेकरुन अर्जुनाला अशा लक्षणांनी युक्त असे एखादे व्यक्तिमत्व डोळयासमोर आणता येईल व अशा व्यक्तिकडे बघुन अर्जुनालाही स्थितप्रज्ञ होता येईल, याचा विचार भगवंतानी केला आहे. आपणही स्थितप्रज्ञाची लक्षणे समजून घेऊ या आणि असा स्थितप्रज्ञ आपणही शोधू या.

**जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : सोमवार
दि. २९ एप्रिल २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - चैत्र
कृ. पंचमी (०७.५७)
ऋतु - वसंत
नक्षत्र- पूर्वाषाढा (२८.४२)
योग - सिध्द (२४.२५)
करण - गर (१९.३४)

दिनविशेष -
चांगला दिवस

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष** : आरोग्याची काळजी घ्या. व्यापारात नवीन योजना आखताल. राजकीय किंवा शासनाकडून मान सन्मान मिळण्याचे योग आहेत.

**वृषभ** : व्यवसायिक करार फायदेशीर ठरतील. जमीनी संदर्भातील व्यवहार सुरळीत पार पडतील. प्रभावपूर्ण वातावरण राहील.

**मिथुन** : अनोळखी व्यक्तिवर विश्वास दाखवू नका. आपल्या सल्ला घेतला जाईल. रोजगारात विस्तार होण्याची शक्यता आहे.

**कर्क** : परमेश्वरावरील विश्वास वाढणार आहे. आर्थिक योजनेमध्ये यश मिळेल. कार्यकुशलतेमुळे आपला फायदा होईल. विरोधकांपासून सावध रहा. कौटुंबिक संबंध चांगले राहतील.

**सिंह** : व्यापारत नवीन योजना सुरू होतील. आपले ध्येय्य साध्य करण्याच्या दिशेने हालचाल करा. आर्थिक फायदा होण्याचे योग आहेत.

**कन्या** : सामाजिक स्थिती चांगली राहणार आहे. धावपळ केली तरच आपल्याला यश मिळणार आहे. स्वविवेक बुद्धीने निर्णय घेऊनच व्यवहार करा.

**तुळ** : आपली कार्यक्षमता वाढणार असून आपल्या योग्यतेची समाजात प्रशंसा होईल. कौटुंबिक स्थिती आनंददायी राहील. प्रवास करण्याचे शक्यतो टाळावे.

**वृश्चिक** : सकारात्मक परिस्थिती राहील. कोणत्याही प्रकारच्या जोखमीचे कामे करू नका. व्यापारात अपेक्षेप्रमाणे लाभ होईल. कौटुंबिक तणाव निर्माण होईल.

**धनु** : आपल्या ज्ञानात भर पडणार आहे. व्यावसायिक अडचणी दूर होतील. नवीन संबंध फायदेशीर राहतील. उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ ठेवा. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मकर** : आपल्या कामाची व्यवहारात स्तुती होणार आहे. घरगुती समस्यांचा सामना करावा लागणार आहे. आर्थिक देणेघेणे व्यवहारात सावधानी बाळगा.

**कुंभ** : आर्थिक व्यवहार फायदेशीर राहतील. उत्पन्नात वाढ झाली तरी खर्चावर नियंत्रण ठेवा. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवूच नका. नौकरीतमध्ये आपले महत्व वाढणार आहे.

**मीन** : आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. सज्जन लोकांच्या मदतीमुळे आपल्या यशात भर पडेल. कोणाचाही राग करू नका.

# निवडणूक प्रचाराचा ट्रेंड होतोय हायटेक

**छोट्या घटकांच्या अर्थकारणावर परिणाम**

**बदलत्या यंत्रणेमुळे मूठभर लोकांनाच फायदा**

**अन्य कारागिर, कलाकारांची उपासमार**

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२८ एप्रिल-**

दिवसेंदिवस निवडणुकीच्या प्रचार यंत्रणेत आमुलाग्र बदल होताना दिसत आहे. प्रत्येक पक्षाच्या उमेदवारांकडून पारंपारिक प्रचार यंत्रणेला फारसे स्थान न देता हायटेक प्रचार यंत्रणेचा वापर केला जात असल्याचे दिसत आहे. या हायटेक प्रचार यंत्रणेमुळे मुठभर लोकांचा जरी आर्थिक फायदा होत असला तरी निवडणुकीच्या काळातील शहर आणि गावांमधील लहान, लहान घटकांना मिळणाऱ्या रोजगाराच्या संधी मात्र बंद होताना दिसत आहे. त्यामुळे लहान घटकांच्या अर्थकारणावर याचा मोठा परिणाम होत असल्याचे सध्या पहावयास मिळत आहे.

पूर्वी लोकसभा, विधानसभा, महापालिका, नगरपालिका तसेच जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत आदी निवडणुकांमध्ये पारंपारिक पध्दतीने प्रचार यंत्रणेचा उपयोग केला जात होता. पारंपारिक प्रचार यंत्रणे मध्ये रिक्षा, जीपगाडी, टांगा आदींचा वापर करुन त्यावर लाऊड स्पीकर लावून प्रचार करत होते. त्यामुळे गावागावात स्पीकर्स वॉर पहावयास मिळत असत. प्रत्येक उमेदवाराच्या रिक्षा किंवा जीपगाड्या एकमेकांसमोर आल्या तर अक्षरशः आवाजाचा गोंगाटा होत असत. निवडणुकीच्या काळात अर्थकारणालादेखील मोठी चालना मिळत असत. या काळात रिक्षा तसेच जीपगाड्या चालविण्याचा व्यवसाय करणाऱ्या तसेच स्पीकर्सचा व्यवसाय करणाऱ्या मंडळींना मोठा रोजगारदेखील उपलब्ध होत असत. अशा रिक्षा तसेच जीप गाड्यांमधून मध्यंतरीच्या काळापर्यंत उमेदवारांच्या माहितीचे पत्रकेदेखील वाटली जात होते. त्यामुळे प्रिटींग व्यवसायातील मंडळींनादेखील निवडणुकीच्या काळात चार पैसे मिळत असत. पेंटर लोकांनादेखील मोठा व्यवसाय उपलब्ध होत असत. मात्र काळाच्या ओघात प्रचार यंत्रणेतदेखील कमालीचा बदल झालेला पहावयास मिळत आहे. सध्या मोबाईल, इंटरनेटचा जमाना आलेला असल्यामुळे पारंपारिक प्रचार यंत्रणेला फाटा देत प्रत्येक उमेदवार हायटेक प्रचार यंत्रणेचा वापर करताना दिसत आहे. त्यामुळे रिक्षा तसेच जीप गाड्यांवर असलेल्या स्पीकर्सव्दारे होणारा प्रचार क्वचितच दिसत आहे. दुसरीकडे मोबाईलव्दारे समाज माध्यमांचा (सोशल मिडीयाचा ) वापर करुन उमेदवारांची माहिती थेट मतदारांपर्यंत पोहचविण्यात येऊ लागली आहे. त्यामुळे गल्लीबोळातील भिंतीरंगविण्या ऐवजी, पत्रके वाटण्या ऐवजी आता प्रत्येक उमेदवार सर्रास शहरात मोठी होर्डिंग्ज किंवा डिजीटल बोर्डाव्दारे मतदारांपर्यंत आपली माहिती पोहचवित आहे. त्यामुळे एकंदरीतच सध्याच्या या हायटेक प्रचार यंत्रणेमुळे मागील काही काही वर्षांपर्यंत निवडणुकीच्या काळात आपआपल्या व्यवसाय आणि अंगी असलेल्या कलांगुणांचा वापर करीत चार पैसे पदरात पाडून घेणाऱ्या छोट्या छोट्या घटकांना मिळणाऱ्या अर्थकारणावर मात्र मोठा परिणाम झाल्याचे दिसून येत आहे.



### मिमिक्री आर्टिस्टचे महत्वदेखील झाले कमी

पूर्वी ताई, माई, आक्का मारा धनुष्यबाणावर शिक्का. दिसला पंजा की हाण शिक्का. गल्लीतून आलं रेल्वे इंजिन, बोळातून आलं रेल्वेइंजिन, शहरातून आलं रेल्वे इंजिन. इकडून आले कमळ, तिकडून आले कमळ अहो सगळीकडे कमळच कमळ अशा प्रकारे मनोरंजनात्मक तसेच लक्षवेधक ऑडिओ कॅसेट मीमिक्री आर्टिस्ट किंवा खडा आवाज असणाऱ्या मंडळींकडून प्रत्येक राजकीय पक्षांकडून तयार करुन घेतले जात असत. या कॅसेट लाऊड स्पीकर्सवरुन लावून आपआपल्या उमेदवाराचा प्रचार केला जात असत. त्यामुळे मीमिक्री आर्टिस्ट, खडा आवाज असणाऱ्या मंडळींना देखील निवडणुकीच्या काळात मोठी मागणी असत. मात्र हायटेक प्रचार माध्यमांमुळे सध्या अशा प्रकारचा प्रचारदेखील लुप्त झालेला दिसत आहे. त्यामुळे मिमिक्री आर्टिस्टचेदेखील महत्व कमी झाल्याचे दिसत आहे.

# करकंबमध्ये १६ ज्येष्ठ, दिव्यांग मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २८ एप्रिल-**

करकंब येथील १६ ज्येष्ठ व दिव्यांग नागरिकांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार घरी बसून मतदानाचा हक्क बजावला.



घरात बसून मतदान करण्याची मागणी या १६ जणांनी निवडणूक आयोगाकडे केली होती. त्या अनुषंगाने करकंब येथे मंडल अधिकारी राजेंद्र वाघमारे, तलाठी प्रशांत शिंदे, केंद्रप्रमुख दत्तात्रय खंदारे यांनी बीएलओ व पोलिंग एजंट यांच्या समक्ष ही प्रक्रिया पार पाडली. एकूण मतदारांमध्ये ८५ वर्षे पुढील २३१ व दिव्यांग ४२ असे मतदार आहेत. या मतदारांपैकी मनोहर माने, इंदुबाई तेली, रामचंद्र तारळकर, विठ्ठल ढोबळे, कुंडलिक मांजरे, दासू व्यवहारे, मीजस शेख, सरगम जाधव, गोविंद देगावकर, अनुसया खंदारे, शंकर कुरुलकर, गोपाळकृष्ण कुरुलकर, महादेव खंदारे, लक्ष्मीबाई बार्ले, बेबीनंदा पवार, लक्ष्मी शिंदे या १६ मतदारांनी घरी मतदान केले. मंडल अधिकारी राजेंद्र वाघमारे यांच्या टीमने या मतदारांच्या घरी जाऊन त्यांचे मतदान करून घेतले. यावेळी बीएलओ हेमंत माने, महादेव पुजारी, पोपट कापसे, नागेश घाटुळे, विशाल रेपाळ व अधिकारी उपस्थित होते.

# सावता महाराज मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २८ एप्रिल-**

श्रीसंत सावता महाराज गंध-उटीनिमित्ताने करकंब येथील श्रीसंत सावता महाराज मंदिरात रविवार, दि. २८ एप्रिलपासून अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात झाल्याचे हभप कांतीलाल खारे बुवा यांनी सांगितले.



रविवारी सकाळी लालू महाराज वास्ते यांचे हस्ते कलश पूजन, नंदकुमार माळी यांच्या हस्ते वीणा पूजन, विनायक कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजजपूजन तर हभप सुदाम महाराज पिसे यांच्या हस्ते ग्रंथ पूजन करण्यात आले. त्यानंतर ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचन, दुपारी भोजन, दुपारी ३ ते ४ श्रीसंत सावता महाराज पोथीवाचन होणार आहे. दररोज रात्री ७ ते ९ या वेळेत कीर्तन होणार आहेत. रविवारी रात्री हभप रावसाहेब जाधव, सोमवारी हभप शंकर महाराज गोसावी, मंगळवारी हभप चिंतामणी घोडके, बुधवार दि. १ मे रोजी हभप बळीराम व्यवहारे, गुरुवारी हभप ओंकार महाराज जोशी, शुक्रवारी हभप विश्वंभर महाराज कदम, शनिवारी हभप श्रीकांत आरोळे, रविवार दि. ५ मे रोजी हभप भागवत महाराज शिरवळकर यांचे दुपारी ३ वा. काल्याचे किर्तन होणार आहे. दि. २ मे रोजी रात्री १० वाजता हभप राणी विनय माळी यांचा संगीत भजनचा कार्यक्रम होणार आहे. व्यासपीठ चालक म्हणून हभप पोपट माळी हे काम पहात आहेत. भक्तांसाठी सकाळी नाष्टा, दुपारी व रात्री भोजनाची व्यवस्था करण्यात आल्याचे चंद्रकांत सुरवसे यांनी सांगितले. यासाठी सदाशिव वाघमारे, दत्तात्रय काळे, कांतीलाल खारे, नंदकुमार माळी, नाना खारे, चंद्रकांत सुरवसे, लक्ष्मण जाधव, पोपट माळी, शालन खारे आदी विशेष परिश्रम घेत आहेत.



# कृष्णेचे पाणी उजनीत आणण्यासाठी निंबाळकरांच्या पाठीशी उभे रहा : शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २८ एप्रिल-**

सोलापूर पाणीपुरवठा पाईपलाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर उजनी धरणाचे पाणी पुरणार नाही. त्यामुळे कृष्णापूर नियंत्रण योजना या महत्त्वाच्या योजनेची तत्वतः मान्यता खासदारांच्या प्रयत्नातून मिळाली आहे. या योजनेमुळे कृष्णा नदीचे पाणी उजनी धरणामध्ये जवळपास ५१ टीएमसी पाणी मिळणार आहे. भीमा व सीना नदीवर बॅरेजेस बांधणे या सर्व योजना केंद्र सरकारकडून करून घेण्यासाठी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना विजयी करा, असे आवाहन जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांनी केले.

चव्हाणवाडी (टें) येथे आयोजित माढा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी सरपंच नवनाथ शिंदे, शिवाजी पाटील, संजय पाटील, तुकाराम ढवळे, राष्ट्रवादी कॉंग्रेस उपाध्यक्ष संजय मिस्कीन, माजी सरपंच हनुमंत चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी चेअरमन अशोक मिस्किन, अरुण चव्हाण, नागेश खटके, रामभाऊ शिंदे उपस्थित होते. प्रास्ताविक संजय मिस्कीन यांनी केले, तर आभार भारत जगताप यांनी मानले.

# भाग्यश्री, धनश्री वाटकरांच्या भक्ती संगिताने दरवळला स्वामी समर्थ स्मरणाचा सुगंध

**श्रोते बुडाले क्तीरसात**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २८ एप्रिल-**

श्री वटवृक्ष स्वामी समर्थ महाराज मंदिरात स्वामी समर्थांच्या १४६ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या धर्मसंकीर्तन महोत्सवात दुसरे पुष्प अयोध्येतील श्रीराम प्रतिष्ठापना सोहळ्यातील गायन सेवा सादरकर्ते व नागपूरचे भाग्यश्री व धनश्री वाटकर यांच्या भक्तीसंगीत गायन सेवेने गुंफले.



या भक्तीसंगीत सेवेत गायिका भाग्यश्री व धनश्री वाटकर यांनी स्वामी समर्थ तारक मंत्र, नाम स्वामींचे येता माझ्या ठाई रे, अक्कलकोट स्वामींची पालखी निघाली, जरे सारे सारे स्वामी दर्शनाला, दत्त दर्शनीला जायचं, विश्वाचा विश्राम रे, स्वामी माझा राम रे, शांत हो श्री गुरु दत्त, माझी रेणुका माऊली, ठुमक चालत रामचंद्र, श्रीरामचंद्र कृपालू भजन, निघालो घेऊन दत्ताची पालखी, माझे माहेर पंढरी, लख्ख पडला प्रकाश, हम कथा सुनाते राम सकल गुण धाम की, जेजुरीच्या खंडेराया जागराला या, स्वामींच्या दरबारी जमला भक्तांचा मेळा, माऊली माऊली रुप तुझे, दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा, माझी आई अक्कलकोटी भिऊ नका ती आहे पाठी, स्वामी कृपा कधी करणार, भिऊ नको मी तुझ्या पाठीशी आहे आदी भक्तीगीते गाऊन उपस्थित श्रोत्यांना आपल्या भक्तीमय स्वराने तल्लीन केले. प्रास्ताविक ओंकार पाठक यांनी तर सूत्रसंचालन सोलापूरच्या अरुंधती शेटे यांनी केले.

आभार मंदिर समितीचे विश्वस्त महेश गोगी यांनी मानले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त उज्ज्वलाताई सरदेशमुख, प्रथमेश इंगळे, मंदार महाराज पुजारी, ओंकार पाठक, शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील, दीपक जरीपटके, राजू भोसले, ज्ञानेश्वर भोसले, मोहन शिंदे, श्रीशैल गवंडीउपस्थित होते.

### यांनी दिली साथसंगत

ढोलकीवर अंकित खरारे, ऑक्टोपॅडवर सिद्धार्थ दनाने, सिंथेसाईजरवर अमरीश जहागीरदार, तबल्यावर प्रशांत थोरात, साऊंड सिस्टिमवर संदीप सर्वदे, अनासपुरे, इव्हेंटेड मीडिया हाऊस राजू अनासपुरे यांनी साथसंगत केली.

# माढा मतदारसंघात प्रचाराचा अकलूज पॅटर्न

**मोहिते-पाटलांची होम टू होम, भेटीगाठीवर भर**

**संपूर्ण कुटुंब उतरले प्रचारात**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २८ एप्रिल-**

मोहिते-पाटील परिवाराने प्रचारात आघाडी घेतली असून घरातील प्रत्येक सदस्य कार्यकर्त्यांना घेऊन होम टू होम प्रचार करत आहेत. जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अचूक नियोजनामुळे प्रचार आघाडी घेतली आहे. अकलूज पॅटर्नप्रमाणे एका कार्यकर्त्यास १० मतदान देण्यात आले आहे.




अकलूज परिसरात संग्रामसिंह मोहिते-पाटील, किशोरसिंह माने-पाटील, क्रांतीसिंह माने-पाटील यांच्यासह सयाजीराजे मोहिते-पाटील अकलूज शहर व परिसरात घरोघरी जाऊन प्रचार करीत आहेत. स्वरूपराणी मोहिते-पाटील, अर्जुनसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील हे सक्रिय प्रचारामध्ये व कॉर्नर बैठका घेऊन प्रचार करीत आहेत. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील हे जुन्या सहकाऱ्यांच्या भेटीसाठी घेऊन तसेच पूर्ण वाडा मतदारसंघ फिरत आहेत. उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील व त्यांच्या पत्नी शितलदेवी मोहिते-पाटील यांनी मतदारसंघाचा एक दौरा पूर्ण केला आहे.

### माढा लोकसभेतील मतदार

माढा लोकसभा मतदारसंघात एकूण १९ लाख ९१ हजार ४५४ एवढे मतदान आहे. माण विधानसभेत ३ लाख ५० हजार ११, फलटण ३ लाख ३५ हजार ९९९, माळशिरस ३ लाख ३७ हजार ३८६, सांगोला ३ लाख १२ हजार ४९८, माढा ३ लाख ३७ हजार ६३२ तर करमाळा ३ लाख १७ हजार ९२८ एवढे मतदान आहे.

### माढ्यात महायुतीची ताकद

माढा लोकसभा मतदारसंघात महायुतीची ताकद मोठी दिसत आहे. माण व माळशिरस येथे भाजपचे आमदार आहेत. फलटण, माढा व करमाळा येथे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार आहेत तर सांगोल्यात मुख्यमंत्री शिंदेंच्या शिवसेनेचा आमदार आहे. फलटण वगळता या सर्व आमदारांनी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे महायुतीची ताकद या मतदारसंघात मोठी आहे अस दिसत आहे.

### मोहिते-पाटलांना यांची मिळाली साथ

मोहिते-पाटलांच्या उमेदवारीला करमाळ्यातून माजी आ. नारायण पाटील, माढ्यातून शिवसेनेचे संजय कोकाटे, शिवाजीराजे कांबळे, सांगोल्याचे डॉ. बाबासाहेब देशमुख, डॉ. अनिकेत देशमुख, पंढरपूरातून विठ्ठल साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, माळशिरसमधून राष्ट्रवादीचे अजित पवार गटाचे नेते उत्तमराव जानकर, फलटणमधून विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक-निंबाळकर तर माण- खटावमधून प्रभाकर देशमुख, अनिल देसाई या मातब्बरांनी पाठिंबा दिल्याने मोहिते-पाटलांचे पारडे जड दिसत आहे. अशात माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनी प्रचाराचा धुमधडाका लावत झंझावात निर्माण केला आहे. यामुळे वातावरण ढवळून निघाले आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विक्रमवीर कौटगींच्या पुस्तकातील एपी सेट परीक्षेत ५३ प्रश्न

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.२८ एप्रिल-**

अक्कलकोट येथील केएलई मंगरुळे प्रशालेतील विक्रमवीर शिक्षक धानय्या कौटगी मठ यांच्या पुस्तकामधील पेपर १ अध्यापन व संशोधन क्षमतामध्ये २० प्रश्न आणि पेपर २ इंग्रजी साहित्यामध्ये ३३ प्रश्न असे एकूण ५३ प्रश्न आले आहेत. धानय्या कौटगी स्वतः ही परीक्षा दिली आहेत. ही त्यांची ७१ वी परीक्षा आहे. देशातील विविध राज्यातील सेट, नेट, टीईटी परीक्षा उत्तीर्ण होऊन जागतिक विक्रम



नोंदविला आहे. या परीक्षेत मिळालेल्या अनुभवाच्या आधारे यु ट्यूबद्वारे मराठी, कन्नड, इंग्रजी भाषेत विद्यार्थ्यांना माफत मार्गदर्शन करत आहेत. आतापर्यंत ४७० विद्यार्थी सेट-नेट उत्तीर्ण झाले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली आंध्र विद्यापीठ, विशाखापट्टणम् यांनी आंध्रप्रदेशात प्राध्यापक होण्यासाठी असलेल्या राज्यस्तरीय पात्रता एपी सेट परीक्षा २८ एप्रिल २०२४ रोजी आंध्रप्रदेशातील आठ विभागीय क्षेत्रात म्हणजे विशाखापट्टणम, राजमुंडरी, गुंटूर, नेलोर, अनंतपूर, तिरुपती, कडपा आणि करनूल येथे एकूण ३० विषयांत सेट परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी ३८,०७८ विद्यार्थी बसले होते.

## संक्षिप्त वृत्त...



### करकंबमधून १४ हजार मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**करकंब, दि. २८ एप्रिल-**

माढा लोकसभा मतदारसंघात पंढरपूर तालुक्यातील सर्वात जास्त मतदार असणाऱ्या करकंब गावावर सर्वच उमेदवारांनी लक्ष केंद्रित केले आहे. करकंबमधील १४ हजार मतदार मतदानाचा हक्क बजाणार आहेत. करकंब येथे प्रभाग क्रमांक १९३ ते २०८ असे १६ बूथ असून एकूण १४ हजार २८० मतदार आहेत. त्यामध्ये ८५ हून अधिक वयाचे २३१ तर दिव्यांग ४२ मतदार आहेत. त्यांचे मतदान त्यांच्या घरी जाऊन घेतले जाणार होते. परंतु २१७ मतदारांनी घरून मतदान करण्यास नकार कळविला. दिव्यांग ४२ मतदारांपैकी ४० मतदारांनी नकार कळविल्याने फक्त १६ मतदारांचे मतदान घेण्यासाठी निवडणूक घेण्यात आले. गत पंचवार्षिक लोकसभा निवडणुकीत भाजप उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर व राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार संजयमामा शिंदे यांच्यामध्ये झालेल्या निवडणुकीत भाजप उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना २७८ मतांची आघाडी मिळाली होती. करकंबमध्ये माजी आ प्रशांत परिचारक यांचा पांडुरंग परिवार, अभिजित पाटील यांचा विठ्ठल परिवार, कल्याणराव काळे, आ. बबनदादा शिंदे, भगीरथ भालके, मोहिते-पाटील यांचे आहेत.



### हैद्रा येथील हजरत खाजा सैफुल मुलुख चिस्ती दर्गाह कमिटीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २८ एप्रिल-**

अक्कलकोट तालुक्यातील हैद्रा येथील हजरत खाजा सैफुल मुलूख चिस्ती दर्गाह येथील नूतन चेअरमन, व्हाईस चेअरमन व इतर पदाधिकाऱ्यांचा सत्कार नागणहळ्ळी आश्रमशाळेचे सचिव जावेद पटेल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी चेअरमन रफिक सिराजोद्दीन मुजावर, व्हाईस चेअरमन बंदानवाज तालाबली मुजावर, सेक्रेटरी वकील नबीसाब मुजावर, माजी चेअरमन मिरासाब याकुबसाब मुजावर मुतवल्ली, अहमद मुजावर मुतवल्ली, अहमद कादरबाशा मुजावर मुतवल्ली, बंदानवाज सिराजोद्दीन मुजावर, मुतवल्ली याकुबसाब मिरासाब मुजावर, सैपन फुलारी, मुस्लिम जमातचे अध्यक्ष सैपन फुलारी, जैनोद्दीन तालाबली मुजावर आदीचां सत्कार नागनहळ्ळी आश्रमशाळेचे सचिव जावेद पटेल, रजाक सय्यद जिलानी कुरेशी यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी हैद्रा दर्गा कमिटीचे नूतन चेअरमन दर्गा परिसराच्या विकासासाठी काम करणे, भक्त निवास बांधणे ही कामे पुढील काळात प्रामुख्याने करण्यात येतील. परगावच्या सर्वधर्मीय भक्तांना कोणतीच गैरसोय होणार नाही, याबाबत दर्गाह कमिटी प्रयत्नशील असणार असे सांगितले.

### भाजपा शिक्षक आघाडीच्या जिल्हा संयोजकपदी प्राचार्य सुरेश गुंड

**वैराग, दि. २८ एप्रिल-**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेश संयोजक डॉ. प्रशम कोल्हे यांनी प्रदेश शिक्षक आघाडी कार्यकारिणीची घोषणा केली आहे. यामध्ये बार्शी तालुक्यातून आमदार राजेंद्र राऊत यांचे कट्टर समर्थक प्राचार्य सुरेश गुंड यांची भाजप शिक्षक आघाडीच्या जिल्हा ग्रामीण, माढा जिल्हा संयोजकपदी निवड करण्यात आली आहे. नियुक्तीचे पत्र महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आ. राजेंद्र राऊत, आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत देण्यात आले. प्रा. सुरेश गुंड गेल्या २७ वर्षांपासून माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक म्हणून सेवेत असून सध्या शरदचंद्रजी पवार विद्यालय बावी येथे प्राचार्य म्हणून सेवेत आहेत. सुरेश गुंड हे सोलापूर जिल्हा शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन असून जिल्हा मुख्याध्यापक संघाचे क्रीडा सचिवही आहेत. शैक्षणिक संघटनेच्या माध्यमातून सुरेश गुंड यांनी शिक्षक, सेवकांच्या समस्या सोडविलेल्या आहेत. विनाअनुदान शाळेचा तसेच जुनी पेन्शन मिळण्याकरिता आंदोलनाच्या माध्यमातून लढा सुरू ठेवलेला आहे.



### स्वामी समर्थ पुण्यातिथीनिमित्त समर्थनगर येथे विविध कार्यक्रम

**अक्कलकोट, दि. २८ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थांच्या १४६ व्या पुण्यतिथीनिमित्त सोमवार, दि. २९ एप्रिल ते ५ मे या कालावधीत श्री स्वामी समर्थ विसावा पादुका स्थान सेवा मंडळ, जेऊर रोड, समर्थनगर, अक्कलकोट येंथे दररोज नामस्मरण, पारायण तसेच रोज सायंकाळी ४ वाजता विविध भजनी मंडळांचे भजन, सायंकाळी ६ वाजता नामांकित प्रवचनकारांचे प्रवचन व भक्तीसंगीत आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सोमवारी दि. ६ मे पहाटे ५ वाजता श्री मूर्तीस रुद्राभिषेक, सकाळी ९ वा. महाआरती व सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन केले आहे. स्वामी भक्तांनी या पर्वणीचा लाभ घ्यावा, असे श्री स्वामी समर्थ पादुका विसावास्थान भक्तमंडळींकडून आवाहन करण्यात येत आहे.

# मजबूत भारतासाठी महायुतीला विजयी करा

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : वाकाव येथील खा. निंबाळकरांच्या प्रचारसभेत आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २७ एप्रिल-**

देशाला विकासाकडे केवळ मोदीच नेऊ शकतात. त्यामुळे मजबूत भारतासाठी महायुतीच्या उमेदवाराला भरघोस मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

माढा तालुक्यातील वाकाव येथे माढा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमदेवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ घेण्यात आलेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी आ. बबनदादा शिंदे, आ. संजयमामा शिंदे, माजी आ. प्रशांत परिचारक, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत, जयवंतराव जगताप, रश्मी बागल, चित्राताई वाघ, रयत क्रांतीचे सुहास पाटील, पृथ्वीराज सावंत, ऋतुराज सावंत, अनिल सावंत, मन्ना साठे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ही विधानसभेची निवडणूक नसून देशाच्या नेतृत्वाची निवडणूक आहे. मोदीजींच्या नेतृत्वात देश विकासाच्या दिशेने वाटचाल करत असल्याने देशाला मोदींसारख्या कणखर नेतृत्वाची गरज आहे. पंतप्रधान मोदी यांच्या काळामध्ये या देशातील २० कोटी लोकांना घरे मिळाली. ८० लाख बचत गटांची स्थापना होऊन त्यांना आठ लाख कोटी रुपये कर्ज मिळाले. यातून आठ कोटी महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या. देशातील ५५ कोटी लोकांना पाच लाखांपर्यंत उपचार मोफत केले. ७५ वर्षांवरील नागरिकांनाही वैद्यकीय सुविधा देण्यात येणार आहेत. मोदीजींच्या नेतृत्वाखाली देशातील बाराबलुतेदारांना विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून १३ हजार कोटी रुपये दिले आहेत.अनुसूचित जातीतील तरुणांनाही बँकांमध्ये कर्ज देणे बंधनकारक केले आहे. यामुळे देशातील सर्वच समाज घटकांना बरोबर घेऊन जात सबका साथ सबका विकास या उक्तीप्रमाणे मोदीजींचे विकासचे काम सुरू आहे.

मोदीजींच्या नेतृत्वाखाली साखर कारखानदारीला संकटातून बाहेर काढण्यासाठी सुमारे २५ हजार कोटींचा आयकर रद्द करण्यात आला आहे. इथेनॉलची मर्यादा १० टक्क्यांनी वाढवण्यात आली आहे. मोदीजींच्या सहकार्यामुळे नीरा-देवधर, टेंभू, कृष्णा फ्लड ड्रायव्हर्जन यासारख्या योजना पूर्णत्वास जात आहेत. सोलापूर जिल्ह्यात कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजनेच्या नावावरून अनेक वर्ष राजकारण केले गेले. खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकरांच्या पाठपुराव्यामुळे कृष्णा फ्लड डायव्हर्जन योजना अस्तित्वात येऊ लागली असून त्यासाठी साडेतीन हजार कोटी रुपयांना मान्यता देण्यात आली आहे. जागतिक बँकही या योजनेसाठी मदत करणार आहे. मोदीजींच्याच नेतृत्वामुळे या गोष्टी शक्य होत आहेत. त्यामुळे देशाच्या कणखर नेतृत्वासाठी महायुतीला मतदान करण्याचे आवाहन केले.

एकमेकांचे विरोधक असणारे शिंदे व सावंत कुटुंब एकाच मंचावर. एकाच उमदेवारासाठी मते मागताना दिसत आहेत. हे केवळ मोदी है तो मुमकीन है यामुळेच शक्य झाले आहे. शिंदे व सावंत यांच्या एकीचे बळ हे आता मतदानातून दिसायला हवे असे फडणवीस यांनी सांगितले.



### ही निवडणुक विश्व नेतृत्वासाठी : डॉ.तानाजीराव सावंत

माढा लोकसभेची निवडणूक ही विश्व नेतृत्वासाठी होणारी निवडणूक आहे. या निवडणुकीत माढा तालुक्यातून खा. नाईक-निंबाळकरांना दोन लाखांचे मताधिक्य देऊ. माळशिरस तालुक्यात मोदींची सभा घेतल्यास तेथून किमान २५ हजार मतांचा वीड मिळेल. शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत माल विकता यावा यासाठी फार्मिंग एअरपोर्टची उभारणी करावी, अशी मागणी मंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांनी केली.

### माढा तालुक्यातून किमान एक लाख मतांचे मताधिक्क्य देऊ : आ. बबनराव शिंदे

ही निवडणूक मोहिते-पाटीलविरूद्ध खा. नाईक-निंबाळकर अशी नसून निंबाळकरांना मत म्हणजे मोदींना मत अशी आहे. माढा लोकसभेचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी रस्ते व पाण्यासंदर्भात भरीव काम केले असून या निवडणुकीतून किमान एक लाख मतांचा लीड देण्याचा प्रयत्न करणार आहे, असे आ. बबनराव शिंदे यांनी सांगिते.

### मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी शिंदे-सावंत एकत्र : खा. नाईक-निंबाळकर

माढा लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी आ. बबनराव शिंदे व प्रा. शिवाजीराव सावंत हे दोन्ही विरोधी गट एकत्र आल्याने मला लाखांच्यावर मताधिक्य मिळणार आहे. या भागातील पाण्याच्या मुख्य समस्येबरोबरच उर्वरित राहिलेली कामे पूर्ण करण्यासाठी आपण या निवडणुकीत उभे आहोत, असे खा. नाईक-निंबाळकर यांनी सांगितले.

## भूमिपुत्राला गावातच काम देण्यासाठी कटिबद्ध : आ. सातपुते

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

भूमिपुत्राला गावातच काम देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन आ. सातपुते यांनी तिऱ्हे येथे प्रचार सभादरम्यान केले.

माझा मतदारसंघ हा माझा परिवार आहे. परिवारातल्या तरुणाला काम मिळावे, आगामी काळात तरुणांना नोकरीसाठी बाहेर जावे लागू नये, म्हणून अनेक कंपन्या सोलापुरात आणून काम देण्याचा मी प्रयत्न करेन. मतदार संघातील परिवारजनांच्या उन्नतीसाठी मी उपलब्ध राहीन. मतदार संघातील भूमिपुत्राला गावातच काम मिळावे यासाठी मी प्रयत्नशील राहीन यासाठी आपणा सर्वांची साथ मला हवी आहे, असे प्रतिपादन भाजपाचे उमेदवार आ. राम सातपुते यांनी केले.

महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांनी उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे येथे गाव भेट दौरा केला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार सुभाष देशमुख यांची उपस्थिती होती. ही लोकसभा निवडणूक भाजपा विकासाच्या मुद्द्यावर लढवत आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी अनेक उपक्रम राबवले आहेत. उज्वला योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांचा सन्मान केला. हर घर जल मार्ङ्गत घरोघरी नळाद्वारे पाणीपुरवठा करण्याची योजना असून, मुद्रा योजनेतून ग्रामीण भागातील तरुणांना शेतीपूरक उद्योग व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे. देशाच्या विकासासाठी सोलापूरच्या विकासासाठी नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवण्यासाठी सर्वांनी भाजपच्या मागे उभे रहावे. आ. सुभाष देशमुख यांनी यावेळी सांगितले की, २०१४ नंतर दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघ विकासाच्या वाटेवर चालत आहे. या कार्यकाळात प्रत्येक गावात निधी उपलब्ध करून दिला आहे. मतदार संघात नव्याने निर्माण झालेल्या रस्त्यांमुळे भाजीपाला, दूध व्यवसायांना शहर जवळ झाले असून हा शेतीपूरक व्यवसाय आता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. नदीकाठच्या लोकांना बंधाऱ्यांच्या माध्यमातून जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध होत आहेत. आगामी काळातही दक्षिण विधानसभा मतदारसंघाचा असाच विकास व्हावा यासाठी राम सातपुते यांना मताधिक्य देऊन लोकसभेत पाठवावे. यावेळी उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष राम जाधव, दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष संगप्पा केरके, किसान मोर्चा जिल्हा अध्यक्ष जगन्नाथ गायकवाड, हणमंत कुलकर्णी, जिल्हा सचिव यतीन शहा, सरचिटणीस संग्राम पाटील, धनाजी घोडके, चिमन साठे, सर्जेराव पाटील, विशाल जाधव, समाधान गायकवाड, प्रताप मल्लाव, शशिकांत पवार, महेश पवार, गणेश पवार, संजय शिंदे, रावसाहेब गायकवाड, गोपाळ सुरवसे, महिला अध्यक्षा रुशालीताई पवार, उपाध्यक्ष स्वाती पवार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## जिल्हा दुष्काळमुक्त, लोडशेडिंगमुक्त करणार : आ. प्रणिती शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा दुष्काळमुक्त करणारच सोलापूर जिल्हा लोडशेडिंगमुक्त करणार शेतकऱ्यांना एमएसपी मिळवून देणार आणि कर्जमुक्त करणार असे आश्वासन महाविकास आघाडीच्या उमेदवार आ.प्रणिती शिंदे यांनी दिले.

भाजपमध्ये लोकशाहीला दृष्टी लागली. आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपरा हे बिघडवायला निघाले आहेत. म्हणून हे लोक आपली संस्कृती परंपरा आपली एकी बिघडवत असतील आणि दुसरीकडे शेतकऱ्यांचा अंत करत असतील. आरक्षणासाठी हे बोलायला तयार नाहीत. ही खरी लोकशाहीची परीक्षा असल्याचे प्रतिपादन सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी केले आहे. हुलजंती येथे सभेत बोलत असताना प्रणिती शिंदे यांनी प्रतिपादन केले आहे. प्रणिती शिंदे यांनी बोराळे, मरवडे, हुलजंती सलगर बुद्रुक पंचायत समिती गण दौरा केला. यावेळी प्रणिती शिंदे बोलत होत्या. यावेळी त्यांच्यासोबत महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान मी प्रतिज्ञापत्र तयार केले असून हे प्रतिज्ञापत्र दोन दिवसात तुमच्यासमोर जाहीर करणार आहे. दरम्यान, मी सोलापूर जिल्हा दुष्काळमुक्त करणारच. सोलापूर जिल्हा लोडशेडिंगमुक्त करणार. शेतकऱ्यांना एमएसपी मिळवून देणार आणि कर्जमुक्त करणार. प्रत्येक गावात येणारा रस्ता मी करणार, सोलापुरात युवकांसाठी आयटी पार्क आणि नोकरीसाठी उद्योग आणणार, असे आश्वासन यावेळी आमदार प्रणिती शिंदे यांनी दिले आहे. दरम्यान मी हे काम नाही केले तर, कान धरून खाली बसवण्याचा अधिकार देखील तुम्हाला असल्याचे शिंदे यांनी सांगितले आहे. यावेळी कार्याध्यक्ष ॲड नंदकुमार पवार, रतनचंद शहा बॅंकेचे अध्यक्ष राहुल शहा, दिलीप जाधव, फिरोज मुलाणी, चंद्रशेखर कौडूभैरी, तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, प्रा.येताळा भगत, प्रथमेश पाटील, हणमंत दुधाळ, साहेबराव पवार यावेळी उपस्थित होते.





## अर्चना पाटील यांच्या प्रचारार्थ भाजपा कार्यकर्ते डोअर टू डोअर

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २८ एप्रिल-**

धाराशिव लोकसभा निवडणुकीच्या महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांच्या प्रचारार्थ अणदूर भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते डोअर टू डोअर प्रचार करीत आहेत. त्यामुळे अणदूर भागात अर्चनाताई पाटील यांचे पारडे जड होत आहे.

शिस्तबद्ध प्रचार यंत्रणा, मोदी सरकारचे १० वर्षांतील कार्य, राज्यातील महायुती सरकारचे कार्य, उमेदवाराचे घड्याळ हे चिन्ह, भविष्यात अणदूर व परिसरात करावयाचा विकास या अनेक गोष्टी मतदारांना सोप्या भाषेत समजावून सांगत आहेत. या प्रचार फेरीमध्ये दीपक आलुरे, शिवाजी घुगे, काशिनाथ शेटे, दीपक घोडके, माणिक आलुरे, धनराज मुळे, बालाजी मोकाशे, बबन कंदले, दशरथ गायकवाड, मलंग शेख, साहेबराव घुगे, महावीर कंदले, बालाजी कुलकर्णी, उमाकांत कर्पे, दीपक घुगे, पृथ्वीराज मुळे, गुंडेशा गोवे, गजानन मोकाशे, शिवकुमार स्वामी, निलेश आलुरे, लक्ष्मण बोंगरगे, प्रविण घोडके, काशिनाथ घुगेआदी परिश्रम घेत आहेत.

## स्वामी समर्थ समाधी मठात कार्यक्रमांचे आयोजन

### पुण्यतिथी उत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २८ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थ समाधी मठात श्री स्वामी समर्थांच्या १४६ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त सोमवारी दि. २९ एप्रिलपासून ते बुधवारी दि. ८ मेपर्यंत समाधी उत्सव व पुण्यतिथी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर धर्मसंकीर्तन सप्ताह आयोजित करण्यात आल्याची माहिती श्री चोळप्पा महाराजांचे वंशज अन्नू महाराज पुजारी यांनी दिली.

या महोत्सवात सोमवारी दि. २९ एप्रिल रोजी दुपारी चार वाजता कुरनूरच्या जयभवानी भजन मंडळाच्या वतीने भजनाचा कार्यक्रम, सायंकाळी ६ वाजता हभप आबा महाराज पाटील कुरनूर यांची कीर्तन सेवा होणार आहे. मंगळवारी दि. ३० भक्ती भिवरा महिला भजन मंडळ, पंढरपूरचे भजन, सायंकाळी ६ वाजता हभप शिवाजी महाराज जाधव (बावकरवाडी) यांची प्रवचन सेवा होणार आहे. बुधवारी दि. १ मे रोजी दुपारी ४ वाजता हभप बापू महाराज शिंदे (कुरनूर) यांचे प्रवचन, सायंकाळी ५ वाजता सरगम अकॅडमी प्रस्तुत नीलिमा जोशी व शिष्य परिवार अंबरनाथ यांची अभंगवाणी, गुरुवारी दि. २ मे रोजी दुपारी ५ वा. अखिल भारतीय गांधर्व मंडळ मुंबईचे सचिव पं. सुधाकर चव्हाण मुंबई व शिष्यांची शास्त्रीय संगीत व अभंगवाणी, शुक्रवारी दि. ३ मे रोजी सायंकाळी ५ वा. प्रफुल्ल कुलकर्णी व सहकाऱ्यांचे भक्तिसंगीत, शनिवारी दि. ४ मे रोजी दुपारी ४ वाजता गीता महिला मंडळ सोलापूरची टिपरी व भारुड सेवा होणार आहे. सायंकाळी ६ वाजता जय भवानी महिला भजन मंडळाचे भजन, रविवारी ५ मे रोजी दुपारी १२ वा. ठाण्याचे उद्योगपती चंद्रकांत पाटील यांच्याकडून महानैवैद्य, महाप्रसाद व अन्नदान सेवा होणार आहे. सायंकाळी ६ वा. समाधी मठातील समस्त पुजारी परिवारच्या वतीने वसंत पूजा होणार आहे. याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




### अक्कलकोटमध्ये ६ मेला नगरपरिक्रमा

सोमवारी दि. ६ मे रोजी पहाटे ३ वा. काकड आरती, रुद्राभिषेक, वस्त्र अलंकार व श्रीचे मुखदर्शन होणार आहे. दुपारी १२ वा. महानैवेद्य, महाआरती व हजारो भाविकांना महाप्रसाद वाटप होणार आहे. सायंकाळी ६ वा. श्रीची पालखी नगरपरिक्रमा सवाद्य मिरवणूक सोहळा निघणार आहे. मंगळवारी दि. ७ मे रोजी दुपारी ४ वा. श्री पंचाचार्य अक्कनबळग भजन मंडळ अक्कलकोटच्या वतीने कन्नड भजनाचा कार्यक्रम, सायंकाळी ६ वाजता हभप गणेश पोरे यांचे प्रवचन व भजन सेवा, बुधवारी दि. ८ मे रोजी सायंकाळी ५ वा. भारुडकार पंडित माळगे, नागनाथ जाधव व सहकारी कलाकार दहिटणेवाडी यांचा भारूड व गोपाळकाला कार्यक्रम होणार आहे.